# माणूस

शनिवार । २७ डिसेंबर १९७५ । एक रुपया

## लोकशाही ही बुरखाधारी स्त्री-सारखी असावी काय, की जिला इतर कोणी पाहू नये, स्पर्श करू नये, केवळ सत्ताधारी पक्षालाच तिच्याबरोबर बोलता यावे ?

## -ना. ग. गोरे

## नवी दिल्ली येथील एका अप्रकाशित भाषणातून....

स. न. वि. वि.

'थँक यू मि. ग्लाड' वाचले. एक उत्कृष्ट व प्रत्ययकारी लिखाण वाचल्याचे समाधान लाभले. नक्षलवाद्यांच्या मार्गाबद्दल मतभेद असू शकेल; पण आपल्या तत्त्वासाठी हौतात्म्य पत्करण्याची त्याची धडपड अनिल बर्वेनी अचूकपणे मांडली आहे.

श्री. बर्वे 'बाहेर' असल्यास त्यांना माझे अभिनंदन कळवा. बुळबुळीत लेख छापण्याच्या या काळात असे प्रत्ययकारी लेख छापण्याच्या धैर्याबद्दल आपलेही अभिनंदन.

—सुधाकर डोईफोडे
संपादक, 'प्रजावाणी', नांदेड

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : एकूणतिसावा**

**२७ डिसेंबर १९७५**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


# सप्रेम नमस्कार

### कांगा इडोडे (डॉज)


चिटणीस
आफ्रिकन स्टुडण्टस्
अॅसोसिएशन, इंडिया
मुंबई शाखा

४१० अॅण्ड्रयू हाउस
विल्सन कॉलेज, मुंबई


¤ अंगोल्याचा रहिवासी या नात्याने आपल्या साप्ताहिकातील अलीकडील एका लेखावर– 'अंगोला – आफ्रिकेतील व्हिटनाम' – लेखक वा. दा. रानडे ('माणूस' १९ नोव्हेंबर) मला भाष्य करण्याची कृपया संधी द्यावी ही विनंती. आमच्या नवजात लढवय्या राष्ट्राविषयी खरीखुरी हकीकत प्रत्यक्ष तेथील नागरिकाकडून जाणून घेण्याविषयी आपल्या वाचकांना औत्सुक्य असेल असे मला वाटते. श्री. रानडे यांनी लिहिलेला उपरोक्त लेख माझ्या नजरेस माझ्या एका मराठी भाषिक मित्राने आणला. तुमच्या स्तंभलेखकांनी अगदी समर्पक शीर्षक निवडल्यामुळे माझी उत्कंठा वाढली व मी त्या लेखाचा अनुवाद करवून घेतला; पण खेदाची गोष्ट अशी की, शीर्षकामुळे उंचावलेल्या अपेक्षा लेख पुऱ्या करीत नाही. लेखामध्ये रंगवलेले अंगोल्यातील परिस्थितीचे चित्र पूर्णतया विपर्यस्त आहे. म्हणूनच या विषयाचा परामर्ष काहीसा तपशिलाने घेण्यास मला परवानगी द्यावी. विवेचनात काही ठिकाणी भावनातिरेक होईल. माझा त्याला नाइलाज आहे. तरी आपण समजूतदारपणे हे पत्र जसेच्या तसे प्रसिद्ध करावे अशी कळकळीची विनंती आहे.

अंगोल्यातील परिस्थितीविषयी विश्लेषण करून आपल्या स्तंभलेखकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, 'अंगोल्यातील यादवी युद्ध म्हणजे बडचांचाच सत्तासंघर्ष आहे.' इतरत्र त्यांनी असे म्हटले आहे की, 'एम. पी. एल. ए. चे लोक अंगोल्याच्या मध्यपट्टयातील किमबुंडू जमातीचे असून एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण १३ टक्के आहे. एफ. एन. एल. ए. चे लोक बाकांगो जमातीचे (१३ टक्के लोकसंख्या) व युनिटाचे लोक ओव्हिमबुंडू जमातीचे (लोकसंख्या ३८ टक्के) आहेत.'

एम. पी. एल. ए. ची बाजू कमकुवत होऊ लागल्याचे दिसताच रशियाने लष्करी मदत वाढवली, असेही लेखात पुढे म्हटले आहे. दक्षिण भागाकडून राजधानी लुआंडावर चाल करून येणाऱ्या शत्रुसेनेत एक-तृतियांश गोरे आहेत, ही गोष्ट स्तंभलेखक मान्य करतात; परंतु हे सैनिक दक्षिण आफ्रिकेने पाठविले असल्याचे एम. पी. एल. ए. चे निवेदन म्हणजे केवळ 'आरोप' आहे असे म्हणून लेखकमहाशयांनी त्या निवेदनाची बोळवण केली आहे.

### कुणाची बाजू न्याय्य ?

'अंगोला – आफ्रिकेतील व्हिटनाम' या शीर्षकाखाली उपरोक्त प्रकारचे चित्रण असेल अशी कुणाचीच अपेक्षा नसेल. व्हिएटनामच्या संघर्षाला माणूसने प्रथमपासून पाठिंबा दिला असे मला सांगण्यात आले. याचाच अर्थ व्हिएटनाममध्ये आक्रमक विरुद्ध आक्रमणाचे भक्ष्य असा संघर्ष होता ही गोष्ट 'माणूस'कार पूर्णपणे ओळखून आहेत. व्हिएटनाममध्ये एका बाजूस होते न्याय्य विमोचन संघर्ष लढणारे लोक तर दुसरीकडे होते त्यांना गुलाम करू पहाणारे लोक. पाश्चात्यांनी कितीही प्रचाराचे ढोल बडवले तरी जुन्या साम्राज्यांच्या ठिकाणी नववसाहतवादाची प्रस्थापना करू पहाणाऱ्या मंडळींची 'व्हिएटनाममधील' कळसूत्री बाहुली कोण होती हेसुद्धा 'माणूस'कार पूर्णपणे जाणून होते. म्हणूनच माणूसच्या स्तंभलेखकांनी अंगोलातील परिस्थितीचे विश्लेषणही याच दृष्टिकोनातून करायला हवे होते; पण हाय! त्यांनी अंगोलाचे 'जमातवादी' चित्रच रंगवले! ही गोष्ट अत्यंत धोकेबाज आहे. आपली घाणेरडी उद्दिष्टे साधण्यासाठी पाश्चात्य सत्तांनी अनेक प्रकारच्या 'भेदां'चा 'शोध' लावला व राईचा पर्वत करून दाखवला. उत्तर विएतनाम व दक्षिण विएतनाम यांच्यात, उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया यामध्ये, लुमुंबाची मुंगाला जमात विरुद्ध टिशोंबेची जमात इ. अशा अनेक 'तथाकथित' भेदांचे अवडंबर

पाश्चात्य सत्तांनी या प्रकारे माजवल्याचे दिसेल. ही पारंपरिक फोडा व झोडा नीतीच होय. अशा नीतीमुळेच बेल्जियम काँगोची (आता झायरे) शोकांतिका झाली व परदेशी मक्तेदार कंपन्यांना आपले बस्तान नव्या स्वरूपात पुन्हा बसवायला मिळाले. वसाहतवादाविरुद्ध निःस्वार्थीपणाने संघर्ष केल्यामुळे एम. पी. एल. ए. ला अंगोलाच्या सर्वच जमातीत प्रचंड पाठिंबा कसा मिळाला हे मी पुढे स्पष्ट करणारच आहे. वसाहतवादी सत्तांमध्ये अंगोलाचे 'वाटप' होण्यास प्रतिबंध करणारी एकच शक्ती आज तेथे आहे, ती म्हणजे एम. पी. एल. ए.

मला असेही वाटते की, या बाबतीत दक्षिण आफ्रिकेने घेतलेल्या पुढाकारातील धोके स्तंभलेखकांना पुरेसे उमगले नसावेत. प्रत्यक्षात युनिटा ही एक नामधारी शक्ती असून तिचे पितृत्व दक्षिण आफ्रिकेतील वंशद्वेष्टया राजवटीकडेच जाते. या वंशद्वेष्टयांनी अंगोलाशेजारच्या नामिबियाला गुलामीत ठेवले आहे. त्याविरुद्ध तेथे 'स्वापो 'च्या नेतृत्वाखाली विमोचन-चळवळ चालू असून एम. पी. एल. ए. चे सरकार अंगोल्यात स्थिर झाल्यास या चळवळीला पाठिंबा मिळेल व तेथील क्रांतिकारकांना शेजारी सुरक्षित स्थान लाभेल ही आहे वंशद्वेष्टया दक्षिण आफ्रिकन राजवटीची खरी भीती.

## भारत व आफ्रिचे जिव्हाळ्याचे समान हितसंबंध

येथे मला एक मुद्दा भर देऊन सांगावासा वाटतो. अंगोलाचा संग्राम म्हणजे दक्षिण आफ्रिकी वंशद्वेष्टया राजवटीविरुद्ध होणाऱ्या संघर्षाची केवळ नांदीच होय. या राजवटीच्या पाशवी वंशद्वेष्टया कारवाया हाणून पाडण्यामध्ये भारताचे तसेच आफ्रिकेचे समान हितसंबंध गुंतलेले आहेत, असे भारतीय सरकार व जनता मानते व ते योग्यच आहे. महात्मा गांधी आफ्रिकेत होते तेव्हापासून आजतागायत आफ्रिकी लोकांप्रमाणेच भारतीयही गोऱ्या वंशद्वेष्टयांच्या जुलमी राजवटीत भरडून निघाले आहेत, याची आठवण 'माणूस 'च्या वाचकांना करून देण्याची गरज नाही.

खरोखरच हा प्रश्न अतिशय निकडीचा बनला आहे. दक्षिण आफ्रिकेतील सायमन्स टाउनच्या नाविक तळाचा विकास करून त्याला नॅटोच्या तळाचे स्वरूप द्यावे अशी सूचना अमेरिकेने उघडपणे केलेली आहे. हिंदी महासागरात उभारण्यात येणाऱ्या नौदल-हवाईदलाच्या तळांच्या साखळीतील हा एक महत्त्वाचा दुवा राहील. हिंदी महासागराची तटस्थता व शांतता बिघडविणाऱ्या दिएगो गार्शियाच्या तळाविरुद्ध भारत सरकारने तीव्र निषेध नोंदवला आहे. त्याच दिएगो गार्शियाच्या तळाला हा सायमन्स टाउनचा तळ पूरक ठरेल. दक्षिण आफ्रिकी वंशद्वेष्टया राजवटीबरोबर असे उघड संबंध प्रस्थापित करण्याबाबत पश्चिम युरोपीय राष्ट्रे उत्सुक असल्याने हा तळ केवळ आपण दोघांच्या बळावर विकसित करू, असे दक्षिण आफ्रिकेने अमेरिकेला आता सुचवले आहे.

## सोविएत साहाय्य काही नवीन नाही !

एम. पी. एल. ए. ची बाजू कमकुवत होऊ लागल्याचे पाहताच रशियन कुमक वाढली असा अभिप्राय 'माणूस 'चे स्तंभलेखक देतात. याबाबत मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो. एम. पी. एल. ए. ला होणारे सोविएत-साहाय्य–होय शस्त्राचे साहाय्य सुद्धा–ही काही अलीकडेच घडलेली घटना नव्हे ! १९६१ पासूनच एम. पी. एल. ए. ने पोर्तुगीज वसाहतवाद्यांविरुद्ध कडवा गनिमी संग्राम चिकाटीने व निर्धाराने केलेला आहे. (सोविएत शस्त्रे वापरण्यात आली ती यासाठीच) त्याच वेळी एम. पी. एल. ए. ने भूमिगत जनआंदोलनही उभे केले. म्हणूनच अंगोल्याच्या सर्व जमातींमधून या संघटनेला पाठिंबा आहे. श्री. रानडे समजतात तसा केवळ किंबुडूंचाच पाठिंबा एम. पी. एल. ए. ला नाही. सर्व जमातींचा एम. पी. एल. ए. ला असलेला पाठिंबा आणि अनेक वर्षे पोर्तुगीज तुरुंगात काढलेल्या नेत्यांचा त्याग म्हणजे अंगोलाची अखंडता अभंग राहण्याची ग्वाहीच होय. परकीय मक्तेदारांना अंगोलाची पुनः लूट करण्याची संधी अंगोला देणार नाही, याची ग्वाही होय.

'टाइम्स ऑफ इंडिया 'चे साक्षेपी समीक्षक श्री. जी. एम. तेलंग यांचे भाष्य या संदर्भात उद्धृत करणेच सगळ्यात उत्तम होय, असे मला वाटते. १८ नोव्हेंबरच्या अंकात (मुंबई आवृत्ती) त्यांनी टांझानियाचे अध्यक्ष, आफ्रिकेतील विख्यात स्वातंत्र्ययोद्धे न्येरेरे यांच्या मताचा हवाला दिलेला आहे. श्री. तेलंग लिहितात, 'त्यांनी (न्येरेरे यांनी) असे दाखवून दिले आहे की, एम. पी. एल. ए. ला गेली अनेक वर्षे सोविएत साहाय्य मिळत आहे आणि म्हणूनच आता जर असे साहाय्य मिळत राहिले तर त्यात 'काही तरी काळेबेरे आहे व एम. पी. एल. ए. आणि मॉस्को यांचे संगनमत झाले आहे' असे मानण्याचे मुळीच कारण नाही. त्याच्याही पुढे जाऊन सोविएत कुमक व पोर्तुगीज सत्तेची अखेर झाल्यावरच अंगोल्यातील इतर गटांना मिळू लागलेली परकीय शस्त्रास्त्रे या दोन गोष्टींमध्ये न्येरेरे फरक करतात. पोर्तुगीजांच्या बहिर्गमनानंतर शस्त्रे धाडण्यास सुरुवात करणाऱ्या राष्ट्रांनीच अंगोल्याचा प्रदीर्घ गनिमी संघर्ष चालू असताना साधे शुद्ध मानवतावादी स्वरूपाचे साहाय्य देण्यासही नकार दिलेला होता, या मुद्द्यावर न्येरेरे यांनी ठासून भर दिलेला आहे व हे योग्यच होय.

श्री. तेलंग पुढे म्हणतात, 'या संदर्भात एका गोष्टीची दखल घेतली पाहिजे. टांझानियाचे राष्ट्राध्यक्ष व चिनी नेते यांच्यामध्ये गेली अनेक वर्षे अत्यंत घनिष्ठ संबंध आहेत आणि काही झाले तरी त्यांचा कल सोविएत युनियनकडे आहे असा आरोप कुणीही सुबुद्ध माणूस करू शकणारच नाही...'

एम. पी. एल. ए. म्हणजे परकीय सहाय्याने लढणाऱ्या अनेक बाजूंपैकी केवळ एक बाजू आहे, या टीकेला हे उत्तर पुरेसे होईल. शस्त्रास्त्रे व इतर सहाय्य दिल्याबद्दल आम्ही सोविएत युनियनचे आभार मानतो; पण भावी अंगोला म्हणजे 'तिसऱ्या' जगातील राष्ट्रगटांचाच एक सदस्य बनेल यात मुळीच शंका नाही. यापेक्षा अंगोल्याचे भवितव्य वेगळे असेल अशी अपेक्षा अंगोला बाळगत नाही, सोविएत युनियन बाळगत नाही वा इतर कुणीही सुबुद्ध बाळगत नाही.

## चीनची भूमिका

एफ. एन. एल. ए. व युनिटा यांना चीनने पाठिंबा दिल्याची नोंद आपल्या स्तंभलेखकांनी घेतलेली आहे. वंशद्वेष्टयांच्या भाडोत्री फौजांना चिनी शस्त्रास्त्रे वापरण्याचे धडे

पृष्ठ ३१ वर

काहींचे म्हणणे केवळ तात्कालिक समाजाचे जिवंत चित्रण या जातककथांतून आढळते. हे संपूर्णपणे खरे असते तर कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनात पु. ल.–दुर्गाबाई यांनी जातककथांचा आश्रय का घेतला ?

# महासुपिन जातक

दुर्गा भागवत

जेतवनात राहात असताना शास्त्याने सोळा महास्वप्नांसंबंधी सांगितलेली ही गोष्ट.

एकदा कोसलराजा रात्री निजलेला असताना रात्रीच्या शेवटच्या प्रहरी सोळा महास्वप्ने पडून तो घाबरून उठला आणि बिछान्यावर निजूनच चिंता करीत राहिला. त्याला मरणाचे एवढे भय वाटले की त्याला जराही हालचाल करवेना. तो तसाच पडून राहिला.

पहाट झाली आणि ब्राह्मण आणि पुरोहित त्याच्याकडे आले आणि म्हणाले, 'महाराज, झोप चांगली लागली होती ना ?'

'आचार्यांनो, सुखाची झोप कुठली ? रात्रीच्या शेवटच्या प्रहरी मला सोळा महास्वप्ने पडली नि ती पाहून मी अगदी घाबरून गेलोय. आचार्यांनो, त्यांचा अर्थ काय ते मला सांगा!'

'स्वप्नं ऐकली की मग सांगू.'

मग राजाने त्यांना आपल्याला पडलेली स्वप्ने सांगितली.

ती स्वप्ने ऐकून ते ब्राह्मण हात झटकू लागले.

'तुम्ही हात असे का झाडता ?' असे राजाने विचारले, तेव्हा ते ब्राह्मण म्हणाले,

'महाराज, ही फार दुष्ट स्वप्ने आहेत!'

'त्यांच्यामुळे काय होईल ?' राजाने विचारले.

ते म्हणाले, 'राज्याची, तुमच्या स्वतःची, किंवा धनाची हानी होईल!'

'हे टाळायला काही उपाय आहे ?'

'खरं म्हटलं तर ही स्वप्नं दुश्चिन्हांची आहेत. त्यांच्यापासून होणारा अपाय टाळायला उपायच नाही; पण आम्ही जर असा तोडगा शोधून काढला नाही, तर आमच्या विद्येचा उपयोग काय ?'

'मग हे अरिष्ट टाळायला तुम्ही काय उपाय सुचवता ?'

'महाराज, जिथं-जिथं चार रस्ते एकत्र मिळतात त्या चौका–चौकावर आपण यज्ञ करू!'

'आचार्यांनो, माझं जगणं तुमच्या हातात आहे. त्वरा करा आणि माझं रक्षण होईल असं स्वस्तिकर्म करा!' राजा अगदी घाबरून म्हणाला.

पुष्कळ पैसा आणि खूपसं हरतऱ्हेचं अन्नबिन्न आपल्याला मिळेल असे ब्राह्मणांच्या मनात आले. तेव्हा राजाला 'घाबरू नका' असे आश्वासन देऊन अतिशय संतुष्ट होऊन ते ब्राह्मण राजवाड्यातून बाहेर पडले.

नगराबाहेर चौकावर त्यांनी यज्ञासाठी गर्ता तयार केली. मग अव्यंग आणि निरोगी असे पुष्कळ पशू त्यांनी यज्ञाच्या यूपांना बांधले. असंख्य पक्षीदेखील आणले. तेवढ्यात त्यांना काही तरी कमी पडले आणि मग 'आम्हाला हे हवं, ते हवं' असे म्हणून लगबगीने ते राजाकडे आले. असे त्यांचे सारखे कशा–ना–कशाकरिता तरी वाड्या-कडे येरझारे सुरू होते.

मल्लिकादेवीने हा सारा प्रकार पाहिला आणि राजाकडे येऊन तिने विचारले, 'काय हो महाराज, हे ब्राह्मण सारखे धावपळ करीत तुमच्याकडे का येताहेत ?'

राजा म्हणाला, 'मला तुझा हेवा वाटतो. माझ्या कानात कुणी सापाचं विष आणून ओतलं तरी तुला ते कळायचं नाही, इतकी तू सुखावली आहेस!'

'म्हणजे काय महाराज ?'

'मला इतकी वाईट स्वप्नं पडली.' असे म्हणून राजाने तिला ती स्वप्ने सांगितली आणि तो म्हणाला, 'ब्राह्मण म्हणतात की राज्य, माझं जीवित किंवा धन या तिघांपैकी एक नष्ट होणार आणि हे अरिष्ट टळावं म्हणून ते यज्ञ करताहेत!'

'पण महाराज, या पृथ्वीवरचा आणि देवलोकातलासुद्धा जो सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मण आहे, त्याला आपण आपली स्वप्नं सांगून उपाय विचारलात का ?'

'कोण तो ब्राह्मण ?'

'महाराज, सर्वज्ञ, अत्यंत शुद्ध आणि ज्याच्यापाशी कुठलेही क्लेश नाहीत, असा श्रेष्ठ ब्राह्मण तुम्ही जाणत नाही ? तोच भगवान बुद्ध या स्वप्नांचा अर्थ सांगेल. जा महाराज, त्याला विचारा!'

'होय देवी !' असे म्हणून राजा बुद्धाच्या विहारात गेला. त्याने बुद्धाला वंदन केले आणि खाली बसला.

'आज सकाळीच महाराजांचं इथं कसं आगमन झालं ?' शास्त्याने मधुर वाणीने विचारले.

'महाराज, आज पहाटेच्या आधी मला सोळा विचित्र स्वप्नं पडली. त्यांनी मी इतका घाबरून गेलो की, ती मी ब्राह्मणांना

सांगितली. ब्राह्मण म्हणाले की, 'स्वप्नं अशुभ आहेत आणि अरिष्टांची शांती करण्यासाठी चार रस्ते एकत्र मिळतात तिथं यज्ञ करायला हवा.' त्याप्रमाणं ते यज्ञांच्या तयारीला लागले आहेत. त्यामुळे पुष्कळ प्राण्यांना आपलं मरण समोर येऊन ठेपलेलं दिसतं आहे. महाराज, आपण मनुष्यलोकात आणि देवलोकात सर्वश्रेष्ठ आहात. भूत, वर्तमान आणि भविष्य जाणणारे त्रिकालज्ञ आहात. तेव्हा माझ्या स्वप्नांचं फलित काय ते मला आपण कृपा करून सांगावं!'

'महाराज, तुमच्या स्वप्नांचा अर्थ आणि त्यांचं फलित काय हे जाणणारा माझ्यासारखा दुसरा कुणी नाही, हे खरं आहे; पण पहिल्यांदा मला तुम्हाला पडलेली स्वप्नं जशीच्या तशी सांगा पाहू!'

'ठीक आहे भन्ते!' असे म्हणून राजाने आपण पाहिलेली स्वप्ने क्रमाने सांगितली.

१ 'बैल, झाडे, वासरे आणि गायी।
घोडा, थाळी, भालू, मी कुंभ पाही॥
बघे चंदना, भात कच्चा तसे तळे।
शिळा तरुनी बुडतात भोपळे॥
बघे बेडक्या कृष्णसर्पा गिळीती।
२ सुपर्ण काकास अनुसरीती।
तसे लांडगे बोकडांनाच भीती॥

'भन्ते, मला हे सारं कसं स्वप्नात दिसलं? मला दिसलं की, चार काजळासारखे काळेकुळकुळीत बैल पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या चारी दिशांतून राजवाड्याच्या अंगणात झुंजीसाठी आले. चौफेर लोक त्यांची झुंज पहायला जमले; पण बैलांनी झुंजीचा नुसता वहाणा केला. ते हुंबरले, गरजले आणि झुंज न करताच निघून गेले! हे माझं स्वप्न. याचं फळ काय?'

'महाराज, या स्वप्नाचा परिणाम ना तुम्ही जिवंत आहात तोवर, ना मी जिवंत आहे तोवर घडून येणार; पण भविष्यकाळी माणसं धर्महीन झाली, राजे कृपण झाले, पुण्य कमी होत चाललं, वाईट वाटू लागलं आणि जगाचा विनाशकाळ येऊन ठेपला की, पाऊस चांगला पडणार नाही. ढगांचे पायच तोडले जातील. पिकं जळतील. दुष्काळ पडेल. ढग चारी बाजूंनी गोळा होतील. बायका भात आणि इतर धान्य उन्हात वाळत घालतात, ती भिजून जातील म्हणून टोपल्या घेऊन ती आत न्यायला लागतील आणि पुरुष हातात कुदळी घेऊन बाहेर आळी वगैरे करायला निघतील, तोवर बरसण्याचा वहाणा करून, विजा बाहेर सोडून, गर्जून ते ढग बैलांप्रमाणे पळ काढतील. या स्वप्नांचा परिणाम हा असा आहे. तुम्हाला त्याच्यापासून काही धोका नाही; पण ब्राह्मणांनी त्यांच्या व्यवसायाप्रमाणं तुम्हाला निराळंच सांगितलं!'

राजा म्हणाला, 'दुसरं स्वप्न असं की, जमीन भेदून लहान झुडपं वर येऊन हातभर उंच झाली नाहीत तोच त्यांना फळं-फुलं आली. याचा परिणाम काय होईल?'

'महाराज, याचा परिणाम असा की, जग नाश पावायची वेळ उत्पन्न झाली की माणसं अल्पायुषी होतील. भविष्यकाळी प्राणी तीव्र रोगाने ग्रासले जातील. लहान वयातच कुमारींना ऋतुप्राप्ती होईल. गर्भधारणा होईल आणि मुलं होतील; पण महाराज, तुम्हाला त्याच्यापासून काही भय नाही. आता तिसरं सांगा बरं!'

'नुकत्याच जन्मलेल्या वासरांचं दूध गायी त्याच दिवशी पिताहेत असं तिसरं स्वप्न पाहिलं. त्याचा काय परिणाम होईल?'

'याचा परिणाम भविष्यकाळी असा होईल की, माणसांतला वडीलधाऱ्यांबद्दलचा आदरभाव नष्ट होईल. आई-बाप किंवा सासु-सासरे यांची लाज न बाळगता लोक स्वतःच कुटुंबाचे पालनपोषण करतील, अन्न किंवा वस्त्रदेखील त्यांना वाटलं तरच ते वडील-माणसांना देतील. एरवी नाही. वडील माणसं अनाथ आणि पर-स्वाधीन होतील. वासरांचं दूध पिणाऱ्या गायींप्रमाणं मुलांची याचना करून जगतील!'

'भन्ते, मोठाल्या, बळकट आणि धुरीण अशा बैलांना गाडीला न जुंपताना गोऱ्हे जुंपलेले मला दिसले; पण ते बैल धुरा वाहू शकले नाहीत. ते तसेच उभे राहिले. गाड्या मग चालल्या नाहीत. असं चौथं स्वप्न पडलं.'

'महाराज, भविष्यकाळी जे राजे अधार्मिक असतील, त्यांना या स्वप्नाचा परिणाम भोवेल. पुढे कृपण आणि अधार्मिक राजे राज्य-कारभारात पुढचं पाहू शकणाऱ्या आणि उत्तम उपायांची योजना करण्यात कुशल अशा कार्यचतुर महामात्रांना, अधिकारी मोठ्या कार्यकर्त्यांना सन्मानानं वागवणार नाहीत. न्यायसभांत व्यवहारचतुर आणि वृद्ध अमात्यांना ठेवणार नाहीत. एवढंच नाही, तर ते मूर्ख तरुणांना मान देतील, त्यांना न्यायसभांत ठेवतील. त्या तरुणांना राज्यव्यवहाराचं आणि साध्या जगरहाटीचंसुद्धा ज्ञान नसल्यानं त्यांना ज्यामुळं गौरव प्राप्त झाला आहे, त्या कारभाराचं जोखड ते वाहू शकणार नाहीत आणि ते जोखड फेकून देतील! त्याचप्रमाणं शहाणे पण वृद्ध महाअधिकारी तो सारा भार वाहण्यास समर्थ असले तरीही आपल्याला कसं बाजूला टाकलं ते मनात येऊन मदत करायला पुढं येणार नाहीत! 'हे काम आमचं नाही. आम्ही वर्तुळाच्या बाहेर आहोत. मंडळाच्या आत जे पोरगे आहेत, त्यांनाच काय करायचं ते करू दे!' आणि मग ते बाजूला राहतील. राजांवर चहूकडून संकट ओढवेल. ज्यांना जू वाहता येत नाही अशा खोंडांवर ते टाकायचं आणि दणकट ओझ्याच्या बैलांवर ते टाकायचं नाही, या दोहोंमुळे जी गत व्हायची तीच होईल; पण तुम्हाला याच्यापासून भय नाही. आता सहावं स्वप्न सांगा!'

'भन्ते, मला एक अतिशय शोभिवंत असा सोन्याचा कुंभ दिसला. त्याचं मोल हजार नाण्यांचं तरी असावं. असा तो कुंभ काही माणसांनी हातांत धरला होता आणि एका म्हाताऱ्या कोल्ह्याला ते लोक त्यात मुतण्यासाठी सारखं विनवीत होते आणि अखेर तो पशु त्यात मुतताना मी पाहिला! माझं स्वप्न हे असं होतं. त्याचं फळ काय?'

'महाराज, या स्वप्नाचा परिणामदेखील भविष्यकाळीच दिसून यायचा आहे. अधार्मिक राजे, ते स्वतः जरी उच्च राजकुळात जन्मलेले असले तरी उच्च कुलोत्पन्न माणसांवर विश्वास टाकणार नाहीत, त्यांचा मान राखणार नाहीत. ते नीच कुळात जन्मलेल्या

१. इथे भाषांतर करताना क्रम थोडा बदलावा लागला. कच्चा भात व चंदन असा मूळ क्रम आहे.

२. इथे कथेत सुपर्णाचा अर्थ राजहंस असा आहे.

माणसांचा मात्र उदोउदो करतील. त्यामुळे उच्च कुळात जन्मलेले लोक खाली जातील आणि नीच वंशातले लोक सरदार–मानकरी होतील. त्याचप्रमाणे थोर कुळांतल्या माणसांना केवळ गरजेपोटी हलकट माणसांची सेवा करून चरितार्थ चालवावा लागेल आणि त्यांना आपल्या मुली लग्न करून द्याव्या लागतील. थोर घराण्यातल्या कुमारिकांचे संबंध नीच कुळातल्या पुरुषांशी, त्या सोन्याच्या कुंभात तो कोल्हा मुतला त्याप्रमाणंच होतील; परंतु या स्वप्नाची बाधा तुम्हाला होणार नाही. आता सातवं स्वप्न सांगा !'

'भन्ते, एक माणूस दोरी वळत होता. दोरी विणून झाली की तो ती खाली टाकून द्यायचा. तो बसला होता त्या बैठकीखाली एक भुकेलेली कोल्ही बसली होती. दोरी खाली पडली रे पडली की ती दोरी खाऊन टाकायची. त्या माणसाच्या लक्षात हे आलंच नाही. मी पाहिलं ते हे सातवं स्वप्न ! त्याचा पडताळा काय ?'

'हे स्वप्नदेखील दूर भविष्यकाळात प्रत्ययाला येणार आहे. त्या काळी स्त्रिया पुरुषांसाठी कामासक्त होतील. मद्य, दागदागिने, उंची वस्त्रं यांच्यासाठी त्या आतुर होतील. त्या हव्या तिथं भटकतील. सारे ऐहिक उपभोग भोगू पाहतील. दुष्टपणा आणि स्वैराचार अंगी बाणल्यामुळं या बायका आपल्या प्रियकरांबरोबर कडक मद्य पीत राहतील. त्यांच्या अंगावर फुलांच्या माळांची, उटण्यांची आणि सुगंधी द्रव्यांची उधळण झालेली असेल. प्रपंचातल्या अत्यंत निकडीच्या कामांकडेही त्या लक्ष न देता आपल्या प्रियकरांची, आपल्या दोस्तांची वाट पाहात तिष्ठत राहतील. अगदी बाहेरच्या भिंतीजवळ जाऊनसुद्धा त्या वाट पाहतील. एवढंच काय, पण त्या प्रत्यक्ष धान्याचं बियाणं, जे उद्या रुजून वर येऊन सर्वांना संतोष देणारं असतं, तेही कुटून टाकून मोकळ्या होतील ! अशा प्रकारानं त्यांच्या नवऱ्यांनी शेतात अतिशय कष्ट करून जे कोठार भरून टाकलेलं असेल, त्याची देखील या बायका विल्हेवाट लावतील आणि त्या बिचाऱ्यांचं सत्त्वशोषण करतील ! त्यांचं आयुष्यच त्या कोल्हिणीनं जशा दोऱ्या वळणाऱ्याच्या दोऱ्या गिळल्या तसं गिळून टाकतील; परंतु या स्वप्नाचं तुम्हाला काही भय वाटायला नको ! आता आठवं स्वप्न सांगा !'

'भन्ते, मी एक राजवाडा पाहिला. त्याच्या दरवाज्याजवळ एक खूप मोठा कुंभ होता. तो काठोकाठ पाण्याने भरलेला होता. त्याच्या भोवती बरेच रिकामे माठ होते. जवळच्या आणि लांबच्या चारी दिशांकडून चारी वर्णांच्या माणसांचे लोंढेच्या लोंढे येत होते. लहानशा मडक्यातून पाणी आणून ते लोक त्या भरलेल्या रांजणात ओतीत होते. त्यातून पाणी वाहून जाऊ लागलं, तरीदेखील लोक त्या रांजणात पाणी आणून ओतीत राहिले. त्या रिकाम्या रांजणाकडे मात्र कुणी ढुंकूनही बघत नव्हते. हे माझं आठवं स्वप्न ! याचं फळ काय ?'

'महाराज, या स्वप्नाचा प्रत्यय भविष्यकाळीच येईल, अगोदर येणार नाही. त्या काळी लोकांचा ऱ्हास होईल, राज्य दुर्बल होईल. राजेलोक निर्धन आणि कृपण होतील. अगदी पहिल्या श्रेणीच्या राजाच्या भांडारातदेखील एक लक्ष मुद्रांखेरीज अधिक द्रव्य मिळणार नाही. मग आपल्या द्रव्याच्या गरजेसाठी हे राजे खेड्यातल्या लोकांना आपल्यासाठी राबवतील. धान्य पेरणं, लावणं, कापणं, मळणं, झाडणं आणि खळ्यातून कोठीत भरणं, ही सारी कामं राजे त्यांच्याकडून स्वतःसाठी करवून घेतील. उसाचे चरक त्यांना चालवायला लावतील. गुऱ्हाळात रस आटवून गूळ करायला लावतील. राजांसाठी ते लोक फुलबाग आणि फळबाग आणि मळे तयार करतील. त्यातली फळफळावळ राजांना देतील. याप्रमाणं विविध प्रकारचं उत्पन्न काढून ते राजांची कोठारं शिगेपर्यंत भरून टाकतील. स्वतःची कोठारं रिकामीच पडलेली आहेत याच्याकडे ते लक्ष देणार नाहीत. भरलेला घडा आणखी भरण्यासारखं आणि रिकाम्या घड्याकडे दुर्लक्ष करण्यासारखंच आहे हे; परंतु त्याचं भय तुम्हाला वाटायला नको ! आता नववं स्वप्न सांगा !'

'भन्ते, मला असं दिसलं की, एक चौफेर घाट असलेली पुष्करिणी आहे आणि तिचे काठ पाच तऱ्हेच्या कमळांच्या वेलींनी गच्च भरून गेले आहेत. चहूकडून दोन पायांचे आणि चार पायांचे असे प्राणी मोठ्या जमावानं तिथं पाणी प्यायला गोळा झाले आहेत. तलावाच्या मध्यभागातलं पाणी उथळ आणि गढूळ होतं; पण काठावरचं पाणी स्वच्छ आणि चमकत होतं. सारे प्राणी तळ्याच्या आत शिरून पाणी पीत होते. हे माझं नववं स्वप्न. याचा पडताळा काय ?'

महाराज, या स्वप्नाचं फळदेखील भविष्यकाळातच दिसायचं आहे. या वेळी राजे अधार्मिक झालेले असतील. मन मानेल तसा आणि स्वतःच्या ख्यालीखुशालीला उपयोगी पडेल, त्या तऱ्हेनं ते कारभार करतील. हे राजे संपत्तीची भयंकर हाव धरतील. लाचलुचपतीनं गबरू होतील. लोकांबद्दल दया, माया, ममता ते मुळीसुद्धा दाखवणार नाहीत. ते क्रूर आणि भयंकर होतील. ऊस चरकात घालून पिळावा, त्याचप्रमाणं ते प्रजेला पिळून धन गोळा करतील. प्रजेकडून कर म्हणून पै न पै शेवटपर्यंत गोळा करतील. असा जुलमी कर भरणं शक्य न झाल्यामुळं लोक खेडी, नगरं मोठी शहरं वगैरे सोडून राज्याच्या कडेला असलेल्या भागात जाऊन राहातील. तळ्याचं पाणी मध्यभागी गढूळ आणि कडेला स्वच्छ होतं, तसंच हे आहे. देशाचा मध्यभाग, त्याचं हृदय, त्याचं केंद्र म्हणजे एक रानवट होईल आणि कडेकडेचे भाग लोकांनी गजबजून जातील. मध्यभागी तळं गढूळ आणि कडेला स्वच्छ होतं तसंच; पण तुम्हाला त्याचं भय नको. आता दहावं स्वप्न सांगा !'

'भन्ते, मी एका भांड्यात भात शिजताना पाहिला; पण तो नीट शिजत नव्हता. त्याचे वेगळे भाग शिजून त्याचा गिच्च गोळा झाला होता. दुसरा भाग मात्र कच्चाच राहिला होता आणि एक भाग मात्र उत्तम शिजला होता. हे माझं दहावं स्वप्न. याचा पडताळा काय ?'

'महाराज, या स्वप्नाचा प्रत्ययदेखील भविष्यकाळाच्या अगोदर येणार नाही. त्या वेळी राजे धर्महीन होतील. राजाच्या सभोवार असलेली माणसे देखील तशीच धर्महीन असतील. ब्राह्मण, व्यापारी, नागरिक, शूद्र सारेच अधार्मिक होतील. याला अपवाद संन्यासी लोकांचादेखील असणार नाही. मग ज्या देवतांना, वृक्षदेवतांना, आकाशदेवतांना लोक बळी देतात, त्या देवता देखील अधार्मिक होतील. जे वारे या अधार्मिक राजांच्या राज्यांवरून वाहातील, ते देखील क्रूर आणि मोकाट असतील. आकाशात असणारी देवतांची वस्तीची ठिकाणं ते हलवतील आणि त्या ठिकाणी राहणाऱ्या देवतांचा कोप जागृत

करतील. त्यामुळं पाऊस पडणार नाही आणि जर पडलाच तर सर्व राज्यावर एकदम पडणार नाही. लोकांच्या गरजा भागवावयला तो पुरा पडणार नाही. सर्व राज्यात त्याचप्रमाणे एकेका जिल्ह्यात, प्रत्येक खेड्यात, प्रत्येक तळ्यात एकदम पाऊस पडणार नाही राज्यभर-देखील तो एका वेळी पडणार नाही.जर वरच्या भागाला पाऊस पडला, तर खालच्या भागात तो पडायचा नाही. एकीकडे अतिवृष्टीमुळे पिके नासून दुष्काळ पडेल, तर दुसरीकडे अवर्षणामुळं तसंच घडेल आणि कुठं कुठं मात्र चांगला पाऊस झाल्यामुळं पिकं चांगली येतील. अशा तऱ्हेनं एकाच राज्यात पेरलेली पिकं, भांड्यातल्या त्या भातासारखी, एका तऱ्हेची राहणार नाहीत. तरी पण त्याचं भय तुम्हाला नाही. आता तुमचं अकरावं स्वप्न सांगा !'

'भन्ते, मी चंदनाच्या मोबदल्यात ताक विकताना पाहिलं. चंदनाचं मोल लाख मुद्रांचं होतं. हे माझं अकरावं स्वप्न ! याचा पडताळा काय ?'

'महाराज, या स्वप्नाचा प्रत्यय देखील भविष्यकाळीच येईल. त्या काळी माझ्या धर्माचा ऱ्हास झालेला असेल. त्या वेळी अधार्मिक, निर्लज्ज भिक्षू खूप होतील आणि जो मी माझा धर्म लोभाला खाली घालण्यासाठी शिकवला, तो धर्म हे लोक पोटासाठी शिकवतील. पोट मागं लागल्यामुळं त्यांचा विवेक जाईल. ते पाखंडी लोकांच्या नादी लागतील. त्यांची शिकवण निर्वाणाला पोचणारी असणार नाही. एवढंच काय पण ते प्रवचन देतील ते इतक्या मोहक शब्दांत आणि गोडवाणीनं देतील की, लोकांनी आपल्याला उंची वस्त्रं आणि इतर गोष्टी द्याव्यात. लोकांना अशी दानं करायला ते प्रवृत्त करतील, मग दुसरे भिक्षू कुणी राजरस्त्यावर, तर कुणी कोपऱ्यावर, तर कुणी राजाच्या वाड्याच्या दाराशी जाऊन बसतील आणि धन मिळविण्याच्या हेतूनं प्रवचन देऊ लागतील. होय, कार्षापण, अर्ध–कार्षापण, माषक, रुपी ' ( त्या काळची नाणी ) मिळवण्यासाठीसुद्धा ते असं करतील. अशा तऱ्हेनं माझ्या निर्वाणाच्या मोलाचा धर्म ते दिडकी-दुगाणीसाठी आणि अन्नासाठी विकून टाकतील. लाखमोलाचं चंदन ताकासाठी विकलं जावं, तसंच हे आहे; पण याचं भय तुम्हाला नाही. आता तुमचं बारावं स्वप्न सांगा!'

'भन्ते, मला तुंबे पाण्यात बुडताना दिसले. त्याचा परिणाम काय होईल ?'

'महाराज, हे स्वप्नसुद्धा भविष्यकाळीच फळणार आहे. त्या वेळी राजे धर्महीन आणि सारं जगच उलटं झालेलं असेल. त्या वेळी राजेलोक उच्चकुलोत्पन्न सरदारांचा, मानकऱ्यांचा मान ठेवणार नाहीत. ते नीच वंशात जन्मलेल्यांचा सत्कार करतील. ते नीच लोक मोठेमोठे अधिकारी होतील आणि खरे उच्च कुळातले लोक दारिद्र्यात बुडतील. राज्यसभेत, राजद्वारी, न्यायसभेत इतर सभांतून सर्वत्र हे नीच वंशांतले लोकच प्रतिष्ठा पावतील. हे लोक त्या रिकाम्या भोपळ्यासारखे आहेत. प्रतिष्ठा मिळाल्यानं ते खाली जाऊन तळाशी घट्ट बसून राहिल्यासारखे होतील. त्याचप्रमाणं भिक्षूंच्या सभेत भिक्षापात्र, वस्त्र, विहार वगैरेंच्या बाबतीतसुद्धा केवळ जे दुष्ट आणि दुराचारी असतील, अशांचीच सल्लामसलत घेतली जाईल. विनयशील भिक्षूंना कुणी विचारणार नाही. यांच्याच हाती सारी सत्ता जाईल. त्यामुळं सर्वत्रच रिकामा भोपळा बुडल्यासारखी अवस्था होईल. तरी पण तुम्हाला याचं भय नाही. तुम्ही मला तुमचं तेरावं स्वप्न सांगा!'

'भन्ते, मी घराएवढचा मोठ्या शिळा, नावा पाण्यावर तरंगाव्या तशा तरंगताना पाहिल्या; तर याचा परिणाम काय होईल ?'

'महाराज, मागच्याप्रमाणं याचा परिणामसुद्धा भविष्यकाळीच दिसून यायचा आहे. या वेळी अधार्मिक राजे अकुलीन लोकांचा आदर करतील. ते लोक मोठ्या पदावर असतील आणि मूळचे सत्कुळातले लोक दरिद्री होतील. राज्यसभेत, राजद्वारी, अमात्यसभेत, न्यायसभेत पंडितांच्या शब्दाला मान राहणार नाही.जडशिळा म्हणजे हेच धर्म-पंडित होत. त्यांचे शब्द वरच्यावर तरंगत जातील. माणसांच्या अंतः-करणात ते रुतून बसणार नाहीत. ते बोलू लागले की हे द्वाड लोक म्हणतील, 'हे लोक काय बोलताहेत ?' याप्रमाणंच भिक्षूंच्या सभेत देखील शहाण्या आणि श्रेष्ठ थेरांना मान दिला जाणार नाही. त्यांचे शब्द खोल उतरणार नाहीत. ते वरवरच जातील. पाण्यात तरंग-णाऱ्या शिळांप्रमाणंच हे आहे; पण तुम्हाला त्याचं भय नाही. आता तुमचं चौदावं स्वप्न सांगा!'

'भन्ते, मला असं दिसलं की, अगदी छोटयाशा फुलाएवढे बेडूक सापांच्या मागे लागले आहेत त्यांना पकडून कमळाच्या देठांसारखे कचाकचा तोडून गिळून टाकताहेत. तर याचा परिणाम काय ?'

'महाराज, या स्वप्नाचा परिणामदेखील भविष्यकाळीच दिसून येणार आहे. त्या वेळी जगाचा ऱ्हास होत असेल. त्या वेळी माणसांच्या वासना उग्र होतील. त्यांच्या कामेच्छा बळावतील. इतक्या की आपल्या बायकांपैकी सर्वात लहान स्त्रीवर ते तात्पुरतं देहभान विसरून भुलून जातील. दासदासी, गाईम्हशी, सोनेचांदी नि घरातली सारी चीजवस्तू तिच्याच ताब्यात राहील. जर बिचाऱ्या नवऱ्यानं एखादं वस्त्र किंवा पैसा कुठं आहे म्हणून विचारलं, तर लगेच ती बायको म्हणेल, 'तुम्हाला काय करायचं आहे नसता चोंबडे-पणा करून ? तुमचं तुम्ही बघा !' किंवा ती साफ सांगेल की, 'ते माझ्या घरात नाही !' याप्रमाणं बायका आरडूनओरडून जिभेच्या सुरीनं भोसकून नवऱ्यांना नोकराचाकराप्रमाणं वागवतील. लहान फुलाएवढ्या बेडकुळ्या मोठ्या काळ्या सापांना खातात, तसंच हे. पण तुम्हाला त्याचं भय नाही. आता पंधरावं स्वप्न सांगा !'

'भन्ते, मी असं पाहिलं आहे की, सुवर्ण असं नाव पडलेले सोनेरी राजहंस सर्व दुर्गुणांनी परिपूर्ण अशा गावात चरणाऱ्या कावळ्यांची सेवा करताहेत. त्याचा परिणाम काय ?'

'महाराज, हे स्वप्नही भविष्यकाळीच कळेल. त्या वेळी राजे दुर्बल असतील. त्या वेळी राजांना हत्तीच्या विद्येचं ज्ञान नसेल. इतरही विद्या त्यांना येणार नाहीत. रणात ते भ्याड असतील. आपली राज्यावरून उचलबांगडी होईल, या भीतीनं ते आपल्या मानकऱ्यांचा दर्जा वाढव-णार नाहीत; पण स्नान घालणाऱ्या सेवकांचा, न्हाव्यांचा आणि अशाच तऱ्हेच्या लोकांची प्रतिष्ठा वाढवतील. याप्रमाणे राजाच्या मर्जीतून उतरल्यावर या उद्धट लोकांचा चरितार्थ चालावा म्हणून मूळच्या दरबारी लोकांना सेवा करण्यावाचून गत्यंतर राहणार नाही. काव-ळ्याची सेवा सोनेरी राजहंसांनी करावी, तसंच हे आहे; तरी पण तुम्हाला त्याचं भय नाही. आता सोळावं स्वप्न सांगा !'

'भन्ते, पूर्वी लांडगे बोकडांना खायचे; पण मी पाहिलं की, एडके

लांडग्यांचा पाठलाग करत होते. मग कांही भित्रे लांडगे बोकडांना पाहून दुरूनच पळाले आणि दाट झुडुपात लपून बसले. याचा परिणाम काय ?'

'महाराज, याचाही परिणाम भविष्यकाळीच दिसून येणार आहे. अकुलीन असे राजाचे लाडके लोक सत्ताधीश होतील आणि कुलीन अज्ञात राहून दरिद्री होतील. ते अकुलीन लोक राजाला आपण म्हणू ते करायला लावतील. ते न्यायसभेत बलिष्ठ होतील. ते वंशपरंपरेनं चालत आलेली कुलीनांची शेतीभाती पाहून 'ही आमचीच आहे' असं ते म्हणतील, त्यांना वेताच्या फोकांनी मारतील. त्यांची मानगूट पकडून म्हणतील, 'आपली पत न ओळखता, मूर्खांनो, तुम्ही आमच्याशी भांडायला निघालात काय? पण राजाला तुमचा हा उद्दामपणा कळल्याशिवाय राहायचा नाही. त्याला सांगून आम्ही तुमचे हातपाय तोडायला लावून तुम्हाला चांगली शिक्षा देववू. मग त्यांच्या दहशतीमुळं, 'आमच्या वस्तू नाहीत, तुमच्याच आहेत. घ्या !' अशी त्या राजाच्या लाडक्या माणसांची मनधरणी करतील. मग ते तसेच घरी जातील आणि भयानं आणखीच व्याकुळ होऊन राहतील. त्याचप्रमाणं दुष्ट भिक्षूदेखील सज्जन भिक्षूंना मन मानेल तसं छळतील. इतकं की, ते विचारे कुणीच त्राता नाही असं पाहून अरण्यात निघून जातील. कुलीनांना अकुलीनांकडून होणारा आणि चांगल्या भिक्षूंचा दुष्ट भिक्षूंकडून होणारा छळ लांडग्यांनी बोकडांना भ्यावं तशाच प्रकारचा आहे; पण त्याचं भय तुम्हाला नाही. ब्राह्मणांनी तुम्हाला जे सांगितलं, त्यात सत्य नव्हतं. त्यात तुमच्याबद्दल जिव्हाळा नव्हता. त्याच्या मागं फक्त हव्यास होता. त्यांचे उद्गार केवळ स्वार्थासाठी निघालेले होते !'

याप्रमाणे शास्त्याने त्या सोळा स्वप्नांचा अर्थ सांगितला आणि तो म्हणाला, 'महाराज, ही स्वप्नं पडलेले तुम्हीच काही पहिले नाही. पूर्वीच्या राजांनासुद्धा ही स्वप्नं पडलेली आहेत. पूर्वीदेखील आताप्रमाणंच ब्राह्मणांनी यज्ञ करण्यासाठी बहाणा करून त्यांचा उपयोग केला. बोधिसत्त्वाला राजानं विचारलं, तेव्हा त्यानंदेखील या स्वप्नांचा मी आता केला, तसाच उलगडा केला.' असे म्हणून त्याने ही गोष्ट सांगितली.

'पूर्वी वाराणशीत ब्रह्मदत्त राज्य करीत असताना बोधिसत्त्व उदीच्च ब्राह्मण कुळात जन्माला आला. वयात आल्यावर त्याने संन्यास घेतला आणि तो तापस झाला. त्याला अभिज्ञा आणि सभापती (पारमार्थिक ज्ञान आणि सिद्धी) प्राप्त झाल्या. तो हिमालयात ध्यानधारणा करीत सुखाने रहात होता.

त्या वेळी वाराणशीतल्या राजाला अशीच स्वप्ने पडली. राजाने त्या स्वप्नांचे फळ काय म्हणून ब्राह्मणांना विचारले आणि त्या वेळीही ते ब्राह्मण आत्ताप्रमाणेच अरिष्टशांतीसाठी यज्ञ करू लागले.

त्या ब्राह्मणांत राजाच्या पुरोहिताचा शिष्य होता. तो तरुण असून मोठा विद्वान आणि शहाणा होता. तो पुरोहिताला म्हणाला, 'आचार्य, तुम्हीच मला तिन्ही वेद शिकवलेत. त्यातल्या एकात 'एकाला मारलं तर दुसऱ्याला जीवदान मिळत नाही' असं म्हटलं आहे.'

'मुला, याच्यामुळं आपल्याला पुष्कळ द्रव्य मिळणार आहे; पण तुला तर राजाचं धन कसं वाचवावं याचीच काळजी लागलेली दिसते !'

त्यावर तो शिष्य म्हणाला, 'असं असेल तर आचार्य, तुम्ही तुमचं काम करा. तुमच्याजवळ राहून मी काय करू?' असे म्हणून तो राजाच्या उद्यानात गेला.

त्याच दिवशी बोधिसत्त्वदेखील ते कारण ओळखून 'आज मी माणसांच्या वस्तीत गेलो तर पुष्कळांची बंधनातून सुटका होईल' असा विचार करून आकाशमार्गाने येऊन त्या उद्यानात उतरला आणि सोन्याच्या मूर्तीप्रमाणे दिसणारा तो एका मंगल पीठावर जाऊन बसला.

तो मुलगा बोधिसत्त्वाजवळ गेला. त्याने त्याला वंदन केले. तो एका बाजूला खाली बसला आणि त्याने बोधिसत्त्वांशी बोलून मैत्रीची भावना दर्शविली. बोधिसत्त्वानेही त्याच्या मैत्रीच्या भाषणाला गोड प्रत्युत्तर दिले आणि त्याने विचारले, 'काय रे मुला, राजा धर्मानं राज्य करतो का ?'

'भन्ते, राजा खरोखर धार्मिक आहे; पण ब्राह्मण त्याला नको ते करायला लावताहेत ! राजाला सोळा स्वप्नं पडली. त्यांचा परिणाम काय ? असं राजानं त्यांना विचारलं. तेव्हा ब्राह्मणांनी सांगितलं की, 'यज्ञ करू या !' त्याप्रमाणे त्यांनी तयारी चालविली. भन्ते 'या स्वप्नांचा परिणाम असा आहे.' असं राजाला समजावून सांगून तुम्हाला एवढ्या थोरल्या जिवाची भयापासून सुटका नाही का करता येणार ?'

'मुला, आम्ही राजाला ओळखत नाही. राजा सुद्धा आम्हाला ओळखत नाही; तरी पण जर राजा इथं येऊन त्यानं आम्हाला विचारलं तर आम्ही सांगू !'

तेव्हा तो मुलगा म्हणाला, 'भन्ते, मी राजाला आणतो. मी येईपर्यंत तुम्ही थोडा वेळ बसून राहा !'

असे बोधिसत्त्वाला सांगून तो मुलगा राजाजवळ गेला आणि म्हणाला, 'महाराज, एक आकाशचारी तापस तुमच्या उद्यानात उतरला आहे. तुम्हाला जी स्वप्नं दिसली त्याचा परिणाम काय होईल ते मी सांगेन, असं म्हणून त्यानं तुम्हाला बोलवायला सांगितलं आहे.'

राजाने त्याचे बोलणे ऐकले आणि तो मोठा परिवार घेऊन उद्यानात गेला. त्याने त्या तापसाला वंदन केले व त्याच्या एका बाजूला बसून त्याने विचारले, 'तुम्ही मला दिसलेल्या स्वप्नांचे फळ जाणता ?'

'होय महाराज.पण मला अगोदर ती स्वप्नं काय आहेत ते सांगा!'

'सांगतो भन्ते.'

'स्वप्नं दिसली तशी मला ऐकवा.'

'ठीक आहे भन्ते.' असे म्हणून राजाने 'बैल, झाडे, वासरे आणि गायी' पासून प्रारंभ करून 'लांडगे बोकडांनाच भितील' अशी पसेनादि राजाने वर सांगितल्याप्रमाणे स्वप्ने सांगितली, तशीच यानेही सांगितली.

'पुरे झालं. तुम्हाला त्याच्यापासून भय नाही. कसलाही धोका नाही !' असे राजाला आश्वासन देऊन आणि पुष्कळशा प्राण्यांना बंधनातून मुक्त करून बोधिसत्त्व फिरून आकाशात अधांतरी बसला. त्याने राजाला उपदेश केला, पंचशीले त्याला घ्यायला लावली आणि 'त्याच्यापुढं महाराज, ब्राह्मणांच्या नादी लागून पशूंची हत्या होईल असे यज्ञ करू नका !' असे सांगून राजाला धर्मोपदेश करून बोधिसत्त्व आपल्या स्थानी निघून गेला. राजानेही त्याचा उपदेश मानला. दान वगैरे पुण्य करून तो मृत्यूनंतर योग्य गती पावला. शास्त्याने हा धर्मोपदेश केल्यानंतर 'स्वप्नापासून तुम्हाला भय नाही' असं पसेनादी राजाला सांगून यज्ञ बंद केला आणि पुष्कळशा प्राण्यांना जीवदान देऊन प्रसंग पाहून ही जातकाची गोष्ट सांगितली. तो म्हणाला, 'त्या वेळी आनंद राजा होता, सारिपुत्त शिष्य होता आणि मी तापस होतो.' □ □

[ 'गर्जना' (कोल्हापूर) साहित्यसंमेलन विशेषअंकावरून पुनर्मुद्रित ]

# विचारस्वातंत्र्य आणि मराठी लेखक

आशा इंगळे

अनेक कारणांमुळे कऱ्हाडच्या साहित्य–संमेलनाचे औत्सुक्य वाढलेले होते. त्यामध्ये पु. ल.-दुर्गाबाईंचा गाजलेला व वाजलेला वाद हे सुद्धा प्रमुख कारण असू शकेल. कोणतेही भांडण औत्सुक्य निर्माण करते. मग ते लहानांचे असो की पु. ल.–दुर्गाबाईंसारख्या थोरामोठ्यांचं असो; पण प्रत्यक्ष संमेलनात प्रहारांची जागा हार–उपहारांनी घेतली... आणि अनेक चांगल्या गोष्टींचा ऊहापोह होऊ शकला... त्यापैकी विचारस्वातंत्र्य ही एक महत्त्वाची बाब होती. याची कुणकुण आधीच असल्यामुळे की काय यशवंतरावजी आपल्या भाषणात प्रारंभीच म्हणाले, 'मी एक राजकारणी माणूस. मी संमेलनास आलो त्यामुळे काही तरी घडेल अशी लोकांची अपेक्षा होती.' –खरे तर यशवंतराव जेथे जातात तेथे विशेष असं (त्यांच्यामुळे) काही घडत नाही. परिस्थिती अगदी 'जैसे थे' रहाते... किंबहुना ते परिस्थिती चांगल्या प्रकारे सांभाळू शकतात... अगदी आपल्या मंत्रीपदासारखी! –त्यांनी नंतर प्रतिपादन केलेलं 'साहित्यिक आणि राजकारणी यांचं सामंजस्य' मात्र काही समजलं नाही. कोणतंही सामंजस्य तीन प्रकारचे असू शकते. (१) 'होय'ला 'हो' म्हणून प्रतिपक्षाच्या सुरात आपला सूर मिळवणे. (२) मूग गिळून स्वस्थ बसणे. (जे करणे नेहेमीच सोपे असते... आणि जे आपण नेहेमीच करतो.) (३) आपला प्रवाह बदलून, वळवून दूर नेणे... जेणे करून छेद टळतील...

मी एका विदुषीजवळ ('विदुषी' हे केवळ विदूषकाचे स्त्रीलिंग समजू नये. 'विदुषी'ला स्वतंत्र अर्थ आहे : महिलागौरव!) हे 'विचारस्वातंत्र्य' वगैरे बडबडत असता मध्येच ती उखडली. 'नक्राश्रू आहेत हे तुमचे!' (आता त्या विदुषीने मलाही लेखकवर्गात सामावले याबद्दल माझा केवळ नाइलाज आहे!')

'नक्राश्रू?' मी विचारले.

'नाही तर काय? आतापर्यंत विचारस्वातंत्र्य होतं... प्रेसवर निर्बंध नव्हते... कोणी केला त्याचा उपयोग? आपले साहित्यिक भाषासामर्थ्याच्या दृष्टीने पुष्कळ 'ग्रेट' असतील; पण गॉर्कीच्या तोडीचा जिवंत समाजाचे चित्रण करणारा कुणी आहे का? गॉर्कीने लोकांना वेडं केलं... कारण त्याने लोकांच्या समस्या मांडल्या!'

मला गप्प बसणं भागच होतं... कारण स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनंतर 'Madness of the brave'च्या तोडीची गीतं जन्माला आली नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात साहित्य हे समाजाभिमुख होतं. टिळक, आगरकर, खाडिलकर यांनी साहित्य आणि राजकारण यांचे प्रवाह वेगळे केले नव्हते. त्या काळच्या काही ललितकलाकृतीही समाजव्यवस्थेचं चित्रण करणाऱ्या होत्या; पण स्वातंत्र्य मिळाल्यावर राजकारण व साहित्य यांचे प्रवाह वेगळे झाले... संपादक आपल्या अग्रलेखात जे काय लिहितील तेवढेच. लेखकवर्गाने मात्र चांगलीच पाठ फिरवली. (अर्थात संपादक हे 'लेखक' नाहीत असं मला म्हणायचं नाही... काही संपादक, 'संपादक' असूनही चांगलं लिहितात!)... राजकारण सोडून द्या... पण बदलती समाजव्यवस्था, त्यातली वावटळे फारशी समर्थपणे कुणी रंगवली नाहीत. बहुसंख्य जनता 'दलित' वर्गातली असल्यामुळे 'दलितसाहित्य हवे' चा पुकारा झाला. ही खरोखर चांगली गोष्ट आहे; पण दलितसाहित्याला आश्रय देणारी मासिकं किती आहेत? त्यांना वाचकवर्ग तरी पुरेसा आहे का? बहुतेक वाचक मध्यमवर्गातले... त्यांनाही हिंदी सिनेमासारखी सुखासीनतेची सवय लागलेली. (उदा. मराठीतली स्त्रियांसाठी चालवलेली मासिकं) बेडरूम, किचन, सभोवतालची बाग, सोफा... इ. इ. हवेच. मग दलितसाहित्य 'मळकट' म्हणून पान उलटवणारे वाचक कमी नाहीत. एक हौशी नाटककार Schedule tribes मधून आलेला; बोलताना म्हणाला– 'हे सारे लेखक सिमेंटच्या भिंतीत दडून गार सावलीत... सिगरेटच्या धुरात आमच्याबद्दल काही तरी विकृत कल्पना करून लिहितात... आमचं जीवन कदाचित त्याहीपेक्षा जास्त विकृत असेल; पण ते खरेखुरे मांडायला हवे.'


मी सहज म्हटले, 'तुम्ही ते जीवन जगला आहात...तुमचे अनुभव जास्त जिवंत असणार. तुम्हीच का लिहीत नाही?'

'आम्ही पुष्कळ लिहू हो...पण कमी पडते ती आमची भाषा. हल्ली साहित्याच्या अभिव्यक्तीने पुष्कळशी वळणे घेतलेली! त्यातून लहानपणापासूनच्या शारीरिक व मानसिक गुलामगिरीमुळे वाचन, लेखन, चिंतन याबाबतीत आनंदच! अगदी साध्या पद्धतीने मांडलेले अनुभव वास्तववादी असले तरी छापणार कोण? –आणि संपादकांना किंवा प्रकाशकांना तरी कुठे माहीत असते काय वास्तव आणि काय अवास्तव?'

त्या माणसाचा सूर निराशावादी असला तरी प्रॅक्टिकल डिफिकल्टी दाखवणारा होता.

'दलितसाहित्य' या प्रकाराशिवायही ज्या कलाकृती आहेत त्यांच्यात कितपत जीवनाच्या अंगरेखेला उठाव मिळालेला आहे? त्यातल्या काही जीवनाजवळून गेल्या असतील...वर्तुळाच्या स्पर्शरेषेप्रमाणे जीवनाच्या परिघाला (फक्त) एखाद्या बिंदूत स्पर्श केलाही असेल...पण सर्व परिघ व्यापण्याची क्षमता (स्वातंत्र्य होतं तरीही) आली नाही...हे नाइलाजाने कबूल करावेच लागते.

कदाचित ही आणीबाणी वाफेवर ठेवलेल्या झाकणासारखीही ठरेल. साहित्यातले सारे एकखांबी तंबू एकत्र येतील...आणि मग सामर्थ्य वाढायला कितीसा वेळ लागणार?



# रिबेलियन

## न्याय आणि अन्याय यांच्यातली ही अटळ झुंज... एका सच्च्या कुटुंबाने दिलेली

अशोक प्रभाकर डांगे

प्रस्थापन हा प्रत्येक सत्तेचा आत्माच असतो. मग ती सत्ता कोणत्याही प्रकारची असो. राजसत्ता असो, लोकसत्ता असो, धर्मसत्ता असो वा व्यक्तिगत सत्ता असो आणि आपला अधिकार राखण्यासाठी प्रस्थापित होणं हेही अटळ ठरतं. अशा प्रस्थापनाच्या बाबतीत धर्मसत्ता अधिकच कडव्या बनतात. धर्मसत्ता कडव्या बनल्या की समाजजीवनाची कोंडी होते. मूल्यांचे अर्थ बदलले जातात आणि नव्या मूल्यांची प्रस्थापना लादली जाते. प्रस्थापित धर्मसत्ता नेहमीच परंपरेचा पाठपुरावा करते. नव्याकडे पाठ फिरवते आणि जुन्याच्या प्रेतांना कवटाळून बसते. धर्मसत्ता आणि न्याय यांची फारकत ह्या कालखंडात अटळ ठरते. बेकेटसारखा एखादाच पुरोगामी धर्मगुरू न्यायासाठी बळी जातो. अन्यथा धर्म आणि न्याय यांचं विभाजन हाच समाजजीवनाचा पाया ठरतो. काळाच्या संदर्भात अनेक स्वाभिमानी जन्माला घातले जातात. जे न्याय नावाच्या गोष्टीमागे खंबीरपणे उभे रहातात अशांच्या आयुष्यात भीषण संघर्ष अनिवार्य ठरतो. तत्त्वाची व काळाची गरज म्हणून ते अस्तित्वाच्या अंतापर्यंत लढा देतात आणि आपला निषेध कालपटलावर नोंदवून ठेवतात. उन्मत्त धर्मसत्तेविरुद्ध लढलेले दुबळे नरपुरुष म्हणून तर अजरामर होऊन जातात. इतकंच काय, भवितव्यातल्या प्रत्येक सुधारणेची बीजं त्यांच्या किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या अटळ विनाशातून पेरली जातात.

तर जपानमधल्या प्रस्थापितेच्या विरुद्धच्या लढ्याची ही आणखी एक चित्रपटकथा. तिचं नावही तितकंच यथार्थ रिबेलियन. एका पिसाट धर्मसत्तेविरुद्ध किंवा राजसत्तेविरुद्ध काही नगण्य पण सच्च्या माणसांनी दिलेली एक सच्ची लढत. ह्या भीषण संघर्षाचा विचार करताना आपल्याला पहावा लागतो सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातला जपान. तिथल्या एका राजदरबारात अधिकारी असणारी सन्माननीय व्यक्ती. तिला तसं मंत्री किंवा दरबारीसुद्धा म्हणता येईल. त्या व्यक्तीचं नाव इसाबुरो. ससाहरा. तर इसाबुरो नावाच्या माणसाची ही गोष्ट. एकदा अघटित घडलं. राजा सरळ आदेश देतो. राजाचाच आदेश तो. तितकाच जबरी असणार. राजाचा आदेश असतो की, इसाबुरो ससाहरानं आपली दासी किंवा रखेली इची हिला सून म्हणून स्वीकारावं. अर्थ सरळच असतो. इसाबुरोनं आपला थोरला मुलगा योगेरोचं लग्न इची नावाच्या स्त्रीशी करून द्यावं. राजाचा आदेश म्हणजेच सर्व काही. राजा म्हणजेच धर्म ह्या भावनेखाली जगणारे सारे भेकड ह्या म्हणण्याची तळी उचलून धरतात. त्यात असतात ससाहरा-घराण्यातले इतर भाऊबंद. इतकंच काय, इसाबुरोची पत्नी, धाकटा मुलगा वगैरे सर्व. सहन होत नाही एकट्या इसाबुरो नावाच्या सच्च्या माणसाला. तो विरोध नोंदवतो; पण अखेर कुटुंबाच्या व देशाच्या भल्यासाठी तो प्रतिष्ठेचा बळी देतो. याला आणखीही एक कारण घडतं. इसाबुरोचा सख्खा मुलगा योगेरो इची नावाच्या स्त्रीच्या विलक्षण सौंदर्यानं पाघळतो आणि परिणामी इसाबुरो आपल्या मुलाचा इचीशी विवाह लावून देतो.

आता काळ आणखी दोन वर्षांनी पुढे सरकतो. इचीचं एका कुलीन गृहिणीत परिवर्तन होतं. आपल्या कुटुंबियांची नसलेली आस्था ती मिळवते. सासऱ्याची ऊठबस राखते आणि कुटुंबात सौहार्दाचं वातावरण निर्माण करते. दरम्यान इची आपल्या नव्या अपत्याला जन्मही देते. योगेरो या मुलीचं नाव ठेवतो टोमी. आपल्या मुलावर तसंच कर्तव्यदक्ष सुनेवर निहायत खूष झालेला इसाबुरो संसारातनं आपलं अंग काढून घेतो आणि सरळ निवृत्तीचा रस्ता पकडतो. दरबारातली आपली मानाची जागा तो आपला तरुण मुलगा योगेरो याला देववितो आणि आता ससाहरा कुटुंबाचा चेहरामोहराच बदलून जातो. जपानी लोक म्हणजे परंपरा आलीच आणि सच्च्या जपानी परंपरेला अनुसरून योगेरो आता नवा कुटुंबप्रमुख बनतो. साऱ्यांनी त्याच्या देखरेखीत वावरणं आता अटळ ठरतं आणि या पारंपारिक सूत्राला अनुसरून इसाबुरोदेखील आता आपला मुलगा योगेरोला योग्य मान देऊ लागतो.

आणि तेवढ्यात आणखी एक महत्त्वाची घटना घडते. तिचं मोल अर्थातच सामाजिक असतं. राजाचा अस्सल वारस किरकोळ आजाराचं निमित्त होऊन मृत्युमुखी पडतो आणि राजाला पूर्ववयात इचीपासून झालेला विवाहबाह्य मुलगा आता राजाचा औरस वारस ठरतो. स्वाभाविकच इचीचं स्थान राजमाता म्हणून निश्चित केलं जातं. राजाचा निर्णय अटळ ठरतो. राजा आदेश देतो. इचीनं राजमाता म्हणून सरळ प्रासादात परत यावं आणि आपलं सन्माननीय स्थान घ्यावं.

ह्या किरकोळ घटनेनं ससाहरा कुटुंबाचा आयुष्यलेखच बदलला जातो. राजा म्हणजे न्याय, राजा म्हणजे धर्म मानणारे सारे जण म्हणू लागतात इचीनं सरळ राजाकडे परत जावं. ह्यात इसाबुरोची कर्मठ पत्नी असते. तसंच त्याचा सख्खा रक्ताचा धाकटा मुलगासुद्धा असतो. इतकंच काय इचीचा प्रथम स्वीकार करण्यास प्रवृत्त ठरणारे ससाहरा कुटुंबीयसुद्धा राजाचा आदेश मानलाच पाहिजे असं म्हणू लागतात. एका कौटुंबिक बैठकीत ते इचीला सरळच विचारतात, देशासाठी, धर्माच्या भल्यासाठी तू राजाकडे परत जाऊन नांदण्यास तयार आहेस काय? पण ती स्वाभिमानी स्त्री आपल्या निर्णयावर अटळ असते. नाही ! नाही ! ते सारे तिला धमक्या देतात. दडपण आणतात. गोड शब्दांनी भुलवू पहातात; पण ती सच्ची स्त्री त्यांना मुळीच दाद देत नाही. योगेरोचा निर्णय तर उघडच असतो. इचीवर मनस्वी प्रेम करणारा हा माणूस तिच्या त्यागाला सरळ नकार देतो. म्हातारा ससाहरा प्रथम कुटुंबप्रमुख म्हणून योगेरो घेईल तो निर्णय योग्य समजायला तयार होतो; पण अखेर ह्या संघर्षात कुटुंबाची विनाशचिन्हं पेरली जाताच तो आपल्या पुत्राचा उमदेपणे पाठिराखा बनतो.

राजाचा निर्णय अमान्य करून योगेरो

आणि त्याचा बाप इसाबुरो एका बंडाला तोंड फोडतात. कारण ज्या आदीम समाजात राजा म्हणजेच न्याय असतो आणि त्याचा न्याय म्हणजेच धर्म ठरतो, त्याच करंट्या समाज-व्यवस्थेत राजाला विरोध याचा अर्थ एकच होणार असतो. बंड ! योगेरो राजाला उघड उघड पत्र पाठवतो. इचीवर आमचा अधिकार आहे, तिला हिरावणं हा अन्याय आहे आणि ह्या कृतीला आम्ही विरोध करून देशद्रोह करत असू तर राजानं उघड उघड आम्हाला पकडावं. खटला भरून शासनही करावं; पण भेकड राजा योगेरोचा तिरस्कार करतो. उलट तो आदेश देतो, ह्या धर्मद्रोह्यांनी पाप-क्षालन म्हणून आत्महत्येचा मार्ग पत्करावा. राजाचा आदेश मानण्याइतके हे पिता-पुत्र भेकड नसतात आणि शिवाय त्याच्या कृतीं-मागे उभा असतो न्याय नावाचा खंदा पुरुष. विवेक नावाची संवेदना. आत्महत्या करण्यास नकार देऊन इसाबुरो आणि त्याचा पुत्र योगेरो राजाला चांगलंच डिवचतात. राजा आपल्या एका सेनापतीला आदेश देतो. त्यानं सैन्य घेऊन जावं आणि सरळ त्यांना ठार करावं !

याच काळात आणखी एक घटना घडते आणि त्याप्रमाणे इसाबुरोचा धाकटा मुलगा इचीला भुलवतो, फसवतो आणि सांगतो, इसाबुरो आणि योगेरो राजवाड्यात आहेत आणि त्यांनी तिला तेथेच बोलावलं आहे आणि सरळ मनाच्या त्या स्त्रीला तो सरळ राज-वाड्यात नेऊन पोहोचवतो. इसाबुरो बाहेरून परत येतो. आपल्या रक्ताच्या पोरानं आपला विश्वासघात केलेला पाहून तो विलक्षण संतापतो. बापाशी द्रोह करणाऱ्या आपल्या करंट्या पोराला आणि त्याचा पाठपुरावा करणाऱ्या आपल्या बायकोला तो धक्के मारून घराबाहेर काढतो. तरी त्याची हानी मोठीच ठरते.योगेरो इचीला गमावून बसलेला असतो; पण उमद्या रक्ताचे हे दोघे बाप-लेक किल्ला लढवण्याचा निर्धार करतात. आपल्या घराचा किल्ला करतात. शस्त्रांची सिद्धता ठेवतात आणि घराबाहेरच्या पडवीत आपलं अन्न शिजवत असताना राजाच्या सैन्याच्या संभाव्य हल्ल्याची वाट पहात बसतात. त्या वेळी ते दोघे असतात त्या भयाण एकाकी घरात. शिवाय योगेरोची पोरगी टोमी आणि राजानं इचीला पकडल्यावर तिची जागा घेण्यास पाठवलेली एक ओली दाई. आणखी त्यांच्या बरोबर असतो मानवता नावाचा धर्म आणि न्याय नावाची जळती ध्वजा !

उतरत्या रात्रीच घोड्यांच्या टापा आणि माणसांच्या टाचा उसळतात. राजाचा सर-दार राजवाड्याच्या संरक्षकासह घराला वेढा घालतो; पण आणखी आश्चर्य म्हणजे त्यानं धरून बरोबर आणलेली असते योगेरोची बंदीवान पत्नी इची. आघाडीवरचा सरदार त्या उमद्या पुरुषांना सरळ आव्हान करतो. धर्म आणि न्यायाची खोटी जाणीव करून देतो. राजाचा आदेश मानण्याचं अखेर आवाहन करतो; पण हे प्रयत्न निष्फळच ठरतात. हे दोघे कणखर पुरुष इचीवरचा हक्क सोडण्यास सरळ नकार देतात. मग तो मतलबी राजकारणी पलटी खातो. तो इचीचंच मन वदलण्याचा प्रयत्न करतो. तिला म्हणतो तू तरी त्यांच्या वतीनं राजाची माफी माग ! आपल्या माफीनं त्यांची हत्या तू टाळू शकतेस; पण ती उमदी पतिव्रता त्यालाही सरळ नकार देते. तडजोडीचे सारे रस्तेच आता रोखले जातात आणि एका सैनिकाची तलवार क्षणात इचीच्या पाठीत खुपसली जाते. आपल्या पत्नीवरच्या हल्ल्याने बेहोष झालेला योगेरो बेभान होऊन पुढे सरकतो. तिला कवटाळू पाहतो. तोवर दुसरी तलवार त्याच्या जीवनाचं अखेरचं वाक्य लिहून टाकते.

आपल्या पुत्राचा आणि सुनेचा भीषण अंत पाहून सुद्धा इसाबुरो नावाचा उमदा माणूस जराही विचलित होत नाही. तो सरळ तलवार उपसतो आणि एका विरुद्ध अनेक यांचा उघड संघर्ष पेटतो. तेव्हा आपल्या हेही लक्षात येतं की इसाबुरो ससाहरा हा एक सामान्य जपानी पुरुष नाही. तो देशातला सर्वोत्कृष्ट सामुराई योद्धा गणला जातो आणि म्हणून तर राजा सुद्धा उघड संघर्षात पडायला इतकी कुचराई करीत असतो. तो नामवंत योद्धा एका मागून एक अंत घडवत जातो आणि साऱ्या सैनिकांना मारल्यावर राजाच्या सरदारांना स्वर्ग दाखवितो. इसाबुरो ससाहरा नावाच्या वीरपुरुषाचा जयजयकार करतो, तेव्हा उतरत्या पहाटे आपल्याला दिसतात रक्त, प्रेत आणि विनाश. उतरत्या अंतःकरणाने इसाबुरो कामाला लागतो. धर्माच्या राखणीसाठी, बळी गेलेल्या आपल्या पुत्रासाठी व सुनेसाठी एक भला थोरला खड्डा खणतो आणि त्यांना भरल्या अंतःकरणाने मूठमाती देतो. आता मागे उरतो इसाबुरो नावाचा थोर पुरुष आणि त्याची अभागी नात टोमी. आता इसाबुरोला साऱ्याचाच उबग येतो. धर्माचा, राजाचा, राज्याचा. तो सरळ नातीला उचलतो. सीमेची वाट धरतो. आपला सच्चा वंशज जपण्या-वाढवण्यासाठी त्याला दुसऱ्या देशाचा आसरा आता अटळ ठरतो.

थकलेला इसाबुरो सीमेवर पोहोचतो; पण चौकीवरचा अधिकारी असतो तो आडवा येतो. आपल्या जुन्या मित्राच्या नातीला तो दूध पाजतो; पण कर्तव्यभावनेला तोही बांधील असतो. आपला मित्र इसाबुरोला तो सीमेपार जाण्यास नकार देतो. अर्थ सरळच असतो. दोघांचे द्वंद्व, एका सपाट शेतात ते द्वंद्वाला उभे ठाकतात. चार वार होतात न होतात तोच असानो सरळ तलवार खुपसून आत्महत्या करतो. इसाबुरोसारखा अजोड सामुराई योद्धाकडून त्याचा पराभव अटळ दिसतो. मग आपल्या सच्चा मित्राला आपल्या मृत्यूचं पाप देण्याऐवजी तो सरळ आत्मघाताचा उमदा मार्ग स्वीकारतो. अधि-कच उद्‌वस्त झालेला इसाबुरो टोमीकडे परत फिरतो तेव्हा आपल्या लक्षात येतं की राजाच्या सैन्यानं त्याला चहूकडून वेढलं आहे. इसाबुरो सावध होतो; पण आता काळच आडवा येतो. बंदुकाधारी सनिक त्याच्यावर चहूकडून हल्ला चढवतात; पण गोळ्यांनी फाटलेलं शरीर फरफटवत हा शूर सामुराई योद्धा अखेरपर्यंत लढत देतो आणि एकूण एक सैनिकांना कापून काढतो. आपल्या पारंपरिक तलवारीनं, पिकानं भरलेल्या शेतात ह्या उमद्या पुरुषाचा अंत अटळ ठरतो आणि टोमीपर्यंत सरपटत पोहोचण्याच्या आतच तो अखेरचा निश्वास सोडतो !

तर रिबेलियन चित्रपटाचा हा आलेख. न्याय आणि अन्याय यांच्यातली ही अटळ अशी झुंज एका सच्चा कुटुंबानं दिलेली. तिच्या अखेरच्या पर्वातला विनाश आपणा साऱ्यांनाच विषण्ण करतो. जगामध्ये जेव्हा राजसत्ता धर्मसत्तेवर विजयी होते तेव्हा बेकेटचा अंत होतो. जेव्हा धर्मसत्ता राज-सत्तेहून प्रभावी असते तेव्हा येशू क्रुसावर जातो आणि राजसत्ता व धर्मसत्ता एकरूप होऊन विजय मिळवतात तेव्हा इसाबुरो ससाहरासारखे पुरुष बळी जातात.

□ □

# गुजरात

## पंचायत निकालांचा धडा

वा. दा. रानडे

गुजरातमधील जिल्हा-पंचायती आणि तालुका-पंचायतींचे निवडणुकांत सत्तारूढ काँग्रेसने मिळवलेला विजय म्हणजे सत्तारूढ जनता-आघाडीला मोठा हादरा आहे. काही दिवसांपूर्वी राजकोट, सुरत व बडोदा या महापालिकांच्या निवडणुका जनता-आघाडीने जिंकल्या. त्यासंबंधी लिहिताना (माणूस ६ डिसेंबर १९७५) मी म्हटले होते की, 'तीन शहरांच्या महापालिका निवडणुकांत जनता-आघाडीने मोठे यश मिळविले असले तरी त्या यशाच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. साधारणपणे देशातील बहुतेक मोठ्या शहरांतील महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल पाहिले तर त्यात काँग्रेसविरोधीच कौल दिसून येतो; पण विधानसभा व लोकसभा-निवडणुकांच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुकांना फारसे महत्त्व देता येणार नाही. स्थानिक निवडणुकांत स्थानिक प्रश्नांना प्राधान्य असते. त्यांच्या निकालांवरून लोकसभा व विधानसभा-निवडणुकांतील मतदानाचे बांधलेले अंदाज बरोबर ठरतीलच असे नाही; पण बदलत्या मतप्रवाहाची काहीशी कल्पना स्थानिक निवडणुकांवरून येऊ शकते. गुजरातेत मोठ्या शहरांतील सर्वसाधारण जनमत अजून काँग्रेसविरोधी आहे एवढाच मर्यादित निष्कर्ष या निकालांवरून काढणे वस्तुनिष्ठपणाचे होईल.'

जिल्हा व तालुका पंचायत-निवडणुकांकडे याच दृष्टिकोनातून पाहणे योग्य होईल. ग्रामीण मतदार काँग्रेसकडे झुकला आहे एवढा मर्यादित निष्कर्ष या निकालांवरून निश्चित काढता येईल; पण राज्यातील जनमताचा कौल काँग्रेसकडे झुकला असा निष्कर्ष काढणे चुकीचे होईल. महापालिकांच्या निवडणुका म्हणजे माझ्या सरकारवरील विश्वासाचा कौल आहे असे मी मानतो असे मुख्य मंत्री बाबूभाई पटेल यांनी म्हटले होते. त्यांच्या या उद्गारांची त्यांना आठवण देऊन गुजरात-प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हितेंद्रभाई देसाई यांनी म्हटले आहे की, जिल्हा व तालुका-पंचायत निवडणुकांतील पराभव हा आपल्या सरकारवरील अविश्वासाचा कौल आहे हे मान्य करण्याची आता मुख्य मंत्र्यांची तयारी आहे का? वास्तविक जनताआघाडी व सरकारवरील विश्वास–अविश्वासाचा प्रश्न मुख्य मंत्री बाबूभाई पटेल यांनीच या निवडणुकांत उपस्थित करायला नको होता. हितेंद्रभाईंनी त्यांना त्यांच्या युक्तिवादात बरोबर पकडले आहे. सार्वत्रिक निवडणुकांच्या दरम्यानच्या काळात लोकसभा व विधानसभांच्या काही जागांसाठी पोटनिवडणुका होत असतात. अशा निवडणुकांत काही वेळा सत्तारूढ पक्षाचा पराभव होतो. असा पराभव झाला की सरकारच्या राजिनाम्याची मागणी विरोधी पक्षांचे नेते करतात; पण सरकार ती मान्य करीत नाही. स्वतःच्या बाबतीत जो न्याय किंवा तत्त्व सत्तारूढ काँग्रेसपक्ष लावतो तोच न्याय किंवा तत्त्व गुजरातेतील सत्तारूढ जनताआघाडीलाही त्याने लावले पाहिजे. जनताआघाडी-सरकारच्या राजिनाम्याची मागणी करणे हे न्यायास धरून नाही.

जनताआघाडीचे म्हणजेच विरोधी पक्षाचे सरकार पाडण्याचा खेळ गुजरातेत सुरू झाला आहे. त्यासाठी पहिला डाव फाडाफोडीचा टाकण्यात आला. हितेंद्रभाईंसारख्या संघटना काँग्रेसच्या मोठ्या मोहऱ्यास सत्तारूढ काँग्रेसमध्ये आणले की जनताआघाडीत मोठी फाटाफूट होऊन त्यांचे सरकार अल्प मतात येईल आणि आपल्याला सत्तेवर येण्याची संधी मिळेल असा काँग्रेसनेत्यांचा आडाखा होता. काही प्रमाणात फाटाफूट झाली. संघटना काँग्रेस व किमलोप पक्षाचे काही कार्यकर्ते सत्तारूढ काँग्रेसला मिळाले; पण या फाटाफुटीची झळ आमदारांना लागली नाही. जनताआघाडीचा व किमलोपचा एकही आमदार काँग्रेसला मिळाला नाही. त्यामुळे त्यांच्या बहुमताला धक्का लागला नाही. फाटाफुटीचा डाव याप्रमाणे हुकला असला तरी सत्तारूढ काँग्रेसच्या नेत्यांनी तो पूर्णपणे सोडून दिला असे म्हणता येणार नाही. हा डाव यशस्वी होण्यास वातावरणही अनुकूल लागते. महापालिकांच्या निवडणुकांत जनताआघाडीने विजय मिळविला असता फाटाफुटीला कोण बळी पडणार? उलट या विजयाची अशी प्रतिक्रिया झाली की हितेंद्रभाईंच्या मागोमाग काँग्रेसमध्ये गेलेले काही कार्यकर्ते पुनः जनताआघाडीकडे आले; पण आता जिल्हा व तालुका पंचायतसमित्यांच्या निवडणुकांत काँग्रेसने विजय मिळविल्यानंतर हा डाव पुनः खेळला जाण्याची शक्यता आहे. जनताआघाडीच्या आमदारांच्या कसोटीची ही वेळ आहे. त्यांच्यातील शिस्त आणि एकजूट कितपत टिकते यावर त्यांच्या सरकारचे भवितव्य अवलंबून आहे.

दुसरा डाव म्हणजे केरळमध्ये कम्युनिस्ट सरकार पदच्युत करण्यासाठी वापरलेल्या तंत्राचा अवलंब करणे. राज्यात हिंसा व दहशतीचे वातावरण असून शांतता, सुरक्षितता व कायद्याचे राज्य राखण्यात सरकार असमर्थ ठरले आहे अशी कैफियत कम्युनिस्ट सरकारविरुद्ध तयार करण्यात आली होती. कारभारात लाचलुचपत, सत्तेचा पक्षहितासाठी वापर असे आरोपही त्या सरकारविरुद्ध करण्यात आले होते. विधानसभेत सरकारमागे बहुमत कायम असता वरील कारणांसाठी ते बडतर्फ करण्यात आले. गुजरातमधील पंचायत-निवडणुकात हिंसा व दहशतीचे प्रकार घडले. दोन काँग्रेसकार्यकर्त्यांचा खून झाला अशी तक्रार हितेंद्रभाईंनी केली आहे. केंद्र सरकारनेही राज्यसरकारकडे याबाबत विचारणा केली आहे. निवडणुकात हिंसा, दहशत, खून यांसारखे प्रकार घडणे केव्हाही त्याज्यच. सर्वच लोकशाहीवादी राजकीय पक्षांनी अशा प्रकारांचा निषेध केला पाहिजे. घडलेल्या दोन खुनांची न्यायालयीन चौकशी करण्याचा आदेश गुजरात सरकारने दिला आहे. काही थोड्या ठिकाणी असे प्रकार घडले म्हणून राज्यात सर्वत्र हिंसेचे व दहशतीचे वातावरण आहे असा सरसकट आरोप करणे बरोबर नाही.

ग्रामीण मतदार आपल्याविरुद्ध का गेला याचा विचार जनताआघाडीच्या नेत्यांनी अंतर्मुख होऊन केला पाहिजे. इंदिरा गांधींच्या वीस कलमी कार्यक्रमाचा मतदारांवर प्रभाव पडला असे काँग्रेसच्या विजयाचे एक कारण संघटनाकाँग्रेसचे सरचिटणीस मनूभाई पटेल यांनी सांगितले; पण जनताआघाडीच्या ६२ कलमी क्रांतिकारक कार्यक्रमाचे काय झाले असे विचारता त्यांनी सरळ उत्तर देण्याचे टाळून राज्यातील लोकशाहीशक्ती बळकट करण्याचा आघाडी प्रयत्न करील असे सांगितले. आघाडीच्या सरकारने ग्रामीण भागाच्या गरजा व प्रश्न यांना अग्रक्रम देऊन ग्रामीण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. हे सरकार केवळ शहरी लोकांचे हित पाहते, आमच्याकडे दुर्लक्ष करते अशी त्यांची भावना होता कामा नये. पंचायत निवडणुकांनी जनताआघाडीस दिलेला हा धडा आहे. □

# सोलकढी

## □ संमेलन पार पडले हे एक्कावन्नावे

मुंबईहून निघालो आणि महाबळेश्वरमार्गे मजल-दरमजल करीत सहा तारखेला कऱ्हाडला वेळेवर येऊन थडकलो. वेळेवर थडकायची मला लहानपणापासून सवय आहे; त्यामुळे अवेळेवर थडकल्याने जे झिम्पोरीझिम् पाहायला मिळते त्याला मी मुकतो. आता वेळेवर थडकल्यानेच जे झिम्पोरीझिम् पाहायला मिळायचे ते तेवढे मला सपशेल पाहायला मिळते, ही गोष्ट मात्र खरी. अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या एक्कावन्नाव्या अधिवेशनाच्या उद्घाटनाला मंडपात देधमाल गर्दी उसळली होती. या गर्दीने त्यानंतरच्या सगळ्या कार्यक्रमांवर समदृष्टीने लोभ केला आणि औरसचौरस भव्य मंडपाला थिटे करून सोडले.

दुर्गाबाई अध्यक्षपदावरून काहीबाही तिखटतुरट बोलून यशवंतरावांच्या टोपीचा कोन बिघडवतील म्हणून यशवंतराव, आणि दुर्गाबाईंशी आधी नुकत्याच झडलेल्या वादंगात तोंडाची चव बिघडल्यामुळे पु. ल. देशपांडे, संमेलनाला येणार नाहीत असे भाकित भल्याभल्यांनी केले होते. तसे यशवंतरावांना कोणतेही अपरिहार्य राष्ट्रीय निमित्त मिळाले असते आणि पु. ल. देशपांड्यांना आफ्रिकेला जाण्यासाठी हाच मुहूर्त पक्का करता आला असता; पण माझा अंदाज खरा करण्यासाठी दोघे आपले जातीने संमेलनाला आले. आले ते बरे झाले. नाही तर संमेलनात मीठ कमी पडले असते.

स्वागती आणि समारोपी, अशी यशवंतरावांची दोन भाषणे संमेलनात झाली. स्वागताचे भाषण त्यांनी राजचिन्हे काढून केले; समारोपाचे राजचिन्हे यथास्थित धारण करून केले. मराठी रसिकांना आणि साहित्यिकांना दोन्ही भाषणे भली पसंत पडली. त्यात व्यक्त झालेल्या साहित्यिक आणि राजकारणिक मतांचा परामर्ष घ्यायचा पत्कर, संमेलनात तरी कोणी घेतला नाही. पु. ल. देशपांड्यांचे सुद्धा दोन एकपात्री भाषणप्रयोग संमेलनात झाले. एकात, पूर्वाध्यक्ष या नात्याने त्यांनी सूत्रे दुर्गाबाईंच्या स्वाधीन केली आणि दुसऱ्यात माजी अध्यक्षांच्या सत्काराला, त्यांचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी उत्तर दिले. या दोन प्रयोगांमुळे संमेलनातला तो कंटाळा आणि ती करमणूकसुद्धा आम्ही सहन केली. ( माजी संमेलनाध्यक्षांचे हे बोरन्हाण दरवर्षी दरवर्षीसारखे साजरे करण्यात काय इंगित असावे बरे ? माझा अंदाज असा की त्याशिवाय त्या मंडळींना व्यासपीठावर बसायचा संकोच वाटत असावा. असो. )

दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे आणि यशवंतराव चव्हाण हे तिघेजण सोडता व्यासपीठावर जी तीसपस्तीस माणसे वारंवार विलसत होती त्यात भाऊसाहेब खांडेकर आणि ना. ग. गोरे यांच्यावर लोक लक्ष ठेवून होते. भाऊसाहेबांनी एक थरथरते भाषण केले; पण समस्त मराठी लेखकांचा प्रतिनिधी म्हणून उच्चार आणि आविष्कार स्वातंत्र्यासाठी काही थरारक कृती ते करणार आहेत असा जो धूप संमेलनाच्या मंडपातून फिरला होता त्याचे काहीच झाले नाही. नारायणराव गोरे नेहमीसारखी जहाल बोलण्याची कृती करतील अशी अपेक्षा वाटतावाटताच ती जिरली : त्यांचे म्हणे तोंड आले होते.

अध्यक्षा दुर्गा भागवतांची दोन्ही भाषणे विचारपरिप्लुत वगैरे झाली. विचार आणि आविष्कार-स्वातंत्र्याचा पुरस्कार त्यांनी ठाम निर्भयपणे केला; पण दुर्गाबाईंची बोलण्याची पद्धती प्रभावी नाही; आणि अध्यक्षेच्या अधिकारात ज्या अधिक कृती त्या करतील असे कोणाकोणाला वाटले होते त्या घडल्या नाहीत.

संमेलन पार पडले. हे एक्कावनन्नावे.

' चला, आता कऱ्हाडला जाऊ ' ( पाहा : माणूस, ४ ऑक्टोबर आणि २९ नोव्हेंबर ७५) असा घोषगजर करत कऱ्हाडला गेलो खरा; पण तिथल्या प्रतिनिधिनिवासत अशी काही कडेकोट गैरव्यवस्था होती की तिथे गोचिडून राहणे मुष्किल होते. आता हे खरे होते की तसा राहिलो असतो तर माझे साहित्यप्रेम उजळून निघाले असते. तसे ते अनेकांचे उजळून निघालेच ना. मुख्य असे झाले की, कडेकोट गैरव्यवस्था किलकिली कशी करता येईल या समस्येची बारभाईकी उकल करीत असतानाच ओगलेवाडीच्या ओगल्यांच्या मुकुंदरावांची भेट झाली. गेल्या वर्षी जेव्हा कऱ्हाडला जायचे ठरवले होते तेव्हा ओगलेवाडीलाच तंबू टाकायचा इरादा होता. मग तो कृष्णेला मिळाला की कोयनेला की संगमाला ते मला समजले नव्हते. मुकुंदरावांचे खुले आमंत्रण आत्ताही उभे होते; पण ' सत्यकथे ' च्या राम पटवर्धनांसुद्धा अठरावीस कलासक्तूंनी एकसमयावच्छेदेकरून एका छपराखाली हाहाहिहीहुहूहेहेहैहै करायचे म्हणजे छप्पर खाली येईल की काय अशी धास्ती होती. म्हणून थोडे हो-नाही-जाऊद्या-कसचेकसचेकशाला झाले; पण गरजवंताला न दिसलेले छप्पर, भक्कमच वाटते. त्यामुळे, आम्ही गेलो. प्रत्यक्षात मुकुंदराव ओगल्यांच्या घराचे छप्पर नुसते भक्कमच नव्हते; चांदण्यांचेही होते.

जाऊ तेथे घरच्या घर आपलेसे करणे आम्हाला बऱ्यापैकी साधते; पण या वेळी असे झाले की त्या घरानेच आम्हाला आपलेसे करून टाकले. स्वतः मुकुंदराव, त्यांची भगिनी, घर, अंगण, कारखाना, फुले, ग्रेट डेन जातीचा अगडबंब कुत्रा ' प्रिन्स ' यांनी आमच्या पाहुणेपणाचे हळुवारपणे कपटे करून वाहत्या वाऱ्यावर सोडून दिले. नंतरच्या तीन दिवसात ओगलेवाडीला एक उपकऱ्हाडीय साहित्यसंमेलनच साजरे झाले. त्यात, अनुपस्थितांना श्रद्धांजली वाहणे, ओगलेवाडी मुंबईलाच जोडून टाकणे, फुलांच्या आणि कुत्र्यांच्या भाषांना मान्यता आणि महत्त्वाचे स्थान देणे इत्यादि कृतिगर्भ ठराव एकमताने पसार झाले.

कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनाचे वृत्तान्त सगळीकडे झळकले आहेत. (म्हणूनच आपला आणखी एक झळकावायचे मी टाळले. ) त्या वृत्तान्तात दिसते तसे आणि तितके खरोखरच घडले असते तर बरे झाले असते.

मग घडले काय ?
संमेलन पार पडले.
हे एक्कावन्नावे.

—अनंतराव

# ॥ कॉन्ट्रॅक्ट ॥

॥ कॉन्ट्रॅक्ट ॥

रमेश जोशी

सारा दिवस कंटाळवाणी चर्चांची मालिका चालू होती. कोणी कोणाला हार जात नव्हतं. दोन-दोन तासांचं एकएक चर्चासत्र होऊन राहिलं होतं. दोन चर्चासत्रांच्यामध्ये नियमितपणे सुलेमान-चहाचा ग्लास तोंडाला लावावा लागत होता. पर्शियन गल्फमध्ये सुप्रसिद्ध असलेला सुलेमान-चहा मी तोंड वाकडं करत घशाखाली ढकलत होतो. कॉन्ट्रॅक्टची गोष्ट तर अजून पुढेच होती; पण साध्या साध्या बारीकसारीक गोष्टींवरसुद्धा एकमत होत नव्हते. दुबईतल्या एका सिमेंट-फॅक्टरीच्या उभारणीचे कॉन्ट्रॅक्ट व्हायचे होते. सिमेंटफॅक्टरी व इतर मशिनरी उभ्या करणाऱ्या साऱ्या जगभरच्या प्रख्यात कंपन्यांनी या कामाचे टेंडर भरले होते. स्पर्धेला रंग भरला होता. झाडून साऱ्या कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी दुबईत ठाण मांडून बसले होते. दुबईसारख्या एके काळच्या अत्यंत दरिद्री व कर्मठ शहरात आता फरक पडला होता. काळ्या सोन्याने मोठीच किमया घडवून आणली होती. काळ्या सोन्याच्याबरोबर पिवळ्या सोन्याचा काळा बाजार दुबईच्या संपत्तीत भर घालत होता. मोठमोठे रस्ते, सुंदर बागा व नखरेल इमारती आता दुबईच्या क्षितिजावर उगवल्या होत्या. दुबईची सुप्रसिद्ध बाजारपेठ तर देशोदेशींच्या चित्रविचित्र व उत्कृष्ट वस्तूंनी नटली होती. दुबईच्या अंतर्भागांत घुसलेल्या चिंचोळ्या खाडीच्या एका तीरावर सुंदर सुंदर हॉटेल्स आपला धंदा संभाळत बसली होती. खाडीच्या दोन्ही तीरांवर दोन अत्यंत भपकेबाज हॉटेल्स् होती. एक होते हिंदी ॲम्बॅसॅडॉर तर दुसरे होते अमेरिकन कार्लटन. या दोन्ही हॉटेल्समध्ये मिळून हे सारे टेंडरस् भरणारे वरिष्ठ अधिकारी मुक्काम टाकून होते. टेंडर टाकण्याआधी गंभीर चेहेऱ्याने वावरणारे हेच अधिकारी टेंडर भरल्यावर एकमेकांच्या ओळखी करून घेत होते. मद्यालयाला उदार आश्रय देत होते. पोहोण्याच्या तलावावर जास्तीत जास्त काळ घालवत होते. त्यांच्या वेळ घालवण्याच्या कल्पना माझ्या कल्पनांशी जुळत नव्हत्या. मी मात्र बहुतेक सारा वेळ बाजारपेठेत हिंडूनच घालवत होतो. पानांच्या ठेल्यांसमोर थांबत होतो. सोन्याच्या मोठमोठ्या प्रवासी चेनस् बहुतेक दुकानांतून लटकलेल्या दिसत होत्या. कोटाच्या आतून कशा घालायच्या याचं प्रात्यक्षिक दुकानदार मोफत देत होता. बरेच दिवस निमा मागे लागली होती सोन्याचे तोडे करण्यासाठी म्हणून मलाही मोह होत होता; पण अशा प्रत्येक मोहाच्या क्षणी मी निर्धाराने दुकानासमोरून निघून जात होतो आणि दोन दिवसांपूर्वी सारा कंटाळा संपला होता. नुसते अडकून पडणे मागे पडले होते. गेल्या चार दिवसांचे चर्चासत्र काही अंशी तरी पुरे झाले होते. इतर साऱ्या फर्मना चीत करून मी जिंकलो होतो. माझे टेंडर माझ्या शर्तींशिवाय स्वीकारले गेले होते. इतरांना परत जाण्याच्या सूचना मिळाल्या होत्या; परंतु मला मात्र माझ्या शर्तींबद्दल बोलणी करण्यासाठी थांबण्याचा आदेश मिळाला. गेल्या चार दिवसांची चर्चा फळाला आली होती. काही फेरफार स्वीकारून किंमत तर स्वीकारली गेली होती.

पुढील सारी बोलणी नंतर सुरू झाली. सकाळी आठ वाजल्यापासून दुपारी १२ पर्यंत आणि नंतर १ पासून संध्याकाळी सहापर्यंत. आमची बोलणी जेथे चालू होती तो एक भलामोठा कॉन्फरन्स-हॉल होता. हा सारा हॉल वैचित्र्यपूर्ण अरबी कलाकुसरींनी सजवलेला होता. हॉलच्या मध्यभागी काळाकुळकुळीत शिसवीचे एक प्रचंड ऐसपैस अंडाकृती टेबल होते. टेबलाच्या भोवती गुबगुबीत फोनरवरची आवरणे असलेल्या अलिशान खुर्च्या होत्या. प्रत्येक खुर्चीसमोर एक पांढरे पॅड व त्याच्यासमोर कातड्याच्या गोलाकार पात्रात व्यवस्थित शेवटून ठेवलेल्या दोनचार पेन्सिली व वेगवेगळ्या रंगांची स्केचपेनस् होती. त्याच्याशेजारी सिगरेटची भरलेली पाकिटे व काड्यांची पेटी व समोर कटग्लासचे एक सुरेख रक्षापात्र. मोठ्या थाटात आमच्या बैठकी चालू असायच्या. असल्या बैठकीतील बोलणी म्हणजे कोण किती ताणून धरतो याचीच परीक्षा असते. देवाणघेवाणीच्या तत्त्वावर असली सारी बोलणी होतात. बहुधा निर्णय झालेलाच असतो. सवलती किती घ्यायच्या अथवा द्यायच्या एवढाच खरे तर प्रश्न राहिलेला असतो. बैठकीचा चेअरमन होता एक रुबाबदार शेख. या सिमेंटकंपनीचा मालक होता तो. तांत्रिकदृष्ट्या त्याला या बैठकीत काहीच रस वाटत नव्हता. त्याचे उजवे-डावे हातच त्याबाबतीत माझ्याशी झटापट करत होते. आमची बोलणी चालू असताना मधूनमधून हॉलमधल्या काचेच्या फोनच्या खोलीत तो ठराविक वेळाने पळायचा व फोन आला की शांतपणे पुन्हा येऊन आपल्या खुर्चीत स्थानापन्न व्हायचा. अनेक गुंते आम्ही आता सोडवत आणले होते. पैसे कसे द्यायचे-घ्यायचे यावर मात्र एकमत होत नव्हते. मी सारे पैसे डॉलर्स अथवा पौंडात मागत होतो. कंपनीचे अधिकारी मात्र ५०% पैसे डॉलर्समध्ये व उरलेले रुपयांत हिंदुस्थानात देऊ असा आग्रह

**धरून होते. मी हटत नव्हतो, तेही मागे सरकत नव्हते.** पुढली बोलणी शनिवारी चालू करायची असे ठरवून आमची बैठक तहकूब झाली. दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. दुबईचा सुट्टीचा दिवस. आता सुट्टीचा दिवस कसा काढायचा या फिकिरीत मी पडलो. माझ्या दिमतीला दिलेल्या गाडीत येऊन बसलो. चालकाने मला रोजच्याप्रमाणे माझ्या हॉटेलवर आणून सोडले.

या दुबईची मोठी गम्मत आहे. तुमचे डोळे बांधून येथे आणून सोडले आणि डोक्यावरची पट्टी सोडून तुम्हाला विचारले की तुम्ही कोठे आहात ? तर न विचार करता तुम्ही उत्तर द्याल की मी अहमदाबादला म्हणून किंवा राजकोटला आहे. दुबईची लोकसंख्या आहे सारी मिळून तीन लाखांच्या आसपास. त्यात दीड लाख आहेत हिंदी. पन्नास हजार असतील पाकिस्तानी. पन्नास हजार असतील लेबॅनीज, इराणी, इजिप्ती इत्यादि व ४० ते ५० हजार आहेत दुबईचे अरब. जुने दुबई आहे मुंबईच्या कामराजनगर अथवा धारावीसारखे आणि नवे दुबई आहे मुंबईच्या कोटासारखे. मोठमोठ्या रस्त्यांवर जपानी टोयाटो आणि मर्सिडीज बेंझ धावतात पण त्या चालवणारे असतात बहुधा हिंदी पाकिस्तानी अथवा लेबॅनीज. या अरबी रेतीवरचा अरब बहुधा हमाली करतो, टॅक्सी फिरवतो नाही तर गलबते घेऊन आधुनिक चांचेगिरी करतो म्हणजेच आजची तस्करी करतो. दुबईतील तस्करीबद्दल बरेच ऐकले होते; पण वरवर पहाणाऱ्याला काही दिसत नव्हते. मला ही तस्करी जाणून घ्यायची होती; पण विचारणार कोणाला? एक–दोनदा माझ्या हॉटेलमधल्या वेटरला विचारण्याचा प्रयत्न केला होता; पण त्याने काही दाद लागू दिली नव्हती.

ॲम्बॅसॅडॉरच्या भल्यामोठ्या पोर्चमध्ये गाडी येऊन उभी राहिली. अरबी पोषाख केलेला दरवान मोठ्या अदबीने पुढे आला. गाडीचे दार उघडले. माझी अॅटॅची घेऊन मी उतरलो. घड्याळात साडेचार वाजत होते. विचार केला की चटकन् एक फास्ट बॉश घ्यावा, जरा सुटसुटीत कपडे घालावे आणि बाजारात फेरफटका मारून यावे. मनावरचं दडपण बरेच कमी झाले होते. दुबईतला मुक्कामही आटोक्यात आल्यासारखा वाटत होता. पायऱ्या चढून मी वर आलो आणि काउंटरवर माझी नजर खिळून राहिली. खरं म्हटले तर या काउंटरवरून मी रोज पाचसहा वेळा जात-येत असे; पण या काउंटरने मला कधीच तसे आकर्षित केले नव्हते. कायम त्याच्या मागे तोच तोच गोवॅनीज छोकरा यांत्रिकपणे मला विश करायचा. माझ्या खोलीची किल्ली माझ्यासमोर टाकायचा. मी देखील तितक्याच बेफिकिरीत मान लववून त्याच्या अभिवादनाचा स्वीकार करायचो व माझ्या रस्त्याने चालू लागायचो; पण आजची



गोष्ट वेगळी होती. एक गहूवर्णाची, उभट चेहेऱ्याची व सुटसुटीत बांध्याची एक अटकर तरुणी त्या काउंटरच्या मागे उभी होती. फार सुरेख होती अशातला काही भाग मात्र नव्हता. मात्र मागे वळून पुन्हा-पुन्हा पहावे अशी सुबक वस्तू होती. गेल्या पाच-सहा दिवसांत ॲम्बॅसॅडॉरमध्ये तर सोडाच पण साऱ्या दुबईत मला मागे वळून पहाण्यासारखी चीज दिसली नव्हती. मी काउंटरसमोर जाऊन उभा राहिलो. माझ्या खोलीची किल्ली मागितली; पण आता वर खोलीत जाण्यास मन लागत नव्हते. काउंटरच्या मागे उभ्या असलेल्या त्या युवतीकडे पुन्हापुन्हा दृष्टी टाकण्याचा मोह मला आवरत नव्हता. मी किल्ली घेतली व समोरच लाउंजमध्ये काउंटर दिसेल अशा बेताने एका टेबलामागे खुर्ची घेऊन बसलो. खिशातून सिगरेट काढली. एक चांगला दम भरून घेतला आणि वेटरची वाट पहात बसला राहिलो. बाजार सातला बंद होत होता. वर जाऊन बाहेर पडण्याची ऊर्मी बळावत होती. तशीच ती दाबून टाकत होतो. शुक्रवारी बाजारही बंद असतो. शनिवारी माझी बोलणी संपली तर बाजारात जायला वेळ मिळणार नव्हता. सारे समजत होते; पण सौंदर्याचे दृष्टिसुख घेण्याचा मोह टाळवत नव्हता. मला माझ्या कॉलेजच्या दिवसांतली आठवण झाली. कॉलेजसमोरच्या कट्ट्यावर आर्टस्ला असलेल्या पोरी पहाण्यात आमच्या कंपूने तासचे तास घालवलेले होते. मे महिन्यात पुण्यात आयात झालेल्या सौंदर्याचा पाठलाग करत आम्ही त्या वेळी भटकत असू. दोस्तांच्या लग्नात असेच कोपरा धरून बसत असू आणि लग्नाला आलेल्या सुरेख सुरेख पोरींचे कोन साधत असू; पण तो जमाना उलटलेल्याला आता बारा-चौदा वर्षे झाली होती. बारा वर्षांपूर्वी निमाने माझ्या जीवनात अलगद प्रवेश केला होता. जितक्या अलगद कापसाची म्हातारी खोपीच्या पडद्यावर येऊन उतरते तितक्याच अलगद पावलाने निमाने माझ्या मनाचा, तनाचा कबजा घेतला होता. न कळत, सहजतेने. त्यानंतरची ही बारा वर्षे भारल्यासारखी निघून गेली होती. दृष्टीसमोर फक्त होते माझे कार्यक्षेत्र, माझी प्रिय निमा आणि माझी चिमुरडी मुले. आणि या साऱ्या नेमस्त आयुष्यात मला या सौंदर्य विधण्याच्या कलेचा विसर पडला होता.

काहीं काही कला अशा असतात की त्या विसरू म्हणून विसरता येत नाहीत. दहाबारा वर्षांत पोहोलो नाही, सायकलवर बसलो नाही; पण पोहायला पाण्यात पडलो तर सराईतपणे दहाबारा हात अजून मारता येतात. सायकल हाताशी आली तर सफाईदार गिरकी मारणे काही अशक्य नाही. त्या दिवशी लाउंजमध्ये माझे तसेच झाले. असा झकास कोन साधला होता. अत्यंत अनिमिष नजरेने मी त्या सौंदर्याचे मुक्तपान करत होतो. सहज कोणाच्या लक्षात येणार नाही अशा चोरट्या जागी बसलो होतो. वेटरने आता कॉफीचा सरंजाम टेबलावर आणून ठेवला. मी मस्तपैकी कॉफी जमवली आणि पुन्हा काउंटरकडे नजर फेकली. मघाशी सजीव, आकर्षक वाटणारा काउंटर आता पुन्हा ओकाबोका दिसत होता. त्या काउंटरचे काव्य तेथून सटकले होते. गोवॅनीज तरुणाच्या पुन्हा त्याच गद्य हालचाली चालू होत्या. मिळालेल्या दृष्टिसुखावर समाधान मानून मी आता आवरायच्या तयारीला लागलो. चटपट कॉफी संपवली. माझ्या साऱ्या वस्तू आवरल्या आणि उठून उभा राहिलो आणि मला आश्चर्याचा झटकाच बसला. मगाची ती काउंटरवरची तरुणी आता माझ्यासमोर उभी होती. ती सुरेख होती यात तर काहीच शंका नाही. लांबून पाहिली त्यापेक्षा ती किती तरी अधिक सुरेख होती. तिचा अंडाकृती उभट चेहेरा आणि गहूवर्ण तिच्या अंगात पंजाबी रक्त खेळत असल्याचे दर्शवत होता. तिने चापून-चोपून नेसलेल्या रक्तवर्णी साडीतून तिच्या साऱ्या शरीरावरची नाजूक वळणे नजरेला सुखवत होती. बेताची उंची असलेल्या या पोरीच्या चेहेऱ्यावर एक विलक्षण गोडवा होता. आर्जव होतं. माझ्यासमोर ती उभी होती; पण तिला तसेच डावलून मला जाववत नव्हते. मैदानातून पळ मी कधी काढलेला नाही; पण अनोळखी परक्या देशात या क्षणी कोणतीही भानगड अंगावर घेणं मला परवडणारं नव्हतं. माझा विवेक मला तेथून निघून जायला सांगत होता; पण त्या गोड आर्जवी चेहेऱ्याआड लपलेलं भासणारं कारुण्य मला तसं करू देत नव्हते. आकस्मिक प्रसंगाने मी गोंधळून गेलो होतो. पुढे काय करावे याचा निर्णय मला चटकन घेता येत नव्हता. पूर्वी कॉलेजमध्ये असताना सुलू देशपांडेची ती आमच्या समोरून जाताना टिंगल केली होती. अशी फिस्कारून अंगावर आली होती की आम्ही चौघेही धूम पळून गेलो होतो. इथं तसं करून चालणार नव्हतं. माझा बावळट आविर्भाव बहुधा तिच्या लक्षात आला असावा.

'अगर आप बुरा नहीं मानोगे तो एक बात कहुँगी' तिच्या आवाजात विलक्षण गोडवा होता. आर्जव होतं. धोक्याची घंटा माझ्या मनात घणघणली; पण तिला तसं दुखवून मला जाता येत नव्हतं. इच्छाही होत नव्हती. तिच्याशी गप्पा मारण्याची ऊर्मी प्रबळ होती. जाणूनबुजून अंगावर जाण्यापेक्षा अंगावर आली तर शिंगावर घेण्याची माझी तयारी होती. मी थोडा विचारात पडलो.

'आप बैठ तो जाइये.' ती पुन्हा म्हणाली.

'नहीं नहीं पहिले आप!' मी एकदम लखनवी अदबीने म्हणालो. गोड हसूनच तिने माझ्या विनंतीचा स्वीकार केला आणि खुर्ची ओढून ती माझ्या समोरच बसली. मीही बसलो आणि बाजूलाच असलेल्या वेटरला मी कॉफीची ऑर्डर दिली.

'साब, आप पूनासे आये हैं न! आपको मिलनेकी बहुत कोशिश कर रही थी। शायद आप काममें डुबे हुए थे!'

पुण्याची गोष्ट निघाली आणि मला एकदम आपुलकी वाटायला लागली. जवळच्या गोष्टीची किंमत त्यापासून लांब गेले की कळते. मढ्यासारख्या मधोमध पडलेल्या शनिवारवाड्यासारख्या कोत्या आणि खोट्या पुराणप्रिय अशा पुण्याच्या मनोवृत्तीला, वातावरणाला शिव्या देणारा मी पुण्यापासून लांब गेलो की पुण्याच्या आठवणीने सुखावतो. पुण्याचे कोणी नाव काढले की जवळीक वाढते. गप्पांना आपसूकच विषय मिळतो. तिच्याशी काय बोलावे हा प्रश्न चुटकीसरशी निकालात निघाला. पुणेरी गप्पात आम्ही चट्दिशी रंगून गेलो.

त्या सुहास्यवदनेचे नाव होतं प्रेम मल्होत्रा. तिचे वडील पुण्यातील एका मोठ्या कंत्राटदारी फर्मचे हिशोबनीस होते. पाच वर्षांपूर्वी ही छोकरी या हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट म्हणून आली होती व आता त्याचे सारे हिशेब सांभाळत होती. स्वतःबद्दलची माहिती

सांगताना ती थोडी आक्रसत होती. सरळ-सरळ माझ्या डोळ्यात पाहणे चुकवत होती. टेबलावर ठेवलेल्या चमच्याशी सारखी चाळा करत होती. कुठे तरी काही तरी लपवत होती. त्या वेळीही मला ते जाणवत होते; पण ती बोलती राहिलेली मला आवडत होती. तिची जवळीक मला सुखावत होती. तिच्या बोलण्याचा नाद माझ्या कानात घंटे-प्रमाणे किणकिणत होता. या बारीकसारीक तपशिलाकडे माझे जाणूनबुजून दुर्लक्ष करवत होता. समोरच्या कॉफीपात्रातील कॉफी गार होत होती; पण कॉफी संपताच ती निघून जाईल या भीतीने मी ती कॉफी तशीच ठेवून बसलो होतो.

'यहाँ बैठे बैठे क्या करेंगे? चलो, थोडे घूम आयेंगे!' ती म्हणाली. तिच्या या सूचनेचा अव्हेर मी करणे शक्यच नव्हते. किंबहुना माझ्या मनातलेच ती बोलली होती.

डेराचा अद्ययावत व्यापारी विभाग निऑनसाइन्सने नुसता झगमगून उठला होता. कालव्याच्या पाण्यात त्या झगमगाटाचे प्रतिबिंब मोठे मोहक दिसत होते. मोठ्या चातुर्याने मांडणी केलेल्या दर्शनी खिडक्या मला खुणावत होत्या. ओझरते चुटपुटते धक्के देत आम्ही त्या भागातून मनसोक्त हिंडत होतो. तिचा प्रत्येक निसटता स्पर्श माझं शरीर तापवत होता. त्या मुक्त क्षणी तरी मला निमाचा, माझ्या चिमुरड्यांचा विसर पडला होता. माझ्या परवाच्या पुढील बोलण्याचा विचार माझ्या मनाला शिवत नव्हता. फार वर्षांनी मी एक रसरशीत संध्याकाळ अनुभवत होतो. सीझनचा पहिला आंबा खाताना कशी त्याची चव न्यारीच लागते. फार वर्षांनी मुक्त आनंद मी उपभोगत होतो, चाखत होतो. एरवी पुण्याला निमाच्या मिठीच्या ओढीत सुख मी अनुभवत असेसुद्धा, पण व्यावसायिक अडचणी या संत्र्याच्या फोडीसारख्या अधरांच्या मीलनाच्या धुंदीत विसरू शकत नव्हतो. सर्वस्वाने मी जरी निमाचा त्या क्षणी होत असलो तरी मस्तकात काळज्या नेहमीच ठुसठुसत्या राह्यल्या होत्या. निमाच्या चाणाक्ष दृष्टीतून त्या कधीच सुटल्या नव्हत्या. होत होते ते सारे आपोआप, सहज घडत होते. त्या दिवशी तरी मी त्या साऱ्या विवचनांपासून मुक्त होतो. या आनंदासाठी मी शेकडो मृत्यू कवटाळले असते.

भटकता भटकता आम्ही एका लेबॅनीज उपाहारगृहापाशी येऊन ठेपलो. सूर्य बुडाल्यामुळे वातावरणात एक सुखद गारवा निर्माण झाला होता. भल्या मोठ्या काचेच्यामागे डेराचा कालवा दिसेल अशा बेताने आम्ही खुर्च्या ओढून बसलो. सूर्य आत्ताच कुठे अस्ताला गेला होता. दुबईतील निशाजीवन आत्ता कुठे जांभया देत जागे होत होते. कालव्याच्या उतारावर होती सुरेख बाग. छोटीशीच पण उत्तम निगा राखलेली. बोगद्याच्या पलीकडे काळाशार रस्ता, त्या रस्त्यावरून अलीशान मोटारी एकमेकांशी स्पर्धा करत धावत होत्या. रस्त्याच्या पलीकडे होता सुमारे ७०–७५ फुटांचा व्यवस्थित बांधलेला धक्का. धक्क्यावरची हालचाल आता जवळजवळ बंद पडली होती. वीस-पंचवीस छोटी-मोठी गलबते ज्याला धाऊ म्हणतात. ती चुबुक-चुबक आवाज करीत कालव्यात स्वस्थ होती. तीनशे एक फूट लांबीच्या धक्क्यावर मोठमोठे पेटारे व किनतानात भरलेला माल पडला होता. एखाददुसरा खाकी कपड्यातील पहारेकरी सोडला तर त्या साऱ्या धक्क्यावर कोणी दिसत नव्हते. धाऊचे खलाशीसुद्धा ये–जा फारशी करत नव्हते. कोटचवधी रुपयांचा माल बिनधास्त सोडून दिलेला दिसत होता. मला मोठा अचंबा वाटला. पुण्या-मुंबईच्या शिस्तबद्ध जीवनातदेखील मी माझी गाडी माझ्या नजरेसमोरून सोडू शकत नव्हतो. माझी उत्कंठा मी फार वेळ दाबू शकलो नाही.

'प्रेम, ये क्या बात है? समोरचा धक्का इतका निर्मनुष्य कसा? येथे चोऱ्या होत नाहीत का? कोणाचा माल आहे हा? रखवालदार नाही, कस्टम्सचे लोक नाहीत. क्या बात है?' मी प्रेमला विचारले.

'साब, ये दुबई है। यहाँ ऐसी चोरी होती नहीं! तू जो माल आता बघतोयस् तो बाहेर-देशाहून येथे आला आहे. येथून तो या धाऊमधून हिंदुस्थान-पाकिस्तानात पसरणार आहे. इथला प्रत्येक माणूस पैसे कमवायला आला आहे. या होणाऱ्या तस्करीमध्ये त्या प्रत्येकाचा हात आहे. येथला धंदा हा जुगारी अड्डयासारखा आहे. बेइमानी केली तर उद्या एखाद्याचे प्रेत या कालव्यात तरंगताना दिसेल! फार लांब कशाला या तस्करीला माझासुद्धा हातभार आहे.

जी गोष्ट जाणून घेण्यासाठी मी अधीर झालो होतो ती इतक्या सहज उघडी होईल अशी मला आशाच नव्हती. मी सावरून बसलो.

'साऱ्या दुबईमध्ये कमसे कम तीन लाख लोक रहातात. त्यातील दोन लाख कोठल्या तरी नोकरीत आहेत. हे लोक साधारणपणे २०० रियाल वाचवून आपल्या देशात पाठवतात. भारतीय रुपयात २०० रियाल म्हणजे २८० रुपये. इथला कोणताही मजूर हे दोनशे रियाल घेऊन हवाला देतो. आम्ही जी रक्कम येथल्या एजंटाला देतो, त्याच्या तिप्पट रक्कम भारतात तो घरपोच करतो. म्हणजे २२० रुपयांचा फायदा पडतो. आम्ही हवाला घेतलेली रक्कम सारी तस्करी करण्यामध्ये गुंतली जाते. हवाला घेतलेली रक्कम भारतात दिल्या तारखेला पोचली नाही असे एकही उदाहरण अजून कानांवर आले नाही. हा जो समोर माल दिसतो आहे त्यात माझीसुद्धा थोडीशी अशा प्रकारे भागी आहे. प्रत्येकाचीच आहे. कोण त्याला हात लावणार? तुझ्याकडे जर काही पैसे असले तर मला दे. मी हवाला देते. पुण्यात घरपोच होतील. एकदम तिप्पट!'


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
परांजपे
डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये

माय गॉड–मी तर एकदम सर्दच झालो. २ लाखांतले १ लाख हिंदी जर प्रत्येकी २०० रियाल म्हणजे २८० रुपये पाठवत असतील हवाला देऊन तर भारतसरकार २८० लाख दरमहा गमावते फक्त दुबईमधून आणि इतर मध्यपूर्वेकडील लहानमोठ्या शेरव्या जर धरल्या तर ही रक्कम किती होते? त्यात पुन्हा २८० लाख अधिकृत चलनाची किंमत त्यात हवाल्याचे २२० रु. घातले तर जवळ-जवळ ही रक्कम सहा कोटी होते. म्हणजे केवळ एकटे दुबई भारतात वर्षाला १०० कोटी रु. काळे करते. माझ्या डोळ्यांसमोर काजवेच चमकायला लागले. हे सारे करणारी इथली संघटना, भारतातील संघटना त्यांच्या पद्धती–चलनवलन – दळणवळण –छेः छेः! सारेच माझ्या आकलनाबाहेरील होते. ही तर नुसती ढोबळ आकडेवारी होती. त्याच्या नुसत्या उच्चारानेच मी दचकून गेलो होतो. मग तपशिलात शिरलो असतो तर...

'भारतासारख्या थोड्या दूरवर असलेल्या देशाची ही स्थिती तर मग आखातापलीकडल्या इराणची अवस्था काय असेल?' न रहावून मी विचारले.

'तू म्हणतोस ते बरोबर आहे. दहा वर्षांपूर्वी इराणची स्थिती पण फार दयनीय अशी करून टाकली होती; पण दहा वर्षांपूर्वी शहाने काही वेगवान बोटी आणल्या आणि ओळख न पटवणाऱ्या काही धाऊ बिनदिक्कत बुडवल्या. तेव्हापासून इराणचाही ओघ भारत–पाककडे वळला. तस्करीशिवाय या देशात आहे काय? इथली तस्करी बुडाली तर दुबई ओस पडायला वेळ लागणार नाही. माझंच चुकलं. मीच विषय काढायला नको होता. आजची संध्याकाळ आणि उद्याचा दिवस माझा आहे. मी तुला उद्या दुसऱ्या शेरवडमला नेणार आहे. आता तस्करीचा विषय डोक्यातून काढून टाक!' अतिशय सहजपणे प्रेम म्हणाली. त्या दोन तासांत आम्ही एकमेकांच्या खूपच जवळ आलो होतो. रेशमाचे बंध सहज निर्माण झाले होते. त्या गुंत्यात मी आपोआप अडकत होतो. तिच्या विभ्रमांना नकळत बळी पडत होतो. त्यात गुरफटत होतो.

बघता बघता रेस्टॉरंटमधले दिवे मंद झाले. रंगीत दिव्यांच्या किरणांची उधळण सुरू झाली. काउंटरशेजारचा बॅन्ड ठकेबाज संगीत वाजवू लागला. रेस्टॉरंटला आता ताजेपणा आला. पुष्कळशी टेबले भरू लागली. बिकिनी पेहेराव घातलेल्या तरुणी टेबलाटेबलांवरून सिगरेट्स् विकत हिंडू लागल्या. शँपेनच्या बाटल्या मनसोक्त फसफसू लागल्या आणि स्टेजचा एका अर्धनग्न लेबॅनीज डान्सरने ताबा घेतला. बॅन्डच्या तालावर एक उत्कृष्ट बेलीडान्स तिने पेश केला. त्या क्षणी तरी मला तिथे तो प्रतिस्वर्गच वाटला. प्रेमसारखी सुंदरी गप्पा मारायला, सभोवारचे रोमांचकारी वातावरण, अर्धनग्न ल्युसीचे अप्सरेलाही लाजवणारे नृत्य. बस आपण तर खूष होऊन गेलो होतो. या साऱ्या वातावरणाच्या पलीकडे आणखी काही तरी असते आणि त्याला जबाबदारी म्हणतात याचा मला त्या क्षणी तरी विसर पडत गेला होता.

रेस्टॉरंटच्या बाहेर पडलो तेव्हा १० वाजून गेले होते. समोर कालव्याच्यापलीकडे ॲम्बॅसॅडॉरची निऑनसाइन डोळ्यात भरत होती. चालता चालता माझा हात केव्हा प्रेमच्या कमरेभोवती गेला हेही आता स्मरत नाही. धुंद अवस्थेत आम्ही चालत हॉटेलपाशी आलो. तिला दुरावण्याच्या कल्पनेने मी तिला अधिकच माझ्याजवळ ओढली. कोणताही विरोध न करता ती माझ्या कवेत आली. लांबची टॅक्सी जवळ येण्यापूर्वीच मी तिचे एक पुसटसे चुंबन घेऊन टाकले. हॉटेलचा दरवान जवळ येण्यापूर्वीच आम्ही विलग झालो होतो. माझं मस्तक तापलं होतं. साऱ्या शरीरातून एक विद्युत्प्रवाह प्रवास करीत जात होता. त्याचा लहरीकंप मला जाणवत होता. आम्ही हॉटेलच्या भल्या मोठ्या पोर्चमध्ये उभे होतो. तिच्या नजरेत आव्हान होते; पण ते स्वीकारण्याची मानसिक तयारी अद्याप माझी नव्हती. जेवढे सुख मिळाले होते त्यावर मी अर्थात खूप नव्हतो,समाधानी नव्हतो. उत्तम रत्नागिरी आंब्याचा सुवास नाकात दरवळावा पण तो चाखून पहाता येऊ नये तशीच अवस्था माझी होती. आंब्याचा सुवास मस्तकात घुसला होता; पण तो चाखण्याची माझी हिंमत होत नव्हती. प्रेमचा हात दोन्ही हातांत घेऊन तिला कुरवाळून मी माझ्या खोलीत आलो. रात्री केव्हा तरी बऱ्याच उशिरा निद्रादेवीच्या आधीन झालो.

फोनची घंटा बराच वेळ वाजत राहिली होती. हात लांब करून फोन उचलला. पुन्हा तोच मधाळलेला आवाज माझ्याशी कानगोष्टी करू लागला. फारसा विचार न करता १० वाजता तयार रहाण्याचे आश्वासन मी तिला देऊन टाकले. नाही तरी शुक्रवारी हॉटेलमध्ये थांबून मी काय करणार होतो? सबंध दिवस काही न करता काढण्यापेक्षा शेजारच्या शारझा आणि रस्-उल-खिचानला जाण्याचा तिचा प्रस्ताव मी बिनदिक्कत स्वीकारला.

आता घड्याळात नऊ वाजायला आले होते. आळोखेपिळोखे देत मी बाहेरच्या बाल्कनीत येऊन उभा राहिलो. सारे दुबई जणू ॲम्बॅसॅडॉरच्या पायाशी पसरले होते. आठव्या मजल्यावरून शहराच्या पलीकडला परिसर सहज दृष्टिपथात येत होता. गल्फच्या पलीकडे सोनेरी वाळू उगवत्या किरणांमध्ये चकाकत होती. गल्फच्या निळेशार पाण्याच्या पार्श्वभूमीवर ती सोनेरी वाळू मोठी देखणी दिसत होती. थंडीचे दिवस होते म्हणून त्याकडे पहावत होते. त्यातले सौंदर्य मनाला मोहवीत होते; पण एकदा हा हिवाळा संपला की त्या वाळूकडे पहाणे अशक्य होणार होते. अरबी भाषेत बिश्रा म्हणजे New Hope. हिवाळा संपताना खजुराच्या झाडांना जी पहिली कोवळी फळे येतात त्याला बिश्रा म्हणतात. नंतर नेहमीचे खजूर येतात. ही बिशरा-फळे अरेबी उन्हाळ्यानंतर पुन्हा सुखाचे दिवस येणार याची ग्वाही देतात. पुण्या-मुंबईत बसून अरेबियन उन्हाळा ही काय चीज आहे ती कळणार नाही. साऱ्या आशाआकांक्षा करपवून टाकणारा उन्हाळा असतो तो. म्हणूनच या 'बिश्रांना' महत्त्व.

शारझा शहरात आम्ही प्रवेश केला तेव्हा दुपारचे अकरा वाजत आले होते. ३० कि. मी. अंतरावर असलेल्या या शेरवडमची आता पार रया झाली होती. तस्करी करायला किनारा लागतो. तो या शारझाला होता; पण त्याचा वापर करण्याची अक्कल आणि धाडस या दोहोंचा तिथे अभाव होता. RAF चा बेस असल्याने त्याला वर्षानुवर्षे कधी पौंडाची चणचण नव्हती. रस्त्याच्या दुतर्फा मोठी बाजारपेठ होती; पण ती आता RAF चा बेस गेल्यामुळे ओस पडली होती. गाडीत बसल्यापासून प्रेमची टकळी चालू होती.

वाळवंटाला भेग पडल्यासारखा मधून गेलेल्या काळाशार डांबरी सडकेवरून आमची तांबडी फोर्ड सुसाट धावत होती. त्या उत्तेजक गार हवेत मी प्रेमचा हात हातात घेऊन शेजारी बसलो होतो. इतकी नाजूक पोरगी ८०–१०० मैलांच्या वेगाने गाडी चालवू शकेल हे मला एरवी पटलेच नसते. रस्त्यावर रहदारी अशी नव्हतीच. एक वाजता आम्ही रस्स–उल–रवीमानला पोचलो. सारा रस्ताभर सोनेरी वाळू पाहून पाहून डोळे नुसते तापून उठले होते. गावाच्या बाहेर सुरेख तलाव पाहून डोळे तर निवून गेले. तलावाच्या काठी जाऊन झकासपैकी तोंड–हात धुतले आणि मजेत सिगरेट पेटवून एका वाळूच्याच ढिगावर जाऊन बसलो. त्या अनपेक्षित दृश्याने मी क्षणभर प्रेमचा सुखद सहवास-देखील विसरलो.

विचारांच्या तंद्रीतून जागा झालो ते प्रेमचे नाजूक हात डोळ्यांवर पडले तेव्हाच. तिच्या बालिश आविर्भावांना न जुमानता मी तिचे हात माझ्या दोन्ही हातांत घेतले आणि तिला जवळ ओढली. नखरेल बिकीनी स्वीमिंग सूटमध्ये तिचे शरीर व तारुण्य मावत नव्हते. कशीबशी माझ्या मिठीतून सुटून तिने समोरच्या तलावात बुडी मारली. मी तर आता अंतराळात तरंगायला लागलो होतो. एखाद्या चंदेरी मासोळीप्रमाणे प्रेम जलविहार करत होती. माझ्या अंगावर मुद्दाम पाणी उडवत होती. पाण्यात उतरण्यासाठी मला अनेक विभ्रम करून आव्हान देत होती. तिच्या साऱ्या विभ्रमांनी आणि सतेज देहयष्टीने मी पेटून उठत होतो; पण त्या अनोळखी पाण्यात उतरण्याची तयारी करून मी आलो नव्हतो. नेसत्या वस्त्रानिशी पाण्यात पाय ठेवण्याचे धाडस मला होत नव्हते. ती देत असलेली आव्हाने स्वीकारण्याचे मात्र मी मनोमन ठरवले होते. पुन्हा दुबईत परतल्यावर तिला धडा शिकवायचा निर्णय मी त्याच वेळी घेऊन टाकला. हापूस आंबा चाखायची संधी मी त्या रात्री दवडणार नव्हतो. रस्स्-उल-खिमानहून परतताना माझ्या डोक्यात तीच एक इच्छा ठाण मांडून बसली होती. हापूसचा आंबा स्टिअरिंग व्हीलच्या मागे बसला होता. त्याचा दरवळ माझ्या नाकाला गुदगुल्या करत होता. परत दुबईत पोहोचलो तेव्हा सात वाजून गेले होते. रात्रीच्या जेवणासाठी प्रेमला मी आमंत्रण दिले होते. फारशी खळखळ न करता तिने ते स्वीकारले देखील.

आठाच्या सुमाराला दारावर टकटक झाली. मी दार उघडले. समोर प्रेम गर्द हिरव्या रंगाची साडी नेसून उभी होती. मी तिला आत घेतले. दार लावले आणि ती मिठीत आली. सबंध दिवसाचा फेरफटका मारल्यानंतर गेला तासभर मी आळसात दवडला होता. काही क्षणात आम्ही विलग झालो. फोन उचलून मी गारेगार शॅंपेनची order दिली. तिला खोलीत बसवली आणि मी झटक्यात आंघोळीसाठी बाथरूममध्ये घुसलो. आंघोळ करून नीटनेटके कपडे घालून सभ्यतेचा बुरखा घेऊन मी आतल्या खोलीत गेलो आणि मला ४४० व्होल्टचा धक्काच बसला !

माझी खोली तर नीट आवरलेली दिसत होती. अस्ताव्यस्त पडलेले माझे कागद, माझे कपडे व इतरही साऱ्या चिजा व्यवस्थित जागच्याजागी जाऊन बसलेल्या होत्या. खोली-


सॅपोटेक्स १००% विशुद्ध सोप पावडर




आतां ३ नवीन सुबक आकारांत उपलब्ध
२½ कि.ग्रॅ. १ कि.ग्रॅ. ½ कि.ग्रॅ.

आपल्या कपड्यांची धुलाई अत्यंत स्वच्छ आणि सफेद होण्यासाठी सॅपोटेक्स वापरा. त्यात सफेदीसाठी ऑप्टिकल व्हाइटनर मिसळलेले असते. सॅपोटेक्सने धुलाई केल्याने नाजूक कपडे सुद्धा सुरक्षित राहतात.

सॅपोटेक्स-भारतातील सर्वांत अधिक खपाची सोप पावडर

स्वस्तिक हाऊसहोल्ड अ‍ॅण्ड इंडस्ट्रिअल प्रॉडक्ट्स लि.

तल्या साउंड ट्रॅक चॅनेलवर उन्मादक संगीत चालू होते. प्रेमच्या अंगावर लव्हेंडर रंगाचा नायलॉनचा झिरझिरीत नाइटगाउन होता. नाइटगाउनच्या आतील तिची अंतर्वस्त्रे त्या झिरझिरीत कापडातून दिसत होती. खोलीच्या मध्यभागी त्या उन्मादक संगीताच्या तालावर प्रेम डोलत उभी होती. माझी चाहूल लागताच तिने दोन्ही हात मला आलिंगन देण्याकरता उंचावले आणि ती तालात पावले टाकत माझ्यासमोर येऊन उभी राहिली. माझे रक्त पेटून उठले. मस्तकात चमक गेली. तिला तशीच कवेत घेण्याची ऊर्मी डोक्यात चढली. दोन्ही बाहू पसरून मीही थोडा सरसावलो आणि कोणत्या तरी अज्ञात शक्तीने मला जागीच खिळवून टाकले. तालात वाजणारं संगीत आता माझ्या कानांवर आदळू लागले. त्या वेळच्या मनाच्या अवस्थेत मला तो नाद आगीच्या बंबाच्या ठणठणाटासारखा वाटला. माझ्या निमाचा, माझ्या चिमुरड्यांचे निरागस निष्पाप चेहेरे माझ्या दृष्टीसमोर नाचू लागले. लहानपणी, जवळजवळ कॉलेजमध्ये जाईपर्यंत शांत तेवत ठेवलेल्या समईजवळ बसून रामरक्षा,शुभं करोति म्हणताना मनावर नकळत झालेले संस्कार आठवले. आई–वडलांनी न बोलता स्वतःच्या वागणुकीने घालून दिलेले आदर्श माझा जात असलेला तोल सावरू लागले. कोणत्या तरी अनामिक शक्तीने मला जागच्या जागी खिळवून ठेवले. स्वैराचाराच्या मनात उसळणाऱ्या ऊर्मी लहानपणी झालेल्या संस्कारांवर मात करूच शकत नव्हत्या. त्या संस्कारांनी एक लक्ष्मणरेषा आखून दिली होती फार फार पूर्वी. शरीर ती उल्लंघून जाण्याची पराकाष्ठा करत होते; पण माझ्या मनाने त्या स्वैराचारावर आता काबू केला होता. एका क्षणात मी शांत झालो. प्रेमच्या उन्मादक आविर्भावांना आता यश येणे शक्य नव्हते. मी आता प्रेममध्ये आणि एखाद्या तैलचित्रात फरक करूच शकत नव्हतो. तिचा देह अत्यंत कमनीय होता. तिचे तारुण्य ओसंडत होते. तिच्या अंतर्वस्त्रांत ते मावत नव्हते; पण माझ्या लेखी ती आता एक केवळ सुबक वस्तु होती. अनावृत्त सौंदर्याची चित्रे मी पूर्वी युरोपमधल्या म्युझियम्समध्ये पाहिली होती. त्यांचा सौंदर्यास्वाद पूर्वी मी घेतला होता; पण त्यातलं एकही चित्र माझं रक्त तापवू शकले नव्हते. वासना डोक्यात चढण्याची गोष्ट तर लांबच राहिली. ती चित्रे पहाताना जी त्रयस्थ वृत्ती माझ्या मनात होती तीच अवस्था आताही माझी झाली. मी अत्यंत थंडपणे बाजूच्या खुर्चीवर विसावलो. माझी चार मिनार शिलगावली. खोलीवर पसरलेल्या सेंटच्या सुवासात चार मिनारचा कडक वास नाकाला कसा तरीच भासत होता; पण त्याने मी पुरता सावध झालो.

माझ्या या थंडपणाने प्रेमला बुचकळ्यात टाकले. ती अचंब्याने माझ्याकडे पहात होती. तिचा अपेक्षाभंग झाला होता. पराभव झाला होता. झटक्यात ती साउंडट्रॅक सिस्टीमकडे जाऊन पोहोचली. खटका दाबून तिने स्पीकर बंद करून टाकला. माझ्या समोर ती येऊन बसली. तिच्या कपड्यांच्या सळसळीशिवाय सारे कसं शांत शांत होतं. किती वेळ गेला कोणास ठाऊक.

'क्या हो गया आपको? तुझी तब्येत बरी नाही का ?' तिने विचारले.

मी माझी सिगरेट रक्षापात्रात चिरडली. मागे हात बांधून उभा राहिलो.

'नही नही ऐसी कोई बात नही. मैं तो अच्छा हूँ। परंतु जे झालं ते बऱ्यासाठीच झालं प्रेम. या दोन दिवसांत आपण एकमेकांना खूप जवळून ओळखू लागलो. आपण एकमेकांना खूप प्रेम दिलं. खूप जिव्हाळा दिला. दोस्त बनून गेलो. त्या दोस्तानाला काळं लागेल असं कृत्य आपण नाही केलं पाहिजे. माझ्या उपभोगाच्या कल्पना या येथपर्यंतच आहेत. याच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न आपण करू या नको. माझ्या वागणुकीचा आदर्श मला माझ्या मुलांना वाटला पाहिजे. तू पुण्याला आलीस की माझ्या घरीच तू यायला हवीस. मानाने रहायला हवीस. निमाशी मैत्री करायला हवीस. माझ्या मुलांनी सुद्धा तुला प्रेमआँटी म्हणून हाक मारायला हवे. दुबईतल्या आपल्या संगतीच्या आठवणी आपण माझ्या माणसांदेखत उगाळायला हव्या. त्यांच्या संगतीचे सोन्याचे क्षण आपण वेचायला हवेत. मला तू हवीस ती केवळ क्षणाची उपभोग्य वस्तू म्हणून नकोस. माझी प्रिय मैत्रिण म्हणून हवीस. माझी दुबईतील सांगाती म्हणून हवीस. आपली वर्तणूक अशी असेल तर माझी मान तर खाली जाईलच; पण माझी मुलंबाळंही खालच्याच मानेने वावरतील. मला जाण ठेवायचीय, पर्वा करायची आहे ती माझ्या भविष्यासाठी नाही प्रेम; पण माझ्या निमाच्या भविष्याची. माझ्या लेकरांच्या भवितव्याची. त्यांच्या मानाची. प्रेम, मी स्वतंत्र नाही आहे. माझ्या माणसांची बांधिलकी मी स्वीकारली आहे. ती मला एका क्षणासाठीही नाकारता येणार नाही. यासाठी तू दुखावलीस तरी मला पर्वा नाही प्रेम ! तुझा मार्ग तुला मोकळा आहे. माझे विचार तुला पटत नसतील तर तू आत्ताच्या आता जाऊ शकतेस. मैत्रीसाठी माझा हात अजूनही पुढेच आहे. माझी मनोरचना, माझे विचार मी तुझ्यावर लादत नाही. तूही तुझे विचार-आचार माझ्यावर लादू नकोस. तुला यश मिळणार नाही !' मला इतके व्यवस्थित विचार कोठून सुचले कोणास ठाऊक; पण एवढे बोलून मी गप्प बसून राहिलो. विचारांच्या धुंदीत.

प्रेम अवाक होऊन बसली होती. सिनेमात शोभेल अशी मस्त वातावरणनिर्मिती झाली होती. आश्चर्याने आणि ताणाने तिचे डोळे विस्फारले होते. पहातापहाता तिच्या डोळ्यांतले भाव बदलले. चेहेऱ्यावर मूर्तिमंत कारुण्य पसरले. डोळ्यांत अश्रू उभे राहिले. दोन्ही हातांत तिने चेहेरा लपवला आणि ती हमसाहमसी रडू लागली. तिचे दोनही हात मी हातात घेतले व तिच्या खांद्यावर थोपटू लागलो. परवा संध्याकाळी ती भेटल्यापासूनचा तिच्या सांगाती घालवलेला काळ मला आठवू लागला. वास्तविक मीच थोडा सरकलो होतो. सरकता सरकता बचावलो होतो. त्या घालवलेल्या क्षणांमध्ये अभिमान वाटण्यासारखे काही नव्हते; पण मला उगाचच माझ्या वर्तणुकीचा अभिमान वाटू लागला होता. विनाशाच्या गर्तेपर्यंत जाऊन मी परतू शकलो होतो. विमनस्कपणे जाऊन खिडकीपाशी उभा राहिलो. खालून अंधाराला चिरत मोटारींची रहदारी चालू होती.

'अगर मुझे आपके जैसा दोस्त समयपर मिलता तो आज मेरी ये हालत नही होती!' रडलेल्या सुरात प्रेम म्हणाली. मी दचकून भानावर आलो. पुन्हा तिच्यासमोर येऊन बसलो.

'मैंने आपको झूट बताया. मैं गिरी हुई लडकी हूँ. मै ये हॉटेलमे काम नही करती.

मी कोठेच काम करत नाही. तू माझा दोस्त आहेस. मला प्रिय आहेस. गेल्या पाच वर्षात मी जे भोगले, जे अनुभवले आहे ते सारे किळसवाणे आहे. गैर आहे. माझा भूतकाळ चिखलासारखा आहे. तो ऐकलास तर तू माझी नफरत करशील. मला येथून हाकलून देशील. पुन्हा माझं तोंड पहाणार नाहीस ! माझी आठवण ठेवणार नाहीस; पण तरीही आज मी बोलणार आहे. ख्रिश्चन धर्मात कन्फेशन असतं ना तसं मी कन्फेशन देणार आहे. मी हिंदू आहे. आपल्या धर्मात तशी सोय नाही; पण मी आज बोलणार आहे.' एका वेगळ्या सुरात प्रेम बोलत होती; पण या सुरात ठामपणा होता. निश्चय होता. आता मला अधिकअधिक रस वाटू लागला. काही रहस्ये उकलू लागली होती. काल कॉफी पिताना माझा शंकासुर जागा झाला होता. त्या शंकेला आता उत्तरे मिळू लागली.

'बहोत दिन बीत गये मैं कॉलेजमें पढती थी. मैं कोई स्कॉलर लडकी नहीं थी. तरीही हुषार विद्यार्थ्यांत माझी गणना होत असे. माझे पिताजी छोटीमोठी कामे घ्यायचे, त्यावर सीमेंट आणि लोखंड स्वस्त दराने मिळवायचे आणि काळ्या बाजारात विकून टाकायचे. काळा पैसा भरपूर हाताशी होता. खर्चाला भरपूर पैसा मिळे. सढळ हाताने मी खर्च करत असे. आमच्या साऱ्या कंपूमध्ये माझी परिस्थितो फारच चांगली होती. होस्टेलमध्ये रहाणाऱ्या मुलांत पटेल होता. माझी आणि त्याची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. येथपर्यंत सारे ठीक होते; पण हळूहळू पटेलमध्ये मी गुरफटत गेले. पटेलचा दुबई व कुवेत येथे मोठा व्यापार होता. दर शनिवारी–रविवारी तो नियमाने मुंबईला जायचा. येताना परदेशी किंमती चिजा आणायचा. होस्टेलवर विकून टाकायचा. उंची सेंटशिवाय इतर सेंटस्ना मी हात लावत नसे. मॅक्स फॅक्टरशिवाय कोणतीही लिपस्टिक मी ओठांजवळ नेत नसे. पटेलशी दोस्ती झाल्यानंतर अंगाचा साबणसुद्धा मी विलायती वापरू लागले. घरातल्या घालायच्या सपातासुद्धा जपानमध्ये बनवलेल्या असत. पटेलच्या दोस्तीमुळे माझा महिन्याचा दोन–तीनशेचा या वस्तूंवरचा खर्च वाचला होता. कॉलेजच्या पलीकडलं जग मला तोपर्यंत दिसलं नव्हतं. दिसत होतं; पण ते समजावून घेण्याची कुवत अंगात नव्हती, इच्छाही नव्हती. काळ्या पैशाची धुंदी चढलेले माझे पिताजी अधिकाधिक काळा पैसा मिळवत होते. पुढल्या पिढीची काळजी त्यांनी कधी केली नाही. जणू त्यांचा–आमचा काहीच संबंध नव्हता. मुंहमांगे पॉकेटमनी दिला की त्यांची जबाबदारी संपत होती. ज्युनिअर बी. ए. ला असताना मी न चुकता पटेल-बरोबर दर शनिवारी मुंबईला जाऊ लागले. आम्ही एकाच खोलीत अलीशान हॉटेलमध्ये राहू लागलो. मी दिवसभर खोलीत बसून राही. पटेल त्याचे सारे उद्योग करून संध्याकाळी येत असे. रविवारी संध्याकाळच्या डेक्कनने आम्ही पुण्याला येत असू. दिवसभर पटेल काय करतो याची चौकशी त्या वेळी तरी मी केली नाही. दर शनिवार–रविवार मी मुंबईत काय करते याची चौकशी माझ्या




डॅडींनी कधी केली नाही. सबंध वर्षात कधी मी पुस्तकाला हात लावला नव्हता. त्याचा नतीजा व्हायचा तोच झाला. इंटर आर्टस्च्या परीक्षेला मला फॉर्मसुद्धा, मिळाला नाही. जवळजवळ त्याच वेळी वर्षभरात घातलेल्या धिंगाण्याच्या खाणाखुणांची चाहूल मला लागली. मैं माँ बननेवाली थी । वस्तुस्थिती घरवाल्यांच्या लक्षात यायला फार वेळ लागला नाही. माझं रोजचे जीवन माझ्या मातापित्यांनी मला अशक्य करून टाकलं. मी माझे दिवस कसे काढत होते माझं मलाच ठाऊक. ही परिस्थिती मी फार काळ सहन करू शकले नाही. माझ्या सहाय्याला पटेल त्या वेळी धावून आला. माझ्याबरोबर तोही नापास झाला होता. दुबईला परत जाऊन धंद्यात लक्ष घालायचं त्याने ठरवले होते. आम्ही दोघांनी पळून जायचे ठरवले. पटेलने सारी व्यवस्था केली होती. त्याचा माल घेऊन आलेल्या एका धाऊवरून आम्ही दुबईत दाखल झालो. दुबईला येण्यासाठी त्या वेळी पासपोर्ट लागत नव्हता. पुन्हा भारतात जायचा माझा इरादा नव्हता. बेकायदेशीररीत्या मी भारत सोडला. दुबईला आल्यानंतर लग्न करू म्हणून पटेल म्हणाला होता. माझे दिवस भरत आले होते. पटेलचा स्वतःचा असा काहीच व्यापार नव्हता. अल् बादर शेखचा एजंट म्हणून तो भारतात काम करत होता. दुबईला पोचल्यावर मला त्याने बादरच्या हवाली केले आणि तो पुन्हा कोठे तरी निघून गेला. सत्य परिस्थितीची जाणीव आता हळूहळू मला येऊ लागली. काय परिस्थिती आली असेल त्याची कल्पना केलीस तरी मी जे त्या काळात भोगलं त्याच्या दहा टक्केसुद्धा तुझी कल्पना चालणार नाही. त्या अवघडलेल्या अवस्थेत देखील बादर मालकीहक्क दाखवायला चुकला नाही. पटेलबद्दल मी जास्त उत्सुकता दाखवली त्या दिवशी त्यानं दिलेला मार मी कधी विसरणार नाही ! दोन महिन्यांनी मी बाळंतीण झाले. आठच दिवसांत माझं मूल गेले. त्यानंतर दोन महिन्यांनी बादरने माझ्यापुढे दोन पर्याय ठेवले. एक तर त्याच्या जनानखान्यात मी दाखल व्हावे किंवा तुझ्यासारखे जे प्रवासी येतील त्यांना मोहजालात पकडून त्यांच्याकडून तस्करी करवणे. मला तिसरा पर्यायच नव्हता. कुकर्माची फळे नेहमीच कडू असतात. बादरच्या जनानखान्यात कुढण्यापेक्षा मला दुसरा पर्याय बरा वाटला. निदान माझा बाहेरच्या जगाशी संबंध तरी रहाणार होता. या चिखलातून बाहेर पडण्याची इच्छा होती. निंदान मार्ग शोधण्याचा प्रयत्न तरी करता आला असता. चार पैसे गाठी मारता आले असते. दुसऱ्या पर्यायात आशेचा किरण दिसत होता. मी तो स्वीकारला. त्यानंतरच्या पाच वर्षांत मी किती लोकांबरोबर झोपले, किती लोकांना जाळ्यात ओढले, अफूपासून हिऱ्यांपर्यंत किती पार्सलं बेमालूम पाठवली त्याचा हिशेब नाही. पाच वर्षांच्या आयुष्यात दोस्ताना दाखवणारा तूच मला भेटलास !'

प्रेम हमसून–धुमसून रडत होती. मी समोरच्या खुर्चीवर बसून राहिलो होतो. त्या थंडीत माझा गंजीफ्रॉक घामाने भिजला होता. मला सुरुवातीला जो खड्डा वाटला तो नुसता खड्डा नव्हता, त्यात एक लोखंडी सापळा होता. मी त्या सापळ्यात अडकलो असतो तर जिवंतपणी मरण भोगले असते. त्या नुसत्या विचारानेच मला घाम फुटला होता. Contract मिळाले असते तर प्रेमला आणि बादरला दर दोन तीन महिन्यांनी एक घरचाच वाटक मिळाला असता. मी शहारलो. माझा विश्वास बसेना. इतकी नाजूक तन्वांगी इतकी कुटील कशी असू शकेल ? माझ्या चेहेऱ्यावरील वेडचावाकडचा रेषांचा अर्थ त्या चाणाक्ष पोरीच्या लक्षात आला असावा. झटकन ती उठली आणि टेबलावर पडलेली तिची पर्स तिने उघडली. वेटोळे केलेला काळ्या कुळकुळीत रंगाचा उत्कृष्टपणे कमावलेल्या कातड्याचा एक कंबरेचा पट्टा तिने बाहेर काढला.

'काय किंमत करतोस याची बोल !' ती म्हणाली.

मी डोळे विस्फारून पहात होतो.

'१५ लाख रुपयांहून एक पै कमी नाही!' मी थक्कच झालो.

'हा पट्टा तुझ्याबरोबर देण्यासाठी मला बादरचा हुकूम आहे. या पट्ट्यामध्ये हिरे भरलेले आहेत. माझा भाऊ म्हणून कोणी तरी तुझ्या office वर येईल आणि तेथून तो हा पट्टा घेऊन जाईल. तसा त्याने तो नेला की इथे माझ्या खात्यावर पाच हजार रु. जमा होतील. हा पट्टा तू तुझ्या गळ्यात घेतलास की तुला तुझं काम मिळायला अडचण पडणार नाही. ही ने–आण करण्याचा मोबदला म्हणून तू कामाची किंमत वाढवून मागितलीस तरी ती मान्य केली जाईल. काय करतोस बोल ! धाडस करण्याची आहे तयारी ?'

त्वेषाने प्रेम बोलत होती. कोपऱ्यात कोंडल्या गेलेल्या मांजरीसारखी फिस्कारत होती. अंधारात उडी घालण्यासाठी जाणूनबुजून आव्हाने देत होती. अंधारात लावून ठेवलेले सुरुंग दाखवत होती. तिच्या त्या वरून वरून सात्त्विक दिसणाऱ्या परंतु मायावी त्वेषाने मी फसणार नव्हतो. मला आता तिची किळस आली. तिच्या बोलण्याचा, तिच्या आव्हानांचा संताप आला. तिचे माझ्या खोलीतले अस्तित्व मला सहन होईना. असं वाटू लागलं की आता उठावं आणि हिच्या कानाखाली दोन आवाज काढावेत. त्यामुळे तरी ती शुद्धीवर येईल. स्वतः खाली चिखलात बागडत आहे आणि मलाही या धुळवडीत सामील व्हायला लावते आहे. साऱ्या शरीरातून झण्कन् वीज फिरली. माझी कानशिलं तापली. तिरिमिरीत मी उठलो; पण पुन्हा स्वतःला सावरत तसाच खुर्चीत कोसळलो. कमरेवर हात ठेवून प्रेम समोर उभी होती.

'मैं कहती हूँ अगर ये बुरा काम तुमने किया तो मैं तुझे जिंदा खाऊंगी. काम तुझे मिलनेका सवालही नहीं पैदा होता. उद्या सकाळी १० च्या आत तुला फोन येईल काम दुसऱ्याला दिल्याचा. सामानाची बांधाबांध आताच करून ठेव. दुपारी दोनच्या विमानाने मुकाट्याने मुंबईला निघून जा !' कालच्या नि आजच्या प्रेममध्ये जमीन-अस्मानाचे अंतर होते. एखाद्या कडकलक्ष्मीच्या तोऱ्यात ती मला फर्मावत होती. कोणती प्रेम खरी काही कळत नव्हते. मला काही समजण्याच्या आत प्रेम माझ्याजवळ आली. एक क्षणभरच तिचे ओठ माझ्या कपाळावर तिने टेकवले आणि दुसऱ्याच क्षणी माझ्या खोलीतून ती नाहीशी झाली. समोरच्या टेबलावर चांदीच्या बादलीत ठेवलेल्या शँपेनच्या बाटल्या तशाच होत्या. साऱ्या बर्फाचे पाणी पाणी झाले होते.

विमानतळावर मुंबईच्या उड्डाणासाठी शेवटचा आदेश दिला जात होता. प्रेमने भाकीत केल्याप्रमाणे कंत्राट मला मिळाले नव्हते. अधीर नजरेने मी प्रवेशद्वाराकडे नजर लावून बसलो होतो. विमानाची वेळ भरत आली होती. जड पावलांनी मी उठलो व कस्टमच्या दाराकडे चालू लागलो. प्रेमसारख्या कितीएक तरुणींचा प्रश्न मला तरीही सतावत होता, अस्वस्थ करत होता.

□ □

पुस्तके

# नक्षत्रांचे देणे

अशोक प्रभाकर डांगे

आरती प्रभू नावाच्या माणसाचा हा आणखी एक कवितासंग्रह. ह्याच्या शब्दातून ह्याच्यातला माणूस बोलतो, आपल्याला बोलता करतो. प्रतिभेचं विलक्षण देणं घेऊन जन्माला आलेले ह्याचे शब्द विलक्षण अंतर्मुख असतात. हा माणूस उंचीच्या जाणिवा घेऊन जगतो. दक्षिण कोकणातला समृद्ध निसर्ग यानं जाणतेपणी भोगलेला आणि त्या निसर्गाचीच विलक्षण जाणती प्रतिबिंबं ह्याच्या शब्दांत खूपदा जाणवत असतात. ह्याची अभिव्यक्ती सकस असते. किंबहुना निसर्गाशी असलेली आपली बांधिलकी हा कधीच विसरू शकत नाही. ह्याच्या ह्या कवितासंग्रहात हाच अनुभव येतो आणि ही बांधिलकीच त्याच्या काव्याला आशयाची समृद्धी मिळवून देत असते.

नक्षत्रांचे देणे ह्या संग्रहातही कवितांच्या तीन भिन्न प्रकृती जाणवत जातात. एक निखळ कवितांची आणि दुसरी गझलात्मक काव्याची किंवा तिसरी भावनावाही गीतांची. आरती प्रभूच्या केवळ कवितांचाच विचार करावयाचा झाला तर आपल्याला जाणवते ती जाणती तटस्थता. ही तटस्थता चिंतनशील कलावंताचा नेहमीच पाठलाग करीत येते. ह्या तटस्थतेच्याच पोटी तो कधी पोरवयात वारलेल्या कुणा फणसेकरांच्या इंदूला नमस्कार करतो तर कधी मस्णात जाणाऱ्या जिवंत म्हाताऱ्याला सहज निरोप देतो. ही तटस्थता कधी स्वतःबद्दलही बोलून जाते आणि मग तो 'स्वतःच्याच कवितेला एखाद्या पेटलेल्या दिव्याप्रमाणे दूर ठेवून' पाहू शकतो. जीवनात ही तटस्थता अटळ असते. आपल्याच भोगांची ती मोजमापं घेते आणि आपल्या वर्तमानालासुद्धा अंतर्मुख करते. ह्या भीषण अलिप्ततेच्या पोटी आरती प्रभू सहज विचारून जातो,

संसारांत राहून काय झालो ?
पोराबाळांचा फक्त बाप झालो ?

आपल्या नाकर्तेपणाची ही जाणीव मोठी आहे. प्रत्येक प्रज्ञावंतालाच ती वरचेवर झपाटत रहाते. अगदी आयुष्याच्या अंतापर्यंत. कदाचित ही नाकर्तेपणाची जाणीवच त्याच्यातली तटस्थता मोठी करते. साऱ्या जगण्याची सुसंगती न लागलेला हा माणूस, न्याय–अन्याय, सुख, दुःख, भोग, दारिद्र्य ह्यांच्या चरफडत्या वणव्यात सापडलेला हा माणूस म्हणून तर आपल्याला प्रश्न विचारत रहातो,

कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे ?
कुठे उतरावे ? कशासाठी तंबू ठोकून ?
कोण मेले कोणासाठी रक्त ओकून ?

माणसाच्या जीवनातली ही भीषण अगतिकता आहे. ही अटळ अगतिकता आरती प्रभूच्या काव्यात वरचेवर डोकावताना दिसते. आशय शब्दांतून जळत जातो. देणारा कोणी तिसराच. आपण फक्त दार उघडायचे. घेणाराही कोणी तिसराच.' ह्या भावना ह्याच अलिप्ततेचं प्रतिनिधित्व करतात. ही अतिप्तता कवीला एकाकी करते.

तो मेला तेव्हा अगदी एकटा होता
तो जगला तेही पुन्हा एकट्यानेच

हे शब्दसुद्धा जगणे आणि मरणे ह्यांना जवळ आणतात. मानवी जीवनाचे हे शब्द खऱ्या अर्थाने चित्रण करतात. माणसांच्या सच्च्या भावना बोलक्या करतात.

मानवी जीवनातल्या अटळ एकाकीपणाचा शोध घेणारा आरती प्रभू मानवी जीवनातही तितकाच बुडलेला आढळतो. म्हणून तर 'नक्षत्रांनी गोंधळलेल्या काळोखाहून सौम्य आभाळी.' असणारे तिचे डोळे त्याला सहज भुरळ पाडतात. उत्कट प्रतिमांनी सजलेल्या असंख्य शब्दांतून आरती प्रभू मानवी भावनांना सौंदर्याचं लेणं चढवितो. अस्तित्वाच्या गूढतेनं भारलेली त्याची तरल कल्पना जेव्हा नाचू लागते, तेव्हा मनावर मोरपिसं फिरत जातात. ह्या भावगर्भ भावना साकार होताना तो म्हणत असतो,

जाहला सूर्यास्त राणी. खोल पाणी जातसे
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे

तरल भावनांची ही नितांतसुंदर अभिव्यक्ती म्हणायला हवी. अशाच भावना बोलक्या करताना आरती प्रभू नावाचा कवी शब्दांना सहज नाचवितो. 'हालली का गर्द जाळी, मंद झाले का दिवे ? शीळ आली कापरी अन् गारवा हा जाणवे' निसर्गाची ही हळुवार स्पंदनं अलगद टिपणारा हा माणूस आपल्या आशयातही हळवा बनतो.

ऊन ओल्या गूजगप्पा,
ऊन ओला अन अबोला
ऊन ओली ती उन्हे अन्
ऊनओला पावसाळा

ऊनओल्या शब्दांची ही हलकी सर आपल्या मनाला सहज भिजवून टाकते. ह्या भावमयतेपायीच त्याला 'भुईतून आलेली वाळव्याची रुजव' जाणवते. 'उन्हाची साखर' झालेली दिसते. ह्याच किंवा इतर अनेक निसर्गप्रतीम उजव्या आहेत. खरं तर आरती प्रभू हा कवी झाडाझाडातूनच जास्त जाणवतो. त्याची प्रतिमा निसर्गात गिरक्या घेते. त्याचा आशय अधिक सकस होत जातो.

आरती प्रभूच्या ह्या संग्रहात 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' ह्यासारखे विलक्षण प्रभावी चित्रपटगीत आहे. त्याचप्रमाणे इतर अनेक सुंदर गझलमय गीतं पण संग्रहीत केलेली दिसतात.

ही सारी गीतं आशयपूर्ण भासतात. तू म्हणावे रानवारा दे ठरू ना वस्त्र हे' 'एक आहे ही नवी अन एक आहे ही जुनी' 'या टपोऱ्या अक्षरांच्या 'पोर तू पत्रातली' ह्यासारखी गीतं भावनांच्या विलक्षण उदासोचे धागे विणतात. त्याच्या अन् तिच्या भावनांना आरती प्रभू सहज उठाव देतात किंवा 'कोण होता प्रवासी, कोठून आला कसा ?' 'मौनात पाखरांचे वनगीत शोधताना' ह्यासारखी अतिशय प्रभावी चिंतनगीतं लिहिणारा हा कवी आपल्या आयुष्याचा हिशोब अगदी सहज शब्दांत मांडून टाकतात.

संपूर्ण मी तरू की आहे नगण्य पर्ण
सांगेल राख माझी गेल्यावरी जळून

आरती प्रभू नावाच्या कवीचा हा एक सकस काव्यसंग्रह. आशयाची समृद्धी घेऊन सजीव होणारे हे त्याचे शब्द. मानवी भावनांचं यथार्थ चित्रण घडविण्यात ही कविता यशस्वी ठरते आणि तरल मनांची हळवी प्रतिबिंबं टिपताना तर ती अधिकच लवचिक होते. आशयगर्भ गीतरचनेत ती मोलाची भर टाकते. हा प्रतिभावान कवी स्वतः जाणवतो तसाच दुसऱ्याच्याही जाणिवा समृद्ध करतो. □

**नक्षत्रांचे देणे** (कवितासंग्रह)
आरती प्रभू
मौज प्रकाशनगृह, मुंबई
दहा रुपये

रविकिरण साने

# हिटलरची अखेर....आणि....

जागतिक साम्राज्याची महत्त्वाकांक्षा आणि वंशशुद्धीच्या कल्पनांचे झंझावाती वादळ आपल्या पंखात घेऊन उत्तुंग आकाशात झेपावणाऱ्या पक्षिराज गरुडाच्या भीषण अंताची कथा म्हणजेच हिटलर द लास्ट टेन डेज !

सारे कथानक घडते तेच मोठ्या विचित्र परिस्थितीत. रशियन सैन्य बर्लिनपासून अवघ्या ३० कि. मी. वर असताना हिटलरच्या बंकरमध्ये या अंतिम नाट्याला सुरुवात होते. झंझावती आक्रमणे करून हिटलरने पादाक्रांत केलेला सारा युरोप दोस्तांनी मुक्त केला आहे. बर्लिन वगळता संपूर्ण जर्मनी रशिया-अमेरिका यांच्या वर्चस्वाखाली आला आहे. शेवटचा धक्का मारून बर्लिनमधेच नाझीवादाला समाधी द्यायला दोस्त राष्ट्रे आतुर झाली आहेत. हिटलरच्या बंकरमध्ये पराभवाची छाया पसरली आहे; पण हिटलरचा पीळ अजून कायम आहे. शेवटच्या क्षणापर्यंत युद्ध हा त्याचा आग्रह आहे. अशा विलक्षण तणावाच्या वातावरणात बंकरमध्ये फक्त येतात त्या एकापाठोपाठ होणाऱ्या पराभवाच्या वार्ता. जनरल गोअरिंगची शरणागति, हिमलरची स्वित्झर्लंडमध्ये दोस्तांशी बोलणी या वार्ता शेवटचा धक्का मारतात आणि अखेर हिटलरची आत्महत्या !

रूढ अर्थाने हा युद्धपट नव्हे. सारे कथानक घडते, उलगडत जाते ते बंकरमधल्या चर्चेमधून. बर्लिनसाठी झालेल्या अखेरच्या भीषण रणसंग्रामाशी आपण जोडले जातो ते केवळ येणाऱ्या वार्तांतून.

चित्रपटाची सुरुवातच मोठी वेधक आहे. पश्चिम युरोपचा नकाशा पडद्यावर येतो. त्याच्या पार्श्वभूमीवर हिटलरच्या उदयाची कथा धावत्या निवेदनाबरोबर पुढे सरकत राहते. मग युद्धाची ठिणगी पडताच संचलनगीताच्या पार्श्वसंगीतावर एक एक प्रदेश हिटलरच्या कब्जात येतो. ज्या झपाट्याने हे विजय मिळत जातात त्याच झपाट्याने हिटलरला पराभव पत्करावे लागतात. अखेर दोस्तांनी जर्मनी जिंकून बर्लिनला वेढा घातल्याचे दिसते आणि हिटलरचा बंकर दिसू लागतो.

हिटलर आणि त्याचे विश्वासू सहकारी हे शेवटचे दहा दिवस बंकरमध्ये घालवतात. या दहा दिवसांतील घटनांबाबत जे संशोधन करण्यात आले त्यावर हा चित्रपट आधारला आहे. यातील भाषणे सुद्धा शब्दशः खरी आहेत असा निर्मात्यांचा दावा आहे. हा ऐतिहासिक बंकर तर अत्यंत परिश्रमपूर्वक उभारला आहे. त्या दहा दिवसांत या बंकरमध्ये प्रत्यक्ष वावरलेल्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली तो बांधण्यात आला.

शेवटच्या दहा दिवसांत बंकरमध्ये प्रत्यक्ष घडणाऱ्या महत्त्वाच्या घटना दोनच. हिटलरचा त्याच्या प्रेयसीशी विवाह आणि त्या दोघांची आत्महत्या. बाकी सारे चित्रण आहे ते पराभवांच्या वार्तांमुळे घडणारी मानसिक आंदोलने आणि लष्करी कारवाईबाबतच्या चर्चा यांचे.

हिटलरच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू अत्यंत वेधकपणे उलगडून दाखविण्यात आले आहेत. सर्वनाश समोर दिसत असतानाही लढत राहण्याची जिद्द. पुनश्च विजयी होण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा. आपल्या साम्राज्यलालसेपायी शेवटच्या क्षणी कोवळ्या मुलांनाही युद्धावर पाठवण्याची क्रूर योजना. विलक्षण तणावातही आपली विनोदबुद्धी जागृत ठेवण्याचे कसब. एकीकडे माझ्या शरीराचा तुकडाही शत्रूचे हाती पडू नये म्हणून ते पेटवून द्या असे सांगणारा पण त्याच वेळी आपल्या विविध प्रसंगांच्या फोटो निगेटिव्हा सुरक्षित ठेवा असे सांगणारा हिटलर. मृत्यूला कवटाळण्यापूर्वी आपल्या प्रेयसीबरोबर विवाहबद्ध होऊन शांतपणे एकत्र आत्महत्या करणारा प्रियकर. कोणी शत्रूच्या हाती सापडू नये म्हणून सर्वांना सायनाइडच्या कॅपसुल देणारा धीरोदात्त नेता अशा विविध रंगी छटा या विलक्षण व्यक्तित्वात सामावल्या आहेत. हिटलरची भूमिका करणाऱ्या अलेक गिनिसने या साऱ्या छटा तितक्याच सूक्ष्मपणे व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे प्रसंगचित्रण नसतानाही हिटलरचे प्रभावी व्यक्तिमत्व प्रेक्षकाला भारून टाकते. बाकीच्या सहकाऱ्यांपैकी गोबेल्स सोडला तर बाकी कोणाचेच चित्रण पुरेसे स्पष्ट नाही. अगदी इव्हा ब्राउन या प्रेयसीचे सुद्धा.

एखाद्या जागतिक नेत्याचे-त्यातही हिटलरसारख्या क्रूर साम्राज्यवाद्याचे–व्यक्तिचित्रण इतक्या अभ्यासपूर्ण सूक्ष्म छटांसहित निःपक्षपातीपणे केलेले पाहायला मिळणे एकूण अवघडच; पण हे वेगळे वैशिष्टच घेऊनच हा चित्रपट आला आहे. ✲

## बाँडपटांची सद्दी संपली ?

गेले दशकभर जेम्स बाँड अमेरिकन चित्रपटसृष्टीत धुमाकूळ घालतो आहे. हिंदीतील गुन्हेगारी चित्रपटांचे निर्माते या बाँडपटांवरच गुजराण करत आहेत; पण साहसांची आवड असणाऱ्या प्रेक्षकांनी बाँडपटांना साथ द्यायचं कमी केलंय, बाँडपटांची सद्दी संपली असल्याचेच हे लक्षण आहे. नव्या बाँडपटामुळे तर हा समज पक्का होतो आहे. 'द मॅन वुइथ द गोल्डन गन' हा बाँडचा नववा चित्रपट; पण बाँडची क्रेझ निर्माण करणारा तगडा नट सीन कोनरी मात्र यात नाही आणि नवा बाँड रॉजर मूरला प्रेक्षक स्वीकारायला तयार नाहीत.

अमेरिकन चित्रपटातील क्रेझी झालेला विषय संपत आल्याचे एक लक्षण जाणकार मानतात ते म्हणजे त्याची विडंबने करणारी नवी चित्रनिर्मिती. अर्थातच ही विडंबनेही तिकडे अफाट लोकप्रियता मिळवतात. बाँडपटाची चिक्कार टिंगलटवाळी करणारा आणि

गुन्हेगारी जगातील वास्तवाचे दर्शन घडवणारा नवा चित्रपट पडद्यावर झळकला आहे. वॉरन बेटी या तरुण आणि बेछूटपणामुळे गाजत असलेल्या नटाने हा चित्रपट काढलाय. त्याचे नाव 'शांपू' त्याची हिरॉइन आहे ज्युली ख्रिस्ती. इयान फ्लेमिंगच्या अफलातून आयडिया, साहसी हाणामाऱ्या आणि सेक्सी दृश्ये यांची तर त्याने जाम टिंगल उडवलीय. तेव्हा बाँडपट पाहून मंडळी आता थकलीयत असे समजायला काही हरकत नाही. ✲

## अरिष्टपटांची नवी क्रेझ

बाँडपटांची सद्दी संपत आली असली तरी एक नवी क्रेझ निर्माण होत आहे. ही क्रेझ आहे अरिष्टपटांची. मानवी जीवितावर कोसळणारी नैसर्गिक अरिष्टे, त्यातून सुटण्यासाठी मानवाची धडपड या पार्श्वभूमीवर हे चित्रपट उभे राहात आहेत. या अरिष्टपटातील एक चित्रपट मुंबईत प्रदर्शित होत असून त्याचा प्रचंड गाजावाजा चालू आहे. अग्निप्रलयात सापडलेल्या उत्तुंग इमारतीमधील लोकांना वाचवण्यासाठी झालेला प्रयत्न चित्रित करणारा हा चित्रपट आहे 'टॉवरिंग इन्फॅर्नो.'

'टॉवरिंग इन्फॅर्नो'पेक्षाही सध्या पाश्चात्य जगात 'जॉज्' आणि 'अर्थ क्वेक' हे दोन चित्रपट धमाल करत आहेत. अमेरिकन समुद्रकिनाऱ्यावर मनुष्यभक्षक शार्कमाशांनी जो भीषण संहार घडवला त्याची ही कथा आहे. अंगावर शहारे आणणाऱ्या या अरिष्टकथेचे लेखक आहेत पीटर बेंचले. त्यांच्या 'जॉज' या मूळ कादंबरीने दहा लाख प्रतींची विक्रीमर्यादा ओलांडली आहे आणि हा चित्रपटही अशीच गर्दी खेचत आहे. 'अर्थ क्वेक' ही अशीच एक भीषण कहाणी आहे. एका बेटावर भूकंपामुळे जो भीषण उत्पात घडतो त्याचे हे दृश्य चित्र. अत्याधुनिक तंत्राचा वापर हे या साऱ्या अरिष्टपटांचे वैशिष्ट्य आहे. 'अर्थ क्वेक' पाहताना तर आपणच त्यात सापडलो आहोत असा भास होतो. प्रेक्षक चक्क सैरावैरा पळत सुटतात असा विलक्षण अनुभव काही ठिकाणी आला आहे. ✲



## 'नो रिस्क' रणधीर कपूर

रणधीरच्या धरमकरमचा ट्रेलर परवा पाहिला आणि हादरलो. राज कपूर पोरासाठी आपल्याकडे चक्क भीक मागतोय हे पाहून दुसरे काय होणार? 'माझी सेवा जशी गोड करून घेतलीत तशीच रणधीरची सेवा घ्या!' अशी प्रार्थना चक्क आर. के. करत होता. धरमकरमची जी हवा बनवली जातीय त्यात हा ट्रेलर पाहूनच निराशा झाली.

धरमकरममध्ये दोन बापमुलातील संघर्षाची कथा आहे आणि रणधीर नेहमीप्रमाणे पहिल्यांदा भोळा, खेडवळ आणि नंतर ठिश्यांव व ढिश्यांववाला शहरी नायक अशाच अवतारात दिसणार. रणधीरचा हा एक साचाच ठरून गेला आहे. तसे हे भोळेपण राजशी जुळणारेच. पोंगा पंडित, रामपूरका लक्ष्मण इत्यादीतून त्यांनी हीच इमेज निर्माण केली आहे. सध्याच्या काळात तेवढा एकच मार्ग त्याला होता म्हणा; पण डब्बू नवीन काही करायच्या मूडमधे नाहीय. आर. के. सारखी हिंदी सिनेसृष्टीतली अफाट ताकद मागे असूनही 'नो रिस्क'चाच त्याचा जप चालू आहे. आपली इमेज सोडून नवे काही करणे परवडणार नाही असे त्याचे म्हणणे. 'जोकर'चा फटका रणधीरच्या मनावरही भलताच परिणाम करून गेलाय. म्हणून तर ट्रेंड बदलणे आपले काम नाही असे सांगून तो चक्क हात वर करतो आहे. डब्बूची ही बडबड ऐकून राजकपूर तरी काय करणार? आपल्याला प्रार्थनाच!

रणधीरचे चित्रपट आणि आपल्या शाहीर दादा कोंडक्यांच्या चित्रपटात जबरदस्त साम्य आहे. दोघांचेही नायक भोळेभाबडे, बहुतांशी खेडवळ तरुण; पण परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडून वगैरे शहरी ट्रिक्स शिकणारे आणि मग धमाल. भूमिकांना विनोदी टच देऊन कॉमिक वेड्यावाकड्या हालचाली आणि अर्थातच स्वतःभोवती सतत कॅमेरा. कथावस्तूला एकूण महत्त्व कमीच. लोकनाट्यासारखी एखादी छोटी मध्यवर्ती थीम मिळाली की मग देधमाल. सध्या दोघांचेही पिक्चर धमाल चालले आहेत आणि त्यामुळेच दोघेही ट्रेंड बदलायला तयार नाहीत. नवनवीन भूमिकांपेक्षा इमेजची काळजी पडलीय दोघांना. रणधीरचे एक ठीक आहे. जबरदस्त स्पर्धा आहे; पण दादांचेही तेच? ✲

## ये फैशनका जमाना है!

फिल्मी फॅशन ही तर रोज बदलणारी चीज आहे. प्रत्येक नवा चित्रपट एक नवी फॅशन घेऊन येत असतो; पण कोणत्या कपड्यांची फॅशन रूढ होते? कारण एकाच चित्रपटात शेकडो नवे कपडे आपण पाहतो. मात्र फॅशन म्हणून त्यातला एखादाच पुढे येतो. असे का? फॅशन बदलण्यात अधूनमधून श्रेय घेणारी अरुणा इराणीच सांगतेय त्याचे रहस्य.

'चित्रपटात येणाऱ्या नव्या ड्रेसला सेक्स अपील आहे का नाही, तो परंपरावादी आहे का परंपराविरोधी यावर फॅशन अवलंबून नाही. फॅशन अवलंबून आहे ती तो ड्रेस कोण घालतो यावर. अहो, एखादा सुंदर ड्रेस असून तो जर अजागळासारखा घातला तर त्याची का फॅशन होणार आहे? नाहीच; पण तोच ड्रेस एखाद्या हिरो वा हिरॉइनने त्यातली मस्ती अनुभवत दिमाखदारपणे घातला तरच तो आवडणार. नाही तर सेक्स अपील असूनही किती तरी ड्रेस पब्लिकच्या लक्षातच येत नाहीत.' समजले? म्हणजे सेक्सी ड्रेससाठी अरुणा नाही तर हेलनच पाहिजे. नाही तरी हिरॉइनपेक्षा यांचेच ड्रेस फॅशन म्हणून जास्त गाजतात हे सर्वश्रुतच आहे. तेव्हा ये फैशन का जमाना है असे म्हणत वाट पाहाणे नव्या फॅशनची.

✲

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**२७।१२।७५ ते २।१।७६**

## देशाच्या राजकारणात अनुकूल विचारमंथनाची चाहूल

मकर ही भारताची सध्या तरी एक समर्थ रास बनली आहे व भारताचे सामर्थ्यही वाढले आहे. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची रास देखील मकर आहे. त्यामुळे देशाची कारकीर्द त्यांच्या असामान्य कर्तृत्वाशीच निगडित झाली आहे. मात्र रवि हा मकर-राशीच्या व्ययस्थानी दबा धरून बसला आहे. त्यामुळे अजून अडचणी संपलेल्या नाहीत याचा प्रत्यय या आठवड्यात येईल असे वाटते. पुढील आठवड्यात संसदेचे अधिवेशन सुरू होणार आहे. त्याआधीचा हा आठवडा राजकीय पक्षांसमोर अनेक प्रश्नचिन्हे उभी करणार आहे. रवि बारावा असला तरी यातून अगदीच काही प्रतिकूल अगर निराशाजनक दृश्य दिसेल असे नाही. उलट अनुकूल विचारमंथनाची चाहूल या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. या संभवातून अमृत बाहेर पडेल अशी बरीच शक्यता आहे. जागतिक रंगमंचावर भारताची प्रतिमा उंचावेल व आर्थिक परिस्थिती सुधारेल. महाराष्ट्राला या आठवड्यात बरेच महत्त्व प्राप्त होणार आहे व एकंदर परिस्थितीत एखादी महाराष्ट्रीय व्यक्ती महत्त्वाची कामगिरी बजावील.

**मेष** : महत्त्वाच्या घटना

खरे म्हणजे शुक्र-हर्शलयुतीपासूनच तुमच्या बाबतीत दैवाची खैर चालू झाली आहे. तुम्ही आता असमाधानी राहाणे मुळीच योग्य नाही. भाग्यस्थानी रवि आणि दुसरा मंगळ तुमचे व्यावसायिक जीवन उन्नत करीत आहेत. तुम्ही आता कोणतेही काम ठरवा किंवा औद्योगिक प्रकल्प हाती घ्या. यश आणि प्रगती सावलीसारखी तुमच्याबरोबर येणार आहे. केतूचे तुम्ही काही मनावर घेऊ नका. राजकारणात तुमचा शब्द प्रमाण मानला जाईल. गेलेली शान परत मिळेल. मनाची अस्वस्थता कमीकमी होऊ लागेल. नोकरीच्या बाबतीत तुम्हाला जर वरिष्ठांबरोबर काही बोलणी करावयाची असतील तर याच आठवड्यात करा. मंगळवार, गुरुवार व शुक्रवार महत्त्वाच्या घटनांचा आनंद मिळेल. महिलांना नोकरीत अधिकार मिळतील. लहानसा धंदा सुरू होईल. विद्यार्थ्यांना प्रगतीची चाहूल लागेल.

**वृषभ** : कर्तृत्वाला आवाहन

आठवा रवि आणि वक्री असला तरीदेखील पहिला मंगळ तुमच्या अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य तुम्हाला देणार आहे. आर्थिक परिस्थिती जरी एकदम सुधारली नाही तरी आर्थिक ताण मात्र कमी होण्याची सुचिन्हे या आठवड्यापासून दिसू लागतील. पैशाच्या बाबतीत जे जे प्रयत्न कराल ते ते यशस्वी होऊ लागतील. सोने-चांदी खरेदी-विक्री करणारे, जमीन खरेदी-विक्री करणारे, सौंदर्यप्रसाधनांचा व्यापार करणारे यांना प्रकाश दिसू लागेल. या आठवड्यात हा सारा व्यापार चार पैसे नफा मिळवून देईल. नोकरीत जबाबदारी वाढणार आहे. मोठी जबाबदारी व मोठा अधिकार असे काही तरी घडेल. मात्र माणसे दुखवू नका. केतूमुळे अनपेक्षित अडचणी येण्याची शक्यता आहे; पण त्या दूरही होतील. महिलांना नोकरीत नवे आवाहन मिळणार आहे. ते स्वीकारून त्यांनी धाडस करावे. विद्यार्थ्यांना चित्रपट व नाट्यसृष्टीत प्रगतीची संधी मिळेल.

**मिथुन** : अडचणीतून मार्ग निघेल

वक्री मंगळाचे कठोर चटके तुम्हाला बसत आहेत हे खरे; पण तेवढ्याने हतबल होऊ नका. शुक्र-हर्शलाची युती गेल्या पंधरावड्यात पाचव्या स्थानी झाली होती ती तुम्हाला प्रेरक ठरणार आहे. नोकरीत त्रास देण्याचा प्रयत्न तुमचे वरिष्ठ करणार आहेत; पण त्यांना तुमची बाजू संयमाने पटवून देण्यात तुम्हाला यश येईल. ज्यांना या आठवड्यात सेवानिवृत्ती पत्करावी लागणार आहे त्यांनी राजकारणी व्यक्तीमार्फत आपली बाजू वरिष्ठांकडे मांडावी. त्यांना यश लाभेल. आर्थिक परिस्थिती जरा अडचणीची होईल. अनपेक्षित खर्च निर्माण होतील; पण त्यामुळे तुम्हाला फार त्रास सहन करावा लागणार नाही. कुलदेवतेची उपासना करा. हेतूसिद्धीसाठी नवस करा. तुमचे काम यशस्वी होईल. रविवार ते बुधवार अनपेक्षित अनुकूल घटनांचा आनंद मिळेल. बेकारीचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर राहील. महिलांना थकवा, डोकेदुखीचा त्रास जाणवेल. नोकरीत कामाचा ताण पडेल; पण अडचणी मात्र कमी होतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या बाबतीत निष्काळजी राहू नये.

**कर्क** : असमाधानातही यश

वृश्चिकेचा शुक्र तुमच्या वैयक्तिक



VP-735

जीवनात काही तरी नवे चैतन्यमय असे प्रकरण निर्माण करणार आहे. मात्र प्रतिष्ठा व दर्जा याला कमीपणा येईल असे काही करू नका. सर्वसामान्यपणे मानसिक अस्वस्थता, भावनावशता, वासनाविवशता असे काही तरी तुमच्या बाबतीत घडले तर आश्चर्य मानू नका. यावर श्रीदत्तगुरुमहाराजांची भक्तिभावे उपासना करणे हाच उत्तम उपाय आहे. नोकरीच्या बाबतीत नवी जबाबदारी स्वीकारावी लागेल; पण मन स्वस्थ राहू शकणार नाही. चालू नोकरीत वरिष्ठांबरोबर किंवा मालकांबरोबर मतभेद वाढवू नका. हिशोबी कामे ज्यांच्याकडे आहेत त्यांना विनाकारण काळजी राहील. बेकारांना या आठवड्यात नोकरी अगर स्वतंत्र उद्योग मिळू शकेल. आश्वासने प्रत्यक्षात उतरतील. प्रवासाचा अनपेक्षित योग येण्याची शक्यता आहे. महिलांना सोमवार ते बुधवार सार्वजनिक कार्यात, नोकरीव्यवसायात आनंदाचे क्षण अनुभवता येतील. विद्यार्थ्यांना अडचणी शिल्लक राहणार नाहीत. त्यांचे पैशाचे काम होईल.

## सिंह : राजकीय स्थित्यंतर

राशिस्वामी रवी पाचवा ही तुमच्याबाबतीत अतिशय महत्त्वाची गोष्ट होय. हा रवी तुमचे राजकीय स्थित्यंतर घडवून आणणार आहे. अर्थात शनी बारावा असल्यामुळे फार मोठी आशा करण्यात अर्थ नाही; पण आजपर्यंत झालेली पदावनती या वेळी भरून निघेल. तुमची उणीव भासावी, तुमची गरज भासावी असे काही तरी घडेल व त्यामुळे तुमचे वजन वाढेल. नोकरीच्या बाबतीत झालेला अपमान या आठवड्यात थोडाफार दूर होऊ शकेल. वरिष्ठांच्या मनात सुविचार येईल व तुमच्यावरील अन्यायाचा ते फेरविचार करतील. वाणिज्य, पदवीधर, शेतीपदवीधर यांना या आठवड्यात नोकरी अगर धंदा मिळू शकेल. इंजिनियरांचे कौतुक होईल. रविवार ते गुरुवार व्यावसायिक उन्नती, व्यापारात उत्कर्ष होईल. महिलांना या आठवड्यात नोकरीच्या बाबतीत सहानुभूती मिळेल. नोकऱ्या कायम होतील. विद्यार्थ्यांना राजकारणात महत्त्व येईल; पण त्यांनी लहान व्यापार सुरू करावा.

## कन्या : पैशाची सोय होईल

कन्याराशीच्या व्यक्ती या आठवड्यात भलत्याच महत्त्वाच्या ठरणार आहेत. त्यांच्यावर नोकरीच्या बाबतीत आजवर जो अन्याय झाला असेल त्याची वरिष्ठांना जाणीव होईल. उत्तम धंदा या आठवड्यात पुन्हा अंग धरील. तुमच्या मनातील आळस, नैराश्य दूर होईल. काही तरी केले पाहिजे असे वाटू लागेल. सार्वजनिक जीवनात मोठ्या लोकांचा परिचय होईल. तुमच्या गुणांची ओळख पटेल. काही महत्त्वाच्या वाटाघाटी होतील. चालू नोकरीत कामाचा ताण वाढला तरी त्रास नाही. स्वतंत्र उद्योग या वेळी सुरू करायला हरकत नाही. घर बदलणे, जागा नसल्यास ती मिळवण्याची खटपट करणे, जागेची सजावट करणे असे काही तरी या आठवड्यात करा. मंगळवार व शुक्रवार अनुकूल अनुभव येईल. गुरुवारी कामाचा ताण वाढेल. महिलांना मानसिक स्वास्थ्य मिळू शकेल. संसारात पैशाची टंचाई कमी भासेल. सुख व स्वास्थ्य मिळेल. विद्यार्थ्यांना अनुकूल ग्रहमान आहे. यश व सिद्धी मिळेल.

## तूळ : प्रतिष्ठा वाढेल

हा आठवडा तुम्हाला अनेक बाबतीत प्रगतीचा जाणार आहे. तुम्ही कलावंत असाल तर तुमच्या कलेला प्रसिद्धी व प्रतिष्ठा मिळणार आहे. लेखक असाल तर तुमचे लिखाण लोकप्रियता मिळवील. गायकांना या वेळी लोकप्रियता व पैसा मिळणार आहे. सिनेकलावंत, नाट्यव्यावसायिक यांना भरपूर मागणी येईल. नोकरीच्या बाबतीत रेंगाळलेली कामे पुरी होऊ शकतील. काही महत्त्वाच्या गोष्टीबाबतीत तुमचा सल्ला महत्त्वाचा मानला जाईल. राजकीय व सत्तेवरील एखादी मोठी व्यक्ती या वेळी तुमच्या सहवासात येईल व त्यामुळे तुमचा फायदा होईल. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी गरजेपुरता पैसा मिळणार आहे. तो मिळण्यात अडचणी नाहीत. शुक्रवार उत्तम आहे. महत्त्वाची कामे करा. महिलांना भेडसावणाऱ्या अनेक अडचणी या वेळी दूर होतील. नोकरीत पगारवाढीचा विचार होईल. विद्यार्थ्यांना करमणूक होईल. सहलीची संधी मिळेल.

## वृश्चिक : खर्चाचे भान ठेवा

शुक्र-हर्शलच्या युतीपासून तुमचा खर्चावरला ताबा सुटत चालला आहे. देण्याचे तगादे, मिळकतीत कपात, अचानक आजाराचा खर्च, शिवाय थोड्याबहुत प्रमाणात नसत्या उपद्व्यापापायीदेखील तुमच्याकडून खर्च होत असेल त्याला या आठवड्यात थोडाफार आळा घालण्यात तुम्हाला यश मिळेल. बचतीची इच्छा या वेळी पुरी होईलच असे नव्हे; पण बाहेरचा त्रास कमी होईल. नोकरीत वरिष्ठांबरोबर व मालकांबरोबर चांगले संबंध राहतील. तुमच्या योजना ते ऐकून घेतील. मात्र या वेळी तरी तुमच्या इतर कोणत्याच मागण्या मागू नका. बेकारांना नुसते आश्वासन मिळेल. नोकरीत ऑर्डर आली तरी हजर होण्यात अडचणी



**धनु : व्यक्तिमत्त्व सुधारेल**

राशीतच रवि आहे. हा रवि तुमचे सारे मनोरथ पूर्ण करणार आहे. या आठवड्यात तुम्ही कुरकुरत बसावे किंवा आळस काढीत बसावे हे तुमच्या नशिबाला मान्य नाही. स्वतंत्र उद्योगासाठी या वेळी कोणतेहि प्रयत्न करा. पैसा अगर इतर मदत सहज मिळू शकेल. नोकरी करणाऱ्यांना या आठवड्यात आनंदाची बातमी कळेल. ज्यांच्या नोकरीत अडथळे येत होते त्यांना ते अडथळे दूर झालेले दिसतील. नव्या नोकरीच्या ऑर्डर्स मिळतील. चालू नोकरीतील तुमची कार्यक्षमता वाढीस लागेल व मालकांना तसेच वरिष्ठांना तुमची गरज भासेल. एखादी अशी योजना खास तुमच्यासाठी तयार केली जाईल किंवा तुमची योजना मान्य केली जाईल. आर्थिक बाजू बऱ्याच प्रमाणात सुधारेल. पैसे मिळण्यास अडचणी येणार नाहीत. तब्येत उत्साही राहील. शनिवार, बुधवार व शुक्रवार कोणत्याहि कामात यश. महिलांना नोकरीत मोठे स्थान व अधिकार मिळणार आहेत. मन आनंदी राहील. विद्यार्थ्यांना या आठवड्यात अडचणी भासणार नाहीत.

**मकर : आर्थिक ताण**

बारावा रवि फारसा चांगला नाही. तुम्ही व्यक्ती या आठवड्यात तुम्हाला मदतीचा हात पुढे करील. राजकारणात तुम्हांला हा आठवडा आत्मसंशोधन करायला लावणार आहे. विरोधक वाढतील. संधीचा फायदा घेऊन तुम्हाला हिणवण्याचा प्रयत्न करतील. मात्र तुम्हाला ते सहन केल्याखेरीज गत्यंतर उरणार नाही. नोकरीत बदलीची बरीच शक्यता असून येणारे आव्हान तुम्ही स्वीकारावे. त्रास आहे पण पुढील आठवड्यापासून सारे सुसह्य होऊ लागेल. महिलांना घरगुती व्यवहारात खर्चाची फार काटकसर करावी लागणार आहे. पैसे कमी मिळतील. विद्यार्थ्यांना राजकीय त्रास होईल. सावध राहावे.

**कुंभ : अनपेक्षित यश**

राशिस्वामी शनि सहावा आहे ही तुमच्या बाबतीत एक उत्तमच घटना होय. या आठवड्यात रवि अकरावा आहे त्याचा तुम्ही फायदा करून घ्या. कोणतेही पाऊल या वेळी उचलले तरी ते यश घेऊन उठेल. नोकरी, व्यापार, शेती, दलाली, कारखानदारी या कोणत्याही बाबतीत हा आठवडा यश मिळवून देणार आहे. नोकरीत तुमच्या मागण्यांना या वेळी हिरवा कंदील मिळेल. नवी नोकरी मिळण्यातील अडचणी दूर होऊन प्रत्यक्ष ऑर्डर हाती येईल. राजकारणात तुमचे स्थान उंचावेल. प्रतिष्ठा वाढेल. राजकारणात विद्यार्थ्यांना प्रवास व लॉटरीत लाभ होईल.

**मीन : उद्योगात उत्कर्ष**

तिसरा वक्री मंगळ तुम्हाला या आठवड्यात फार महत्त्वाचे लाभ पदरात पाडून देणार आहे. तुमचा कोणताहि उद्योग असो त्यात उत्कर्षाचे नवे पर्व सुरू होणार आहे. भागिदारीतून तुमची सुटका होणार असून तुमचे स्वतंत्र कर्तृत्व प्रत्ययास येईल. तुमच्या नव्या योजना व नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुकूल क्षेत्र लाभेल. आर्थिक परिस्थिति अनुकूल आहे. मदत मिळेल, कर्ज मिळण्यासाठी फारसे श्रम करावे लागणार नाहीत. बँकेकडून वा इतर ठिकाणाहून कर्ज मिळवू शकाल. कागद, स्टेशनरी, मुद्रण–साहित्य, कापड, प्लॉट, घरे, सोने–चांदी व भांडी हा व्यापार तेजीत चालेल. याला उठाव येईल. पत्रकार, लेखक यांना आठवडा सुखाचा, समाधान देणारा जाईल. पत्र-व्यवहार करावयाचा असेल तर तो याच वेळी करा. नोकरीत त्रास कमी होऊन तुमच्या कर्तृत्वाचा प्रभाव पडेल. गुरुवार, शुक्रवार हे दोन दिवस महत्त्वाच्या वाटाघाटी–चर्चा करण्यास अनुकूल आहेत. महिलांना वाङ्मयीन क्षेत्रात मोठा मान मिळेल. नोकरीत बढती–बदली मिळेल. विद्यार्थ्यांना श्रम करून चार पैसे मिळवता येतील. ☐ ☐


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# संभवामि युगे युगे

भगवान श्रीविष्णूंचा जयजयकार करीत स्वर्गीचे देव क्षीरसागरावरून आपापल्या ठिकाणी परतले. त्याचं काम झालं होतं. भगवान श्रीविष्णु अवतार घेणार होते !

त्याला कारणही तसंच होतं.

इहलोकी सामान्य माणसाचं दुःख पराकोटीला पोचलं होतं. आपल्या कुवतीनुसार देवांनी माणसाला मदत करायचा खूप प्रयत्न केला होता; परंतु परिस्थिती अधिकच बिघडली होती. आता मानवाला तारणं फक्त भगवान महाविष्णूंच्या हाती होतं. अन् भगवान श्रीविष्णूंना तर गाढ झोप लागली होती जणु ! कृष्णावतारानंतर भूलोकी सगळे आलबेल आहे असंच त्यांना वाटत होतं.

स्वर्गीच्या देवांनी शेवटी त्यांचा धावा करायचं ठरवलं. क्षीरसागराच्या काठावर जमून त्यांनी भगवान श्रीविष्णूंचा धावा केला. त्यांना आळवलं. त्यांची प्रार्थना केली.

शेवटी भगवान श्रीविष्णू प्रसन्न झाले.

देवांनी आपली कैफियत त्यांना सादर केली.

भूलोकावर सर्वच बदललं होतं. शब्दांच्या व्याख्या बदलल्या होत्या. कष्टाला किंमत राहिली नव्हती. जुना चातुर्वर्ण पार मोडला होता. त्याची जागा नवीन चातुर्वर्ण घेत होता. प्रामाणिक माणूस तोंड लपवून वागत होता. पतिव्रतांना तोंड काढायला जागा नव्हती. कष्ट करून घाम गाळणारे जन्मभर दारिद्र्यात खितपत पडले होते. स्वदेशीचं नाव काढल्यावर आता छाती अभिमानानं फुगत नव्हती. जमाना 'इंपोर्टेड'चा होता. रात्रीचा दिवस करून अभ्यास करणारे विद्यार्थी नापास होत होते. पास होण्याचं वेगळंच तंत्र उदयाला आलं होतं. भ्रष्टाचार, काळाबाजार आणि साठेबाजी यांना राजाश्रय मिळाला होता. दुष्टांचं राज्य स्थापन झालं होतं.

एवढा सगळा गाळ उपसणं स्वर्गीच्या देवांच्या आवाक्याबाहेरच होतं; परंतु त्यांच्याच्यानं कोट्यवधी मानवांच्या यातना पण पहावल्या जात नव्हत्या !

आणि देवांना मग आठवलं.

कृष्णावतारी भगवानांनी अर्जुनाला दिलेलं वचन !

'यदा यदाहि धर्मस्य...'

अवतार घ्यायला भगवान श्रीविष्णूंना यापेक्षा चांगली ओळ शोधूनही सापडली नसती.

भगवान श्रीविष्णूंना हे सगळं ऐकून प्रथम आश्चर्य अन् नंतर खेद वाटला. 'बहुरत्ना वसुंधरा' नालायक मानवांच्या हाती दिल्याबद्दल पश्चात्ताप करायची वेळ आली होती.

किंचित विचार करून त्यांनी निर्णय जाहीर केला.

अवतार घेण्याचा ! गरीब घरात, झोपडपट्टीत जन्म घेऊन, भगवान श्रीविष्णु दुष्टांचं निर्दालन आणि साधूंचं संरक्षण करणार होते. भगवान श्रीविष्णूंचा जयजयकार करीत क्षीरसागरावरून स्वर्गीचे देव आपापल्या ठिकाणी परतले.

दुष्टांच्या राज्याचे दिवस भरले होते...

चंद्रभागेला पुन्हा दिवस गेले, तेव्हा मात्र विठ्ठलनं कपाळावर हात मारून घेतला. चार मुलींच्या नंतर या आगंतुक जिवाचा भार त्याच्यावर पडणार होता. हेच दोन वर्षांपूर्वी झालं असतं तर त्यानं बायकोचं खूप कौतुक केलं असतं. एक तरी मुलगा असावा असं त्याला अन् चंद्रभागेला वाटायचं. वंशाचा दिवा कोणाला नको असतो ? त्याशिवाय मरणोत्तरसुद्धा मुक्ती मिळत नाही !

परंतु गेल्या दोन वर्षांत विठ्ठल आमूलाग्र बदलला होता. सतत दोन वर्षांच्या दुष्काळात त्याचा पार धुव्वा उडाला होता. दहावीस एकरांचा मालक अगदी कंगाल बनून शहरात आला होता. झोपडपट्टीत जनावरापेक्षाही भयंकर जीवन कंठीत होता. बायकोचे आणि पोरींचे हाल त्याला पहावत नव्हते. गावाकडे मालकीण म्हणून रुबाब गाजवणारी चंद्रभागा झोपडीतून बाहेर पडायला लाजत होती अन् तिच्या चार मुली कुठल्या तरी उकिरड्यावर कागद गोळा करीत होत्या.

दुष्काळानं त्यांना पार खलास केलं होतं.

उरलसुरल Z. P. च्या टोपीवाल्यांनी नेलं होतं. विठ्ठलला पुरतं नागवल्यावर त्यांची नजर चंद्रभागेकडे वळली.

तेव्हा विठ्ठलनं गाव सोडलं आणि शहराचा रस्ता धरला.

पण दैव त्याचा पिच्छा सोडीत नव्हतं. चंद्रभागेला दिवस गेले. तिच्या डोळ्यांभोवतालची काळी वर्तुळं अजूनच वाढली आणि भरीला भर म्हणून की काय, तिचं या वेळचं सगळंच वेगळं होतं. विचित्र इच्छा होत होत्या. कसलं मूल पोटात वाढत होतं कोण जाणे !

तिला जगावेगळे डोहाळे लागले होते.

मधूनच ती संतापून उठायची, म्हणायची, कुठे आहेत ते काळाबाजारवाले ? द्या त्यांना चौकाचौकातून फाशी ! कशाला त्यांची चौकशी करता ?'

झोपडपट्टीला लागून असलेली तीस मजली इमारत जणु तिच्या डोळ्यांत कुसळाप्रमाणे सलायची. तिकडे खूण करून ती म्हणायची, 'खणून काढा ती इमारत ! लक्षावधी लोक ऊन–पावसात मरत आहेत, त्यांना साधा निवारा नाही अन् हे भ्रष्टाचारी इमले उठवताहेत ! कुठून मिळवलं त्यांनी एवढं सिमेंट ?'

निरक्षर चंद्रभागा असं बोलायला लागली म्हणजे तिच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज दिसायचं. विठ्ठलला तिची भीती वाटायची. त्याला वाटायचं 'हिच्या पोटी एखादं भूत तर जन्माला येणार नाही ?'

दिवस जात होते. विठ्ठल, चंद्रभागा आणि त्यांच्या मुली यांना उपास घडत होते. तरीही या अवस्थेत चंद्रभागेच्या पोटातला गर्भ वाढतच होता. त्याला अन्नपाण्याची मुळी

आवश्यकताच नव्हती. चंद्रभागेची साधी आंबट चिंचेची मागणी विठ्ठल पूर्ण करू शकत नव्हता. बायकोचे असले डोहाळे पाहून तो अवाक् झाला होता.

चंद्रभागेला फक्त एकाच गोष्टीचे डोहाळे लागले होते.

तिला भ्रष्टाचार समूळ नष्ट करावयाचा होता ! तिला दुष्टांना शासन करायचं होतं ! तिला सज्जनांचं, साधूंचं राज्य आणायचं होतं !

एके दिवशी तर तिने कहरच केला.

सायकलला बरण्या अडकवून, दूध घालणारा भैय्या रस्त्यावरून जात होता. त्याला पाहिल्याबरोबर चंद्रभागा ताडकन् उठली. त्याला थांबवून तिनं बरणीचं झाकण उघडलं. आतलं दूध पाहिल्यावर तिचं डोकं फिरलं. म्हणाली,

' असलं दूध विकता ? याचं काय करणार ? किती लोणी निघणार ? आम्हाला लोणी कसं मिळणार ? खबरदार ! इथून पुढं असं दूध विकलंस तर ! यमुनेच्या डोहात बुडवीन ! कालियामर्दन विसरलास काय ?'

हनुमानाचा भक्त असलेल्या भैयानं शांतपणानं आपला हात सोडवून घेतला. बरणीचं झाकण परत लावलं अन् सायकलवर टांग मारून तो आपल्या कामाला निघून गेला. असल्या अनेक रागीट बायका त्यानं पाहिल्या होत्या. प्रत्येकीला चांगलं, निरसं घट्ट दूध द्यायचं म्हटलं असतं तर त्याचं दिवाळं निघालं असतं !

विठ्ठल मात्र काळजीनं खंगून गेला होता. या वेळचं चंद्रभागेचं गरवारपण काही वेगळंच होतं. नक्की कुठला तरी वेगळाच गर्भ तिच्या पोटात वाढत होता.

त्याच्या मनातले विचार चंद्रभागेला कळाल्यावाचून राहिले नाहीत. तिनं एके दिवशी नवऱ्याला बजावलं, 'तुम्हाला वाटतं, माझ्या पोटी भूत जन्माला येणार आहे. किती खुळे आहात ! आता दुष्टांचं राज्य नष्ट होणार आहे. आम्ही अवतार घेणार आहोत. विसरलात ? आम्ही कृष्णावतारी अर्जुनाला दिलेलं वचन ! धर्माला ज्या ज्या वेळी ग्लानी येईल, दुष्ट सगळीकडे माजतील, त्या त्या वेळी आम्ही पुन्हा अवतार घेऊ ! कौसल्या आणि देवकी यांना काय डोहाळे लागले होते ते आठवा! एवढं लांब कशाला ? जिजाबाईला शिवाजीच्या वेळी काय डोहाळे लागले होते ? तशीच वेळ आली आहे. जा, आनंदोत्सव करा ! '

आता मात्र विठ्ठलचं धाबं दणाणलं !

चंद्रभागेचं वेड टोकाला पोचलं होतं. काही तरी करणं आवश्यक होतं. झोपडपट्टीत रहाणं अवघड झालं होतं.

' त्यानं चार लोकांचा विचार घेतला अन् एके दिवशी चंद्रभागेला टॅक्सीत घालून त्यानं इस्पितळात नेलं.

कायद्यानं गर्भपाताला परवानगी दिली होती !

चार–सहा दिवसांनी चंद्रभागा परत आली होती. थकून, दमून, भागून ! तिचा पोटचा गोळा दुष्टांनी नेला होता. तिचं काही न ऐकता तिचा गर्भपात करवला होता.

झोपडपट्टीतलं विठ्ठल आणि इतरांचं जीवन सुरळीत चालू झालं. दूध घालणारा भैय्या नियमानं तसंच दूध घालायला लागला. उत्तुंग इमारतींचं बांधकाम आणखी जोरात सुरू झालं.

दुष्टांचं निर्दालन युगायुगांनी पुढे ढकललं गेलं !

**– डॉ. यशवंत देशपांडे,**
**औरंगाबाद**

---

# रांगवाले

रांगा लावण्याचा, रांगेत ताटकळत उभे राहण्याचा तापदायक अनुभव तुम्हा-आम्हा सर्वांनाच आहे. खरे तर रांग लावणे हा आधुनिक सभ्यतेचा एक सर्वमान्य संकेत झाला आहे. रांगा आणि रांगवाले या विषयावर एक चटकदार व उद्बोधक पुस्तक इंग्लंडमध्ये नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे : ' एव्हरीथिंग यू ऑल्वेज वॉंटेड टु नो अबाउट क्यूज बट वेअरंट इंटरेस्टेड इनफ टु आस्क! '

पुस्तकाचे लेखक प्रा. पी. एस्. स्नॅप हे इंग्लंडमधील सर्वांत मोठे रांगपंडित समजले जातात. या पुस्तकासाठी गेली अकरा वर्षं त्यांनी दीर्घ व्यासंग चालवला होता. या काळात ते स्वतः ८७५,००० रांगांत उभे राहिले आणि जवळजवळ २००,००० रांगांची हवाई छायाचित्रे त्यांनी घेतली.

या पुस्तकातील एक अत्यंत मनोरंजक भाग म्हणजे प्रा. स्नॅप यांनी केलेली अमेरिकन व इंग्लिश रांगांची तुलना. अमेरिकन ' ओळी ' आणि इंग्लिश ' रांगा ' यांच्यात तसे काहीच साम्य नाही, असे प्राध्यापकमहोदयांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते इंग्रज मनुष्य रांग लावण्यात आनंद मानतो, इतकेच नव्हे तर आपली वर्णी लागेपर्यंत रांगेत सहनशीलतेने उभे राहणे हा त्याच्या अभिनयाचा विषय आहे. उलट अमेरिकन मनुष्य, निदान अमेरिकेत तरी, रांगेत मोठ्या नाइलाजानेच उभा राहतो. रांगेत उभे राहणे त्याला कमीपणाचे वाटते.

अमेरिकेतील मनुष्यमालिकेला रांगेपेक्षा ' ओळ ' म्हणणे युक्त होईल. ' रांगे 'ची शास्त्रशुद्धता आणि कडवेपणा ' ओळी 'त नाही. अमेरिकेत ओळ जणु मोडण्यासाठीच लावण्यात येते. ओळीत उभे राहण्याचा प्रसंग आल्यास अमेरिकन मनुष्य स्वतःला विचारतो, ' ही ओळ मोडण्याचं धैर्य आपल्यापाशी आहे का ? '...ओळीत विनातक्रार उभे राहणे हे पाठीला कणा नसल्याचे लक्षण आहे, असेच अमेरिकन मनुष्य मानतो.

इंग्लंडमध्ये रांग मोडणे इतके निषिद्ध समजले जाते की एखाद्या ठिकाणी तसे घडले तर ते वर्तमानपत्रात छापून येते आणि त्यावर गंभीर चर्चा होते. रांग लावणे, ही आपली राष्ट्रीय जबाबदारी आहे; रांगेत विनातक्रार उभे राहणे, ही आपल्या सभ्यतेची सर्वोच्च निशाणी आहे, अशी इंग्रज मनुष्याची श्रद्धा असते.

*

# सप्रेम नमस्कार....

पृष्ठ ३ वरून

चिनी शिक्षक देत असल्याची छायाचित्रे अनेक आफ्रिकन वृत्तपत्रांत झळकली आहेत. ती पाहून आम्हास अपार क्लेश होतात. बांगला देशाच्या विमोचनाच्या वेळी भारतीयांची जी प्रतिक्रिया झाली तशीच एकमुखी प्रतिक्रिया याबाबतीत आफ्रिकेची झालेली आहे. वंशद्वेषाचा भस्मासुर काय करू शकतो याचा विसर आमच्या चिनी बांधवांना पडला काय ? जपानी वंशद्वेष्टया सामुराई लष्करशहांनी तान्ही चिनी मुले वर फेकून बागनेटांवर झेलली याची आठवण आमचे चिनी भाई विसरले काय ? हा असाच प्रकार पुढे चालू राहिला तर ? अगदी सौम्य भाषेत सांगायचे म्हणजे टांझानिया-झांबिया रेल्वेसारखे प्रकल्प उभारण्यास सहाय्य देऊन चीनने आफ्रिकेत संपादलेली सदिच्छा व श्रेय लवकरच धुळीस मिळतील. आमची हात जोडून प्रार्थना आहे की, आमच्या चिनी भाईंनी अजूनही आपला मार्ग सोडावा. उशीराने का होईना पण योग्य मार्गाची कास धरावी.

### कृपया वस्तुस्थिती डोळे उघडे ठेवून पहा

माझी खात्री आहे की, अंगोल्यातील वस्तुस्थिती भारतीयांना एकदा कळली की, एम. पी. एल. ए. तेथे वसाहतवादाविरुद्ध न्याय्य संघर्ष करीत होती व आहे हे त्यांना पटेल. याच काळात एफ. एन. एल. ए.च्या नेतेमंडळींनी किन्शासामध्ये बसून वसाहतवाद्यांचे प्रणयाराधन करण्यापलीकडे काहीही केले नाही. युनिटा तर साधा उल्लेख करण्याच्या लायकीचाही पक्ष नव्हता व अजूनही नाही. सहज सांगायची गोष्ट म्हणजे खनिज तेलाने समृद्ध असलेल्या काबींडा प्रांतावर एफ. एन. एल. च्या लोकांनी हल्ला चढविल्याबाबतचे आपण दिलेले वृत्त साफ चुकीचे आहे. काबिंडा प्रांत अंगोल्यातून फुटून निघण्याविषयीच्या व अंगोल्याचे तुकडे पाडण्याच्या प्रस्तावाला एफ. एन. एल. ए.ने तसेच युनिटानेही उघड पाठिंबा जाहीर केला आहे. मग पुन्हा काबिंडावर हल्ला करण्याचे त्यांना कारणच काय ?

आता शेवटची गोष्ट. वसाहतवादविरोधी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या सर्व भारतीयांना मी एक दिलासा देऊ इच्छितो. वसाहतवाद्यांचे हल्ले एम. पी. एल. ए. निर्धाराने परतवीत आहे. काझोंबो व काबिसतो ही शहरे एम. पी. एल. ए. ने पुन्हा जिंकून घेतली आहेत. नायजेरियासारख्या पाश्चात्य राष्ट्रांशी अत्यंत सलोख्याचे संबंध असलेल्या राष्ट्रानेही आता एम. पी. एल. ए.ला संपूर्ण राजनैतिक मान्यता दिलेली आहे. लवकरच बहुसंख्य अन्य आफ्रिकी राष्ट्रे नायजेरियाचा कित्ता गिरवतील. नुकतेच बी. बी. सी. ने असे वृत्त दिले की, विनाशर्त बोलणी सुरू करण्याचे आवाहन एफ. एन. एल. ए. व युनिटा यांनी एम. पी. एल. ए. ला केले आहे; पण या गोष्टीस जाता फारच उशीर झाला आहे. या दुष्ट जोडगोळीचा धुव्वा उडणे हा केवळ कालावधीचाच प्रश्न आहे. एक प्रख्यात अमेरिकन वृत्तपत्र न्यूयॉर्क टाइम्सने नुकतेच म्हटले आहे की, प्रचंड प्रमाणावर अमेरिकेने हस्तक्षेप केला नाही तर एम. पी. एल. ए. चा विजय निश्चित आहे. दुसरे एक प्रसिद्ध अमेरिकन वृत्तपत्र लॉस एंजल्स टाइम्सने असा गौप्यस्फोट केला आहे की, अलीकडच्या आठवडयात एम. पी. एल. ए. ला सहाय्य सोविएत युनियनकडून पोहोचण्यापूर्वीच एफ. एन. एल. ए. व युनिटाला प्रचंड सहाय्य करण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फोर्ड व किसिंगर यांनी घेतला होता व अंमलातही आणला होता.

या पत्राखेरीज मला आपल्या नियतकालिकामार्फत भारतीय वाचकांना विनंती करायची आहे की, त्यांनी एम. पी. एल. ए.ला नैतिक पाठिंबा द्यावा. अंगोल्याच्या कसोटीचा हा क्षण आहे; पण त्याचबरोबर अंगोल्याच्या कीर्तिवैभवाचाही हा क्षण आहे.

### अंगोलाबाबत योग्य भूमिका कोणती ?

श्री. कांगा इडोडे (डॉंज) यांचे अंगोलासंबंधी माझ्या लेखावरील पत्र वाचले. या पत्राचे व त्यातील टीकेचे मी स्वागत करतो. अशा विचारविनिमयातून वस्तुस्थिती समजून घेण्यास मदत होते.

श्री. इडोडे यांच्या टीकेसंबंधी माझ्या भूमिका थोडक्यात मांडीत आहे. 'अंगोला—आफ्रिकेतील व्हिटनाम' या शीर्षकामुळे उंचावलेल्या अपेक्षा लेख पुऱ्या करीत नाही. लेखामध्ये रंगवलेले अंगोलातील परिस्थितीचे चित्र पूर्णतया विपर्यस्त आहे.' असे इडोडे यांचे म्हणणे. या विषयावर अधिक सविस्तर लिहिता आले असते; पण जागेच्या मर्यादेत ते शक्य नव्हते. 'अंगोला—आफ्रिकेतील व्हिटनाम' हे शीर्षक देण्यामागे माझा उद्देश व्हिटनामप्रमाणे तेथील यादवी युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता आणि संघर्षात बडया राष्ट्रांचा हस्तक्षेप याकडे लक्ष वेधणे हा होता आणि तो पुरेसा स्पष्ट झाला आहे असे मला वाटते. अंगोलात ज्या तीन संघटनांत यादवी युद्ध चालू आहे त्यांच्या नियंत्रणाखाली कोणता टापू आहे, कोणत्या जमातींचा त्यांना मुख्यत: पाठिंबा आहे एवढयासाठीच जमातींचा उल्लेख मी केला. त्यावर इडोडे यांची टीका अशी की, अंगोलाचे 'जमातवादी' चित्रच मी रंगवले. माझ्या सबंध लेखात हा उल्लेख फक्त आठ-दहा ओळींचा आहे. अंगोलाचा समाज कोणत्या जमातींचा बनलेला आहे याची माहिती द्यावी एवढाच उद्देश त्यामागे होता. त्यात जमातवादी दृष्टिकोनाचा कोठेही पुरस्कार केलेला नाही. लेखात मी एम. पी. एल. ए. ची बाजू घ्यायला हवी होती ही इडोडे यांची अपेक्षा आहे; पण बाजू घेण्याच्या दृष्टिकोनातून तो लेख लिहिलेला नाही. माझ्या वाचनात आलेल्या माहितीच्या आधारे अंगोलातील परिस्थितीचे शक्यतो वस्तुनिष्ठ व नि:पक्षपाती चित्र रेखाटणे ही या लेखामागची माझी भूमिका होती.

लुआंडावर चाल करून येणारे गोरे सैनिक

MANOOS (Weekly) : 100 Paise : Regd. No. PNC-68

दक्षिण आफ्रिकेने पाठविले असल्याचे एम. पी. एल. ए. चे निवेदन म्हणजे केवळ 'आरोप' आहे असे म्हणून मी त्या निवेदनाची बोळवण केली अशी इडोडे यांची टीका आहे. यासंबंधात काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. माझा लेख २९ नोव्हेंबर १९७५ च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्यापूर्वी एक आठवडा आधी तो लिहिलेला आहे. त्या वेळच्या बातम्यांवर त्यातील विधाने आधारित आहेत. 'आरोप' शब्द माझा नसून त्या वेळच्या बातम्यात तो आलेला आहे. एवढेच नव्हे तर 'टाइम्स ऑफ इंडिया'चे समीक्षक श्री. जी. एम. तेलंग यांच्या ज्या २८-११-७५ च्या लेखातील उतारे इडोडे यांनी आपल्या पत्रात दिले आहेत. त्या लेखाच्या पहिल्याच वाक्यात त्यांनी म्हटले आहे की, 'अंगोलाच्या यादवी युद्धात दक्षिण आफ्रिका मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करीत आहे. हा डॉ. ऑगॅस्टिनो नेटो यांचा आरोप म्हणजे आपल्या राजवटीला आंतरराष्ट्रीय सहानुभूती मिळविण्यासाठी केलेला प्रचारी पवित्रा नव्हे.' यावरून आरोप हा शब्द त्यांनीही वापरला आहे असे दिसून येईल. नंतरच्या बातम्यांवरून दक्षिण आफ्रिकेचा लष्करी हस्तक्षेप अधिक स्पष्ट झालेला आहे. पण मी लेख लिहिला त्या वेळच्या बातम्या एवढ्या स्पष्ट स्वरूपाच्या नव्हत्या.

एम. पी. एल. ए. ला रशिया पूर्वीपासूनच लष्करी मदत करीत आलेला आहे याकडे इडोडे यांनी लक्ष वेधले आहे; पण हे मी कोठे अमान्य केलेले आहे?' रशियाने मदत वाढविली' या माझ्या वाक्यातील 'वाढविली' या शब्दावरून रशियाची मदत पूर्वी मिळत होतीच हे सूचित होते. माझ्या लेखातील कॅब्रिन्डा बेटावर एफ. एन. एल. ए. च्या फौजांनी हल्ला चढविल्याचे वृत्त साफ चुकीचे आहे असे इडोडे यांचे म्हणणे. मी लेख लिहिला त्या वेळी तशी बातमी आलेली होती एवढेच मी सांगू इच्छितो.

यादवी युद्धात एम. पी. एल. ए. ची बाजू न्याय्य व बाकी दोन्ही संघटना प्रतिगामी असे इडोडे यांचे मत आहे. 'एफ. एन. एल. ए. व युनिटा म्हणजे अंतर्गत व बाह्य प्रतिगामी शक्तींच्या हातातील खेळणी आहेत' अशा शब्दांत 'प्रावदा'ने त्यांचा निषेध केला; पण हा निषेध म्हणजे प्रचाराचाच एक भाग म्हणून बाजूस सारता येईल असे श्री. जी. एम. तेलंग यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया'मधील ११ नोव्हेंबर १९७५ च्या अंकातील लेखात म्हटले आहे. याचा अर्थ या दोन संघटनांना घाईने प्रतिगामी ठरविण्याची त्यांचीही तयारी नाही.

एम. पी. एल. ए. चे नेते त्यागी आहेत. पोर्तुगीज साम्राज्यशाहीविरुद्ध अनेक वर्षे त्यांनी शौर्याने झुंज दिली हे खरे; पण मोझांबिकमध्ये फ्रेलिमोने जे स्थान मिळवले ते मिळवून सबंध अंगोलावर त्यांना आपली सत्ता प्रस्थापित करता आली नाही, या त्यांच्या सामर्थ्याच्या मर्यादाही मान्य केल्या पाहिजेत. समाजवादी अंगोलाच्या उभारणीचा व्यापक कार्यक्रम एम. पी. एल. ए. ने जाहीर करून त्यात सहभागी होण्याचे सर्वांना आवाहन करावे, खुल्या निवडणुकांची घोषणा करावी, आपले परराष्ट्र-धोरण तटस्थतेचे राहील असे जाहीर करावे, या आवाहनाला एफ. एन. एल. ए. व युनिटा या दोन संघटनांनी विरोध केला तर जनता त्यांना बाजूला सारील. राष्ट्रीय एकजुटीच्या सरकारची स्थापना ही अंगोलाची आजची गरज आहे.

आज पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे अंगोलाच्या यादवी युद्धातील बड्यांचा हस्तक्षेप थांबला पाहिजे. तेथील यादवी युद्ध तेथील पक्षांना स्वतःच्या बळावर लढू द्या, अंगोलाचे भवितव्य तेथील जनतेलाच ठरवू द्या हीच या प्रश्नावरील योग्य भूमिका होय असे मला वाटते.

**वा. दा. रानडे, पुणे**

**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०